आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
—श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्—
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१८२ ■ रविवार ७ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26

ना नफा! ना तोटा!
पशुखाद्य
गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग
200/- रुपये मात्र
हळद २८० रू. किलो, खोबरे १४० रू. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)

लोकसभा निवडणूक : भाजप, काँग्रेसमध्ये प्रचारयुद्ध रंगले

तिसऱ्या कार्यकाळाच्या शंभर दिवसांत मोठे निर्णय भ्रष्टाचाऱ्यांवरील कारवाई हा ट्रेलर : पंतप्रधान मोदी

पुष्कर (अजमेर), दि.६– आपल्या तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या शंभर दिवसांत आणखी मोठे निर्णय घेणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. माझी पूर्ण तयारी झालेली आहे. दहा वर्षात झालेली कारवाई हा केवळ ट्रेलर आहे. खूप काही बाकी आहे. मोदींनी शनिवारी अजमेरमधील पुष्कर येथील फेअर ग्राउंडवर निवडणूक रॅलीला संबोधित केले.

मोदी म्हणाले, भाजप सरकार देशातील ऐंशी कोटी गरजू लोकांना मोफत धान्य पुरवते. दहा वर्षांत गरिबांच्या खात्यात तीस लाख कोटींहून अधिक रक्कम थेट पाठवण्यात आली आहे. काँग्रेस सरकारच्या काळात मध्यंतरी पैशांची लूट झाली. दिल्लीतून एक रुपया पाठवला, तर तो पंधरा पैशांपर्यंत पोहोचतो, असे काँग्रेसच्या एका पंतप्रधानांनी म्हटले होते. तीस लाख कोटी रुपये असते, तर काय झाले असते? आम्ही तपास केला तेव्हा आम्हाला आढळले की काँग्रेसने दहा कोटीहून अधिक बनावट लाभार्थी तयार केले आहेत, जे (पान ८ वर)

मोदींकडून लोकशाही नियमांचे सर्रास उल्लंघन देश कुणाची जहागिरी नाही : सोनिया गांधी

जयपूर, दि.६– देशापेक्षा कोणीही वरचे नाही, पण मोदी स्वत:ला महान समजतात. ते लोकशाही नियमांचे उल्लंघन करत आहेत आणि संपूर्ण व्यवस्थेत भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत, ही हुकूमशाही आहे. हा देश काही मोजक्या लोकांची जहागीर नाही. आपल्या पूर्वजांनी रक्त सांडले आहे. हा देश आपल्या मुलांचे अंगण आहे, अशा शब्दात काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी जयपूरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आरोपांना उत्तर दिले.

तत्पूर्वी, जयपूरच्या विद्याधर नगर स्टेडियममध्ये झालेल्या बैठकीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाने पुन्हा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व भ्रष्टांना पक्षात घेत आहेत. भाजप सरकार सत्तेवर येताच राजस्थानमध्ये चिरंजीवी योजना बंद करण्यात आली असून पंचवीस लाखांचा विमा आता पाच लाख रुपयांचा झाला आहे. (पान ८ वर)

नंदुरबार जिल्ह्यात वेगवेगळ्या तीन अपघात तिघांचा मृत्यू

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात गेल्या महिन्यात दोन अपघाताच्या घटना घडल्या. त्यात दोघांचा मृत्यू झाला. मात्र या दोन्ही अपघाताच्या संदर्भात पाच एप्रिल रोजी गुन्हा नोंदवण्यात आला. तर काल अक्कलकुवा बुऱ्हाणपूर मार्गावर बंद पडलेल्या ट्रॅक्टरजवळ उभा असलेला एक व्यक्ती वाहनाच्या धडकेत ठार झाला. शुक्रवारी विविध अपघाताच्या पार्श्वभूमीवर तीन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले.

दि.८ मार्च रोजी शहादा शिरपूर रोडवर रात्री नऊ वाजेच्या सुमारास मध्यप्रदेशमध्ये जात असताना मोटरसायकल घसरल्याने कैलास शिरदार पावरा हा गंभीर जखमी झाला. जखमी सुरत तेथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचार घेत असताना १६ मार्च रोजी तो मरण पावला. दूसरी अपघाताची घटना मोलगी अक्कलकुवा रोडवर ब्रीजी पारी नदीच्या पुलावर घडली. २४ मार्च रोजी रात्री १०:३० वाजता सुरसिंग लसमा वसावे हा अपघातात ठार झाला. अज्ञात वाहनाने त्याला धडक दिल्याने तो मरण पावला, असे पोलिस ठाण्यात नमूद करण्यात आले आहे. तिसऱ्या घटनेत धनजी तेंब्या वसावे हा ५० वयातील इसम ठार झाला. बंद पडलेल्या ट्रॅक्टर जवळ उभा होता. वाहनाच्या धडकेत तो ठार झाला.

मविआचे नंदुरबार लोकसभेचे उमेदवार पाडवी यांच्या प्रचाराला हिदळा देवी मंदिरातून प्रारंभ

नवापूर, दि.६ (प्रतिनिधी) – महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत लोकसभेचे उमेदवार गोवाल पाडवी यांची नवापूर तालुक्यातील हिदळा देवी मातेचे दर्शन घेऊन प्रचाराचे नारळ फोडले. प्रत्येक लोकसभेला टॉपटेन खासदार तथा काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते स्व.माणिकरावदादा गावीत हे काँग्रेस पक्षाच्या प्रचाराचे नाराळ धनराट येथील देवस्थान आई हिंदळा देवी मंदीरात सुरुवात करायचे तीच परंपरा गोवाल पाडवी यांनी कायम ठेवली.

यानंतर नवापूर तालुका काँग्रेस भवन येथे तालुक्यातील महाविकास आगाडीचे पदधिकारी यांची त्यांनी भेट घेतली. याप्रसंगी आमदार शिरीषकुमार नाईक यांनी उमेदवार गोवाल पाडवी यांच्या सत्कार केला. काँग्रेस पक्षाचे कार्यध्यक्ष दिलीप नाईक, आम आदमी पाटीचे जिल्हासचिव अरविंद वळवी, उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाउपप्रमुख हंसमुख पाटील, शरद पवार गटाचे ईश्वर गावीत, माजी नगराध्यक्ष दामू बिऱ्हाडे, काँग्रेस पक्षाचे (पान ८ वर)

चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या दोघांना अटक मोहाडी पोलिसांची कारवाई; मुद्देमाल केला जप्त

धुळे, दि.६– मुंबई आग्रा महामार्गावरील वरखेडी फाटा उड्डाणपूलाजवळ एकट्या–दुकट्या नागरिकांना गाठून त्यांना चाकूचा धाक दाखवित लूटमार करणाऱ्या दोघांच्या मुसक्या आवळण्यात मोहाडी पोलिसांना यश आले आहे. दोघांनी इतर साथीदारांच्या मदतीने केलेल्या आणखी तीन गुन्ह्यांची उकल झाली असून पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून मोटारसायकल, धारदार सुरा असा सुमारे ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार दि.२६ मार्च रोजी सकाळी ०७.३० वा. चे सुमारास तक्रारदार ज्ञानेश्वर वामन माळी, रा.जुने धुळे हे त्यांचे मालकीचा ४०७ ट्रक क्र.एमएच–१८/ए–७५३३ हा मुंबई–आग्रा महामार्ग क्र. ३ वरखेडा फाटा जवळील सर्व्हिस रोड लगत वाहन धुण्यासाठी थांबलेले असतांना दोन इसम मो.सा.वर त्यांचे जवळ आले त्यांनी चाकूचा धाक दाखवून तक्रारदार यांचा आठ हजार रु. किंमतीचा मोबाईल जबरीने हिसकावून पळून गेले. सदर घटनेबाबत नमूद दोन्ही अज्ञात चोरटया विरुध्द आझादनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमूद तक्रारदार यांनी चोरटयांचे केलेल्या वर्णना प्रमाणे तसेच यापुर्वी देखील वरखेडी फाटा येथे जबरी चोरीच्या घडलेल्या घटनांचा पो.निरी. निवृत्ती पवार व त्यांचे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आढावा घेता सदरचा गुन्हा अर्शद शाह लियाकत शाह, रा.काझीचे शेत, नटराज टॉकीज जवळ, धुळे व त्याचा साथीदार अशांनी केला असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त केली. त्याप्रमाणे आरोपीचा शोध घेवून त्यास दि.४ एप्रिल रोजी गुन्हयाचे तपास कामी ताब्यात घेता त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार अरबाश शाह सुबराती शाह, रा.काझी प्लॉट धुळे (फरार) याचे सह केल्याची कबुली देवून सदर गुन्हयातील जबरी चोरी केलेला रेडमी कंपनीचा मोबाईल काढून दिल्याने तो जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अटक आरोपी अर्शद शाह लियाकत शाह याने पोलीस कस्टडी रिमांडमध्ये त्याचे इतर अब्दुल फरहान अब्दुल खालीद, मेमनजमातखाना, समोर, वडजाई रोड, धुळे अरबाश शाह सुबराती शाह, रा.काझी प्लॉट धुळे यांचेसह मोहाडी पोलीस (पान ८ वर)

नंदुरबारमधील रामदूत हनुमान चौकातील ढापे धोकेदायक

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी) – शहरातील अमृत सिनेमा चौक ते रामदुत हनुमान मंदिर परिसरातील मध्य रस्त्यावरील ड्रेनेजचे ढापे दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. याकडे नगर पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे संभाव्य दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

रामदूत हनुमान मंदिराजवळील डीजे आर्केड आणि मधुकर लॉज समोरच रस्त्यावर मध्यभागी ड्रेनेज असून त्यावरील झाकण तुटल्यामुळे दुचाकीस्वार आणि पायी चालणारे नागरिक जायबंदी होत आहेत. या भागात बँका, बाजारपेठ, दवाखाने असल्यामुळे दिवसभर नागरिकांची वर्दळ असते. ड्रेनेजवरील उघड्या ढाप्या बाबत नगर पालिकेच्या आरोग्य आणि बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार देऊन देखील नेहमी दुर्लक्ष होत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. सोबतच्या छायाचित्रात चांद्रभूमी सदृश्य जो खड्डा दिसत आहे त्याचा चांद्रभूमीशी दुरान्वये संबंध नसून तो रामदूत हनुमान चौकातील रस्त्यावरील आहे. या प्रभागातील स्थानिक नगरसेवकांकडे नागरिकांनी व्यथा मांडल्यास आता आम्ही कुठे नगरसेवक आहोत? असे सांगून मोकळे होतात. नगर पालिकेत प्रशासक बसले आहेत! त्यांनाच तुम्ही सांगा. यामुळे या भागातील लोकांना आंध्या म्हणे काय शे, बहिऱ्या म्हणे न्याय शे या म्हणीचा अनुभव येत आहे.

एलसीबी पीआय धुळे जि.कारागृहात

धुळे, दि.६– एल.सी.बी. पी.आय. दत्तात्रय शिंदे यांची रवानगी धुळे जिल्हा कारागृहात झाली आहे. हिरे मेडिकल कॉलेजम ध्ये वैद्यकीय तपासणीसाठी नेले असता छातीत दुखत असल्याने तेथेच दाखल झाले होते. सकाळी त्यांना बरे वाटू लागल्याने धुळे जिल्हा कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली आहे. त्यांच्या जामीन अर्जावर सोमवारी धुळे न्यायालयात काम काज चालणार आहे. दोंडाईचा येथे एका माजी नगरसेवकाचा हद्दपारीचा प्रस्ताव करु नये यासाठी दीड लाख रुपयांची लाच घेतल्याच्या प्रकरणात पीआय दत्तात्रय शिंदे यांना अटक करण्यात आलेली आहे.

चांदसे येथे पती व सासऱ्याकडून विवाहितेचा खून; दोघांना अटक

शिरपूर दि.६ (का.प्र.)– तालुक्यातील चांदसे गावात विवाहितेचा खून केल्याच्या संशयावरुन तिचा पती आणि सासरा अशा दोघांना पोलिसांनी अटक केली. तिने मजुरीचे पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरुन हा खून झाल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले असून खून होतांना तिच्या मुलाने प्रत्यक्ष पाहिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

भारतीबाई गजेंद्र भिल (वय ३५) असे मृत महिलेचे नाव असून तिला पाच एप्रिलला सरपंच विजय भिल यांनी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. सखोल चौकशीनंतर पोलिसांनी रात्री संशयित पती गजेंद्र विजय भिल व सासारा विजय मोतिसिंह भिल यांना अटक केली. मृत भारतीची आई नीलाबाई मधुकर मालचे (भिल, वय ५०, रा.नेर ता.धुळे) हिने शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, गजेंद्रला मद्यपानाचे व्यसन असल्यामुळे तो पैशांची मागणी करुन भारतीला नेहमी त्रास देत होता. सहा महिन्यापूर्वी गजेंद्र आणि भारती मजुरीसाठी (पान ८ वर)

सारांश भावसारांचा जामीन अर्ज फेटाळला

धुळे, दि.६– पारोळा पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील टोल प्लाझाच्या कॅबीन जाळल्या प्रकरणी सारांश भावसार यांचा जामीन अर्ज अमळनेर कोर्टाने नाकारला आहे.

धुळे–जळगाव रोडवरील पारोळा शिवारामधील सबगव्हाण येथील टोल प्लाझाच्या कॅबीन जाळल्याप्रकरणी भा.दं.वि.४३६, ४२६, ४२७, १२० (ब), १४३, १४९, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम सन १९८४ चे कलम ३ व ४ प्रमाणे पारोळा येथे ११ मार्च २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही जाळल्याची घटना ११ मार्च २०२४ च्या भल्या पहाटे २.५२ वाजता घडली होती. यात दीड कोटीचे नुकसान झाले आहे. यामध्ये संशयित सोनु उर्फ प्रितेश ईश्वर गुजर (वय २७) रा.मिरच्या मारुती चौक धुळे, आकाश विनोद गुजर (वय २९) रा.घड्याळवाली मशिद धुळे, (पान ४ वर)

संबोधी प्रतिष्ठानतर्फे नऊ एप्रिल पासून व्याख्यानमालेचे आयोजन

धुळे, दि.६– येथील फुले शाहू आंबेडकर संबोधी प्रतिष्ठान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकॅडमीतर्फे दि.९ व १० एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर द्विदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. क्युमाबाईल क्लबसमोरील आय.एम.ए. सभागृहात ही व्याख्यानमाल होईल. नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राचार्य बाबा हातेकर आज पत्रकार परिषदेत केले.

यावेळी व्याख्यानमाला संयोजन समिती सदस्य प्रा.डॉ. सुरेंद्र मोरे, प्रा. डॉ. संजय ढोडरे उपस्थित होते. व्याख्यानमालेची वेळ सायंकाळी ६ वाजेची असणार आहे. व्याख्यानमालेचे उद्घाटन क.ब.चौ.उ.म.वि. जळगावचे माजी कुलगुरू डॉ. एन.के. ठाकरे यांच्या हस्ते होणार असून यंदाच्या व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प (पान ८ वर)

लोकशाहीच्या बळकटीसाठी निस्वार्थपणे मतदान करा जनजागृतीपर कार्यक्रमात न्या.संदीप स्वामींचे आवाहन

धुळे, दि.६– भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराने नि:स्वार्थपणे मतदान करावे, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश संदीप स्वामी यांनी केले.

स्वीप उपक्रमातंर्गत शिंदखेडा विधानसभा मतदार संघ, पंचायत समिती, शिंदखेडा तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्यातर्फे सवाई मुकटी येथे मतदान जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास गटविकास अधिकारी आर.डी.वाघ, पंचायत समिती, शिंदखेडा येथील नोडल अधिकारी तथा गटशिक्षण अधिकारी डॉ.

सी.के. पाटील, सहा. गटविकास अधिकारी कपिल वाघ, विस्तार अधिकारी सोनवणे, देवरे, जाधव, सर्व केंद्रप्रमुख यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, तरुण मतदार, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

न्यायाधीश संदीप स्वामी म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी निस्वार्थपणे प्रत्येक मतदारांने मतदान करणे आवश्यक आहे. मतदानामुळे लोकशाही अधिक बळकट होण्यास मदत होईल. तसेच आपल्या गा–वाचा, तालुक्याचा, राज्य आणि देशाचा विकास होईल. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे देऊन उपस्थितांचे प्रबोधन केले. त्याचबरोबर शिंदखेडा तालुका दुष्काळग्रस्त असल्याने पाणी आडवा, पाणी जिरवा, पाणी व्यवस्थापन, वृक्ष लागवड या विषयावर जनजागृती करून गावाची पाणीटंचाई दूर कशी करता येईल (पान ८ वर)

शिरपूर येथे आज भाजपा ओबीसी मोर्चातर्फे ओबीसी सामाजिक संमेलन

शिरपूर, दि.६– पंतप्रधान विश्वगौरव नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात सकल ओबीसी समाजाकरीता सुरु असलेल्या सर्व जनकल्याणकारी योज–नेची माहिती ओबीसी समाजाच्या सर्व घटकांतील बंधू व भगिनींना मिळावी या हेतूने भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा शिरपूर विधानसभा क्षेत्राचे ओबीसी सामाजिक संमेलन रविवार ७ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

अध्यक्षस्थानी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल राह–तील. उद्घाटक म्हणून भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते हे उपस्थित राहतील. प्रमुख अतिथी म्हणून खा.डॉ.हीना–ताई गावीत, आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सह. सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, लोकसभा निवडणूक प्रमुख डॉ.तुषार रंधे, धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, भाजपा तालुकाध्यक्ष किशोर माळी, भाजपा शिरपूर शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल, भाजपा विधानसभा निवडणूक प्रमुख के.डी. पाटील, उत्तर महाराष्ट्र ओबीसी मोर्चा संपर्क प्रमुख भरत महाजन, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष आर.के.माळी, भाजपा सांगवी मंडळ अध्यक्ष सत्तारसिंग पा–वरा, भाजपा शिरपूर तालुका प्रभारी हेमंत पाटील आदी अनेक मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

रविवारी सायंकाळी एस.एम. पटेल ऑडिटोरियम हॉल, फॉर्मसी कॉलेज, करवंद रोड शिरपूर येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा (पान ८ वर)

विनम्र श्रध्दांजली

स्व मेघराज गोवर्धनदास रेलन
जन्म: १/७/१९२८ स्वर्गवास, दि. ७/४/१९९०
रेलन व्यवसाय समुह के प्रणेता, हमारे आदर्श एवंम मार्गदर्शक – आज आपकी पुण्यतिथीपर आपकी पावन स्मृतीमें हम श्रध्दा सुमन अर्पित करते है।
श्रध्दावनत
रेलन बंधू
रेलन क्लॉथ स्टोअर्स पारोला रोड, धुलिया

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -65,350 रु.+3% GST
सोने- 24 K -71,000 रु.+3% GST
चांदी- 82,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

भावपूर्ण श्रद्धांजली!



आप्पासाहेब रामदास भावडु सैंदाणे (काका)
यांना आम्हा भावंडांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!
–: शोकाकुल :–
प्रा.प्रकाश श्रावण सोनवणे
(सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी,मुंबई)
चेअरमन खान्देश एज्युकेशन सोसायटी, माध्यमिक विद्यालय, तामसवाडी, साक्री, धुळे
डॉ.सौ.रत्नमाला प्रकाश सोनवणे (Ph.D. प्राध्यापिका, होमी भाभा शासकीय विद्यापीठ, फोर्ट मुंबई)
श्री.पियुष प्रकाश सोनवणे (M.S. कॅलिफोर्निया, अमेरिका)
डॉ.सौ.ऐश्वर्या पियुष सोनवणे (M.S. लॉस एंजल्स, अमेरिका)
डॉ.प्रणाली प्रकाश सोनवणे (M.S. मिशिगन, अमेरिका)
श्री.स्वप्निल अरुण सोनवणे (पुतण्या) साक्री
सौ.मयुरी आकाश गरुड (पुतणी) नाशिक
वंदना अरुण सोनवणे (वहिणी, शिक्षिका)
मिराबाई भिकनराव जगताप (बहीण)
सौ.सुनंदा यशवंत जगताप (मुख्याध्यापिका, बहीण)
ताराबाई प्रकाश शिंदे (शिक्षिका, बहीण)
सौ.सरलाबाई पुंडलिक चित्ते (शिक्षिका, बहीण)
समस्त सोनवणे परिवार व कर्मचारी वृंद माध्य.विद्यालय तामसवाडी व राहीनपाडा

भाजपाचा वर्धापन दिन साजरा अंपळकरांच्या हस्ते झाले ध्वजारोहण

धुळे, दि.६–भाजपाचा वर्धापन दिवस नियोजित भाजपा कार्यालयात उत्साही वातारवरणात साजरा करण्यात आला. भारत माता की जय, भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस चिरायू होवो, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, अबकी बार चारसो पार, फिरसे एकबार मोदी सरकार, आदी घोषणांच्या निनादात ध्वजारोहण करण्यात आले.

महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, प्रतिभाताई चौधरी, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा जयश्रीताई अहिरराव, प्रदेश सदस्या माधुरीताई बाफना ज्येष्ठ नेते व ओ.बी.सी. मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष हिरामण गवळी, जिल्हा सरचिटणीस यशवंत येवलेकर, चेतन मंडोरे, संदीप बैसाणे, युवा मोर्चा जिल्हाअध्यक्ष आकाश परदेशी, जिल्हा प्रवक्ते शाम पाटील, माजी उपमहापौर कल्याणीताई अंपळकर, नगरसेवक सुनलि बैसाणे, योगीता बागुल, प्रशांत बागूल, भिकन आप्पा वराडे, भगवान देवरे, विक्रम थोरात, दगडू बागूल, उपाध्यक्ष अनिल दिक्षीत, तुषार भागवत, सुनिल कपील, भैय्यासाहेब पाटील, प्रथमेश गांधी, सोशल मिडिया प्रमुख पवन जाजू, कार्यालय प्रमुख प्रकाश उबाळे, निशताई चौबे, गिताताई कटारिया, मोहिणीताई धात्रक, मनोज शिरूडे, रजनीश निंबाळकर, शरद चौधरी, किरण रनमळे, पापा मगरे, बिपीन रोकडे, युवा मोर्चा सरचिटणीस पंकज धात्रक, जयवंत वानखेडकर, सचिन पाटील, मंडल अध्यक्ष बबनराव चौधरी, ईश्वर पाटील, भिलेश खेडकर, छोटू थोरात, अनिल थोरात, ज्येष्ठ नेते भिमसिंग राजपुत, ज्येष्ठ नागरिक आघाडी जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजीराव काकडे, कमलाकर पाटील, संतोष खंडेलवाल, बंडु चौगुले, नरेश हिरे, कोषाध्यक्ष रामशेठ अग्रवाल, आदींसह कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरकारी नोकरीतला निष्कलंक तपस्वी : रामदास सैंदाणे

सरकारी खात्यात आयुष्यभर नोकरी करून निष्कलंक राहिलेले आमचे काका आप्पासाहेब रामदास भावडू सैंदाणे! आयुष्यभर स्वतः खस्ता खाल्ल्या पण आपल्या बायकोला व मुलांना कोणत्याही गोष्टीची कमतरता भासवू दिली नाही. अप्पासाहेब हे तसे मूळचे धुळ्यातले. १९३८ साली त्यांचा जन्म! वडील भावडू सैंदाणे हे धुळ्यात त्याकाळी वन खात्यात नोकरीस होते. जुन्या धुळ्यात सुभाष नगर येथील झण झणी मातेच्या मंदिराच्या समोर पांझरेच्या नदीकाठी यांचे वास्तव्य. नोकरीत त्याकाळी अत्यंत तुटपुंजी कमाई त्यांना होती. मात्र घरात खाणारे ४ पुत्र व १ मुलगी.. परिस्थिती सामान्य असूनही जेमतेम कमाई वर आयुष्याचा डोलारा सांभाळला. आपल्या चारही मुलांना मात्र त्यांनी हवे तसे शिक्षण दिले. चारही भावात दोन नंबरचे रामदास काका तसे लहानपणीच अभ्यासात हुशार व तल्लख ! प्राथमिक शिक्षण शाळा न.१ मध्ये शिक्षण पूर्ण तर माध्यमिक शिक्षण हे न्यू सिटी शाळे मधून !! धुळ्यातूनच ग्रॅज्युएशन पूर्ण केले. सन १९६०/६५ काळ असावा. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते म्हणून त्यांना स्वकर्तृत्वावर महसूल खात्यात नोकरी मिळाली. आपल्या मुलाच्या कर्तृत्वाने आई.. पुंजाबाई सुावली व आपले पुढील आयुष्य नक्कीच सुखाचे असेल असे तीच्या मनात आले असावे. आई पुंजाबाई स्वभावाने अतिशय गोड तर वडील हे कडक स्वभावाचे ! मोठा भाऊ यशवंत दादा हे वडिलांच्या ओळखीने अगोदरच वन खात्यातच लागले होते. दोन्ही मुले सरकारी खात्यात लागल्यामुळे घरात सुखाचे दिवस आले होते. काका रामदास सैंदाणे हे आपल्या स्वकर्तृत्वाने आपल्या नोकरीच्या ठिकाणी ठसा उमटवत होते. वरिष्ठांचा विश्वासही त्यांनी संपादित केला होता. पूर्वी महसूल खात्याचा कारभार हा इंग्रजीत होत असे. रामदास काकांचे इंग्रजीवर प्रभुत्व होते म्हणून महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना ते नेहमी हवे हवेसे वाटू लागले होते. सडपातळ शरीरयष्टी ! रुबाबदार चेहरा ! मोजके पण ठासून बोलणे या मुळे ते आपल्या मित्रमंडळीत चर्चेचा विषय असे. मोठ्या भावाचे लग्न झाले तसे आई पुंजा बाईने रामदास काकाच्याच्या पाठीमागे लग्नाचा लकडा लावला. शेवाळी येथे त्यांचे मोठ्या थाटामाटात लग्न पार पडले व लहान वयात खेड्यातली लीलाबाई शहरात आली व आपल्या सुखी संसारात रममाण झाली.अश्याच वातावरणात रामदास काका याना ३ मुले व १ मुलगी झाल्या.

नोकरीत त्यांना योग्य तश्या बढत्या मिळत गेल्यावर व एक परिपूर्ण जीवन जगण्याचा आनंद त्यांना मिळाला. महसूल खाते असूनही त्यांनी त्यांच्या आयुष्यात कधीही कोणताही भ्रष्टाचार केला नाही व कधी साधा आरोप ही त्यांच्यावर झाला नाही त्यामुळे ते नेहमीच त्यांच्या काळातील वरिष्ठांच्या मर्जीतले ! केवडिया कॉलनी (गुजराथ) येथे सरदार सरोवर प्रकल्प येथे तत्कालीन

धुळे (नंदुरबार) जिल्हयातील नर्मदा नदीच्या बुडीत क्षेत्रातील अतिशय दुर्गम भागातील ग्रामीण भागात कार्यकारी दंडाधिकारी पदी त्यांना काम करण्याची संधी मिळाली व त्यांनी ती निष्कलंक पार पाडली. शासकीय सेवेतील त्यांच्या उत्कृष्ठ कार्याबद्दल त्यांना तत्कालीन वनमंत्री मा. सुरुपसिंह नाईक यांच्या हस्ते गौरविण्यात आले होते. शासकीय सेवेत त्यांनी अतिशय प्रामाणिक व निस्वार्थी सेवा केलेली आहे. त्यांचे वडील भावडू सैंदाणे हे त्या काळात धुळे शहरात नाभिक समाजाच्या उन्नतीसाठी काम करीत होते. त्यांच्या काही मित्रांनी एकत्र येऊन धुळ्यात आज नामांकित असलेल्या संत सेना नगरची स्थापना केली त्यामुळे धुळ्यातील नाभिक समाज बांधवांची बऱ्याच अंशी राहण्याची व्यवस्था तिथे झाली. भावडू सैदाणे यांनीही या ठिकाणी आपल्या जागेवर आपल्या चारही मुलांची सोय करून घेतली. १९८० चा काळ असावा. रामदास काका हे जुन्या धुळ्यातील आपल्या जुन्या घरा–तून आई वडिलां सोबत संत सेना नगर या नव्या घरी राहावयास आलेत. आपल्या नोकरीत त्यांनी कोणतेही अनुचित काम केले नसल्यामुळे व तुटपुंज्या पगार असल्यामुळे आर्थिक अडचण होतीच!! सोबतीला आई वडील! जुन्या घरात असताना लहान दोन्ही भावांची लग्ने झाली होती. बहिणीचेही लग्न झाले होते. मात्र कालांतराने लहान भाऊ प्रकाश याचे जुन्या घरात अकाली दुःखद निधन झाले ! त्यांच्या कुटुंबात त्या काळी हा मोठा दुःखाचा डोंगर कोसळला होता!!

संत सेना कॉलनी येथून कलेक्टर कार्यालयात ते आपल्या सायकलीने जात तर कधी पायी प्रवास करत असत !! महसूल खात्यात गैर मार्गाने पैसे जमवून भौतिक सुख सुविधा प्राप्त करू शकले असते. तसेच घरात फ्रीज व इतर जीवनावश्यक वस्तूंची आवश्यकता असूनही ते घेऊ शकले नाहीत. आपली नोकरीतील चाकरी त्यांनी निष्कलंक केली. कोणताही डाग आपल्यावर लागू दिला नाही. म्हणुनच त्यांच्या मुलावर योग्य ते संस्कार झालेत. मुलेही सुसंस्कारित असल्याने आपल्या संसारात आज रममाण आहेत. ज्येष्ठ चिरंजीव अनिल हे माध्यमिक शिक्षक म्हणून सन २०२१ मध्ये सेवानिवृत्त झालेत. आज श्री.अनिल हे धुळ्यात नाभिक सामाजिक कार्यक्रमात कार्यरत असून अग्रेसर आहेत. आज ते धुळ्याच्या संत सेना नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तर मधले नरेश हे वडिलांच्या पावलावर पाऊल ठेऊन महसूल खात्यात नासिक येथे कमिशनर ऑफिस येथे कार्यरत आहेत तर लहान भरत हे मुंबई महानगर पालिकेत इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत. मुलगी सौ. सुनीता ही नेर येथे आपल्या पती व मुलांसोबत संसारात रममाण आहे. तिचा मोठा मुलगा चि.रोहित पुण्यात इंजिनियर म्हणून नोकरीस आहे तर लहान मुलगा प्रशांत हा देखील एमए पास असून सध्या नाभिक व्यवसाय व त्यासाठी लागणारे साहित्य विक्रीचा व्यवसाय करतो आहे. आयुष्यात अजून काय हवे ? आपल्या नंतर आपल्या मुलांचा संसार सुखी होवो, ते आनंदित राहावे हेच प्रत्येक संसारी माणसाचे स्वप्न असते. ते स्वप्न रामदास ऊर्फ आमच्या आप्पांच्या जिवंतपणी त्यांनी पाहिले. आयुष्याच्या शेवटी त्यांना गेल्या १० वर्षांपासून शारिरीक आजारांनी घेरले. मात्र त्यांची धर्मपत्नी आमच्या मावशी लीलाबाई यांनी स्वतःच्या आरोग्याकडे न पाहता त्यांची शेवटच्या श्वासापर्यंत सेवा केली. तसेच त्यांचे ज्येष्ठ पुत्र अनिल व त्याच्या धर्मपतकी सौ संगीता वहिनी यांनी त्यांची सुरुवातीपासूनच मनोभावे सेवा केली, दोन मुले बाहेर गावी असूनही ते वडीलांच्या तब्येतविषयी कायम संपर्कात होते तसेच वेळोवेळी धुळे येथे आई वडिलांना भेटून त्यांची तब्येतीची काळजी घेत असत. मात्र आमच्या काकांनी वयाच्या व्यां वर्षी या जगाचा एक तृप्त जीवन जगून निरोप घेतला.

सन १९६१ साली सुरवातीस तहसील कार्यालय नंदुरबार (धुळे जिल्हा) येथे क्लर्क म्हणून शासकीय सेवेत हजर झालेत त्यानंतर ते शहादा,शिंदखेडा, अक्कलकुवा, नवापूर, साक्री, व धुळे येथे नोकरी केली व धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातून ३१/९/१६९६ साली नायब तहसीलदार म्हणून सेवा निवृत्त झालेत. मी मुबई येथे नोकरीस लागलो म्हणून त्यांना फार गर्व होता. त्यामुळे आयुष्याच्या शेवटी त्यांनी माझ्यावर मनापासून अपार प्रेम केले! आज आमची मावशी थकली आहे. गेल्या १० वर्षांपासून तिने आपला पती धर्म पाळून आपल्या पतीचे निःसीम सेवा केली. या पुढील काळात मुलांना मात्र ती हवी आहे. मला व माझ्या भावांडांनाही ती हवी आहे कारण आई मरो आणि मावशी जगो अशी आम्हा भावंडांची स्थिती आहे! म्हणून, परमेश्वर तिला निरोगी दीर्घायुष्य देवो हीच प्रभू चरणी प्रार्थना! आमचे आप्पा, सुखी, समाधानी व तृप्त आत्म्याने देवाघरी परत गेलेत! त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन मुले, सुना, एक मुलगी व जावई तसेच नातवंडे असा परिवार आहे. आप्पांच्या आत्म्यास शांती मिळो हिच प्रभू चरणी प्रार्थना !

–प्रा.प्रकाश सोनवणे
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

शहाद्यातील के.व्ही.पटेल कृषी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

शहादा, दि.६ (का.प्र.)– येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित के. व्ही. पटेल कृषी महाविद्यालय शहादा येथे कृषकोत्सव २०२४ अंतर्गत २० वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष जगदीश पाटील होते.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूरभाई पाटील, मंडळाचे संचालक नुहभाई नुरानी, महाविद्यालयाचे देणगी दाते काशिनाथ पटेल, मगन पटेल, एकनाथ पटेल, विनोद पटेल (पिंपळोद), मराठी सिनेअभिनेत्री तथा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी निकिता मोरे, शुराय फाऊडेशन नाशिकचे पराग पाटील, मंडळाच्या विविध विद्याशाखांचे प्राचार्य प्रमुख उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना अभिनेत्री निकिता मोरे यांनी सांगितले की, यशस्वी जीवनासाठी कष्टांना सामोरे जावे लागते.त्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना कठीण परिश्रम घेतले पाहिजे. पराग पाटील मनोगत व्यक्त करतांना म्हणाले,विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता विविध

व्यावसायिक संधी शोधल्या पाहिजे.स्वयं रोजगार उभारून स्वतः सह समाजाची प्रगती साधली पाहिजे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूरभाई दीपक पाटील, प्राचार्य डॉ.पी.एल.पटेल यांनी केले. अहवाल वाचन विद्यार्थी प्रतिनिधी विनीत पाटील यांने केले.प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.सी. यू.पाटील यांनी केले.आभार प्रदर्शन डॉ.बी. सी.चौधरी यांनी मानले. यावेळी कृषकोत्सव २०२४ अंतर्गत विविध परीक्षा, प्रात्यक्षिक, उपक्रम, खेळ आदिंत यशस्वी व नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डासांनी शहरवासिय हैराण

धुळे– शहरातील जवळपास सर्वच भागात डास मच्छरांनी उच्छाद मांडला आहे. पालिकेतर्फे यावर कुठलीही उपाययोजना केल्या जात नसल्याने मच्छरदाणी, अगरबत्ती यांचा उद्योग चांगलाच तेजीत आलेला आहे.

रोहितची जवाहर नवोदय विद्यालय येथे निवड

तऱ्हाडी, दि.६ (प्रतिनिधी)–

भारत सरकार मानव संसाधन विकास मंत्रालय दिल्ली, अंतर्गत नव–ोदय विद्यालय निवड समिती मार्फत इ.६ वी व इ.९ वी साठी दरवर्षी परीक्षा घेण्यात येते. नव–ोदय विद्यालय निवड परीक्षा फेब्रुवारी २०२४ या महिन्यात घेण्यात आली. या परीक्षेत रोहित शशिकांत जाधव याने घव–घवीत यश संपादन केले. तो धुळे जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आला. त्याची जवाहर नवोदय विद्यालय, नकाने धुळे येथे इ.९ वी ते वी शिक्षणासाठी निवड झाली आहे. रोहित जाधव हा अमरीशभाई आर पटेल सीबीएसई स्कूल शिरपूर विद्यालयाच्या विद्यार्थी आहे. तसेच तो ताराचंद मुरार जाधव (पोस्टमास्टर) तऱ्हाडी यांचा नातू व शिरपूर येथील मुकेशभाई आर पटेल मिल्ट्री स्कूलचे शिक्षक शशिकांत ताराचंद जाधव यांचा मुलगा आहे. त्याच्या निवडीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

केलीपाणी येथे मतदान जनजागृती विद्यार्थ्यांचा रॅलीला प्रतिसाद

तळोदा, दि.६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटीलपाडा व थेवापाणी (केलीपाणी) येथे स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृती मोहीम विविध उपक्रमाद्वारे राबविण्यात आली.

लोकसभासार्वत्रिकनिवडणूक २०२४ अंतर्गत केलीपाणी ह्या अति दुर्गम गावात रॅली काढून मतदान जनजागृती करण्यात आली. गावात मतदानाविषयी जनजागृतीसाठी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अश्या अनेक घोषणा देण्यात आल्या. पोस्टर्स लावण्यात आले. शाळेत मतदान जनजागृती विषयी गुढी उभारण्यात आली. मतदानाच्या हक्काविषयी माहिती देण्यात आली. शाळेत सेल्फी पॉइंट तयार करण्यात येऊन गावातील मतदारांचे सेल्फी पॉईंटवर फोटो घेण्यात आले. गावातील नागरिकांना शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पिसा वळवी, सदस्य देवीसिंग डोंगरे, भिमसिंग वळवी, सायसिंग वळवी, तेजला वळवी, हिनाताई डोंगरे, साबलीबाई वळवी तसेच गावातील नागरिक उपस्थित होते. शिक्षक प्रकाश ठाकरे, शिवदास कोकणी, प्रकाश कोकणी, चंद्रकांत सपकाळे उपस्थित होते. तसेच विविध कार्यक्रमांचेही नियोजन करण्यात आले. मतदान जनजागृतीच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक, गावकरी यांनी परिश्रम घेतले.

BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI 2K CHRISTIE DOLBY DIGITAL

ता. १० से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे | बडे मिया छोटे मिया
तिकीट दर | गोल्ड ८० रु. | सिल्वर ८० रु. | बाल्कनी १३० रु
ONLINE TICKET BOOKING OPEN bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI 2K CHRISTIE DOLBY DIGITAL

ता. ५ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे | मडगाव एक्सप्रेस
तिकीट दर | गोल्ड ८० रु. | सिल्वर ८० रु. | बाल्कनी १३० रु
ONLINE TICKET BOOKING OPEN bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ता. 10 से 4 Show


मनोहर नाट्य चित्रमंदिरः आग्रा रोड धुळे
MAIDAAN (U/A) 11:15,2:45,6:10,9:30 pm
Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर
Ticket Rate | ₹150 | ₹112 | ₹100 | ₹100
www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
BookMyShow Paytm 8007232021 232021/233421

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ON 4 APR 2 Show


बिग सिनेमास मनोहर नाट्य चित्रमंदिरः आग्रा रोड धुळे
Swatantrya Veer Savarkar (U/A) 12:00 & 6:00 PM Only
Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर
Ticket Rate | ₹150 | ₹112 | ₹100 | ₹100
www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
BookMyShow Paytm 8007232021 232021/233421

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE 2 shows

बिग सिनेमास मनोहर नाट्य चित्रमंदिरः आग्रा रोड धुळे
GODZILLA KONG (U/A) 3:15 & 9:15pm
Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर
Ticket Rate | ₹150 | ₹112 | ₹100 | ₹100
www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
BookMyShow Paytm 8007232021 232021/233421

शब्दकोडे क्रमांक.१९०१



आडवे शब्द : १.एक हिंदी वृत्त वाहीनी ४.एक पालेभाजी ५.गोंगाट ८.साहेब ९.लाकडाचा चौकोण वा त्रिकोण १०.अडचणीची वस्तु ११.वजन १२.विपुल प्रमाणात असलेला १४.त्रिदोषांपैकी एक १६.पळ १८.दोन नंतर येणारी संख्या १९.बनावटपणा करणारा २१.नीच पुरूष २४.घटस्फोट २६.अंगावरील वारीक केस २७.संयम २९.एक शेंगभाजी ३१.रावा ३३.ओढयावरील लहान पुल ३४.बटटा ३५.छप्पर ३६.सरोज ३८.लहान टेकडी ४२.गुपित ४३.सतत रडणारा ४५.दम ४८.प्रतिक्रिया ५०.जाम,माज ५१.वणवा ५३.प्रियकर ५५.हिंदीत-दया ५६.रमलेला५७.भेग ५८.त्या प्रमाणे **उभे शब्द :** १.विश्रांती २.सातु ३.कठीण ४.कार्यकत्यांचा जमलेला गोतावळा ५.नाहीसा ६.दुनिया ७.ताकदवर १०.आगाऊ ठेवलेली ठेव ११.मनातील हळवे विचार १३.वाळू १५.साईबाबांनी धारण केलेला अवतार १७.यश १९.नाव हाकणारा २०.मेळ २२.पटला-उलट लिहा २३.केव्हा २५.झाडांची केलेली जोपासना २८.रसरशीत ३०.ओक्साबोक्शी केलेले रूदन ३१.खबत: चाबकाचे फटके मारत भिक्षा मागणारा ३२.नजर ३७.माव ३९.हिंदीत-मान ४०.मल्लपटूंचा व्यायामाचा एक प्रकार४२.भित्रा ४४.करणारा ४६.सुसर ४७.गुंड ४८.क्षण ४९.माहेर-विरूदध ५२.खिस्ती जोगतीण ५४.विचार

शब्दकोडे क्रमांक.१९०० चे उत्तर

वि	रो	ध		आ	वा	रा		मा	ल	म	त्ता
का	म		ति	ढा		य	व	न		जा	
स		जा		वा	म		का	स	व		जा
	क	ल	श		स	क	ल		न	र	म
थो	र		ह	ला	ल		त	ट		म	न
	व	का	र		त	मा		क	ली		ग
प	त	न		अ		ह	क	ला		वी	र
ळ		न	रा	ध	म		ष्ट		प	ट	
वा	द		ज	म		ह		तु	ला		जा
ट		दा	न		का	य	र		य	म	न
	सा	व		स	म	ग		ध	न		व
ब	र	त	न		ना	य	ग	रा		ची	र

बहर

गुढीपाडवा व रमजान ईदच्या शुभेच्छा!



चैतन्याची, आत्मविश्वासाची गुढी उभारु या...!

विकास कपोले

थंडी संपून नुकताच उन्हाळा सुरु झालेला असतो. चैत्र महिन्याची सुरवात. नवीन पालवी सर्वच झाडांना येऊ लागलेली असते. स्वच्छ सूर्यप्रकाश, नवीन पालवी, कैरी/आंब्यांचे बाजारात झालेले आगमन. करवंद/जांभूळाची चाहूल. कडक उन्हाळ्यातही बहरलेला लालभडक गुलमोहर, पिवळाधमक बहावा. सारे वातावरण सुगंधित करणारा मोगरा, कोकीळेचे कुजन, सारे वातावरण मनमोहक करुन टाकतो. चैत्र महिना म्हणजे उन्हाने तापणारा पण मनाला थंडावा देणारा महिना. जीवनात कितीही संकटे येऊ दे. पण आशेचा एक किरण असतोच, हेच जणू चैत्र महिना सांगत असतो.

आपण सारे भारतीय उत्सवप्रेमी आहोत. कुठलाही लहान-मोठा सण आपण उत्साहाने साजरा करीत असतो. आपल्या प्रत्येक सणामागे शास्त्रीय कारण आहे. आध्यात्म आणि शास्त्र यांचा अनोखा मिलाफ म्हणजे आपले सण/उत्सव आहे. गुढीपाडव्याच्या सणाला आपल्या संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व आहे. गुढी म्हणजे ध्वज, शालिवाहन राजाने शकांवर विजय मिळविला, म्हणून शालीवाहन शकारंभ. त्यामुळे गुढीपाडव्याला परंपरेत विशेष महत्व आहे.

हुताशनी पौर्णिमा झाली की, वेध लागतात ते गुढी पाडव्याच्या शुभ दिवसाचे. गुढी पाडवा म्हणजे साडेतीन मुहूर्तामधला एक मुहूर्त. साडेतीन मुहूर्त म्हणजे स्वयंसिद्ध मुहूर्त. कोणताही मुहुर्त काढण्यासाठी पंचाग, नक्षत्र, तारा बल, चंद्र बल पहावे लागते. पण काही दिवस असे आहेत की, त्यादिवशी उत्तम तिथी, नक्षत्र आणि योग असा संयोग होतो. साडेतीन मुहूर्त म्हणजे गुढी पाडवा, अक्षय तृतीया, दसरा आणि बली प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त होय. या दिवशी कुठलाही वेगळा मुहूर्त पहाण्याची गरज नसते. या दिवशी केलेली संपत्ती अक्षय रहाते किंवा वृद्धीगंत होते. त्यामुळे हे मुहूर्त साधून सोने-चांदी, घर, वाहक आदी खरेदी आवर्जून केली जाते.

चौदा वर्षाचा वनवास संपवून श्रीराम याच दिवशी अयोध्येत परतले. भगवान विष्णूंनी सातवा रामअवतार चैत्र शुद्ध नवमीला घेतला. संपूर्ण नगरवासीयांनी श्रीरामाचे स्वागताची गुढी उभारुन स्वागत केले. ती गुढी विजयाची, स्वागताची व आनंदाची होती. याचा उल्लेख ज्ञानेश्वरीत देखील आहे.

'माझी अवसरी ते फेडी। विजयाची सांगे गुढी
येरु जीवी म्हणजे सांडी। गोठीयिया'

ज्ञानेश्वरी माऊलींनी या गुढीला विजयाची गुढी असे नाव दिले आहे.

या दिवसाची आठवण म्हणून घरोघरी आपण गुढी उभारतो. पहाटे कडुलिंबाची कोवळी पाने व गुळ किंवा खडीसाखर एकत्र कुटून खातो, यामुळे वर्षभर आपले आरोग्य उत्तम रहाते. कुडुलिंबाची पाने ही थंड, जंतुनाशक आणि आरोग्यवृध्दी करणारी असल्याने या दिवसात त्याची चटणी करुन नियमीत खावी.

घराच्या दर्शनी भागात गुढी उभारावी. शक्यतोवर उंच आकाशाच्या दिशेने गुढी लावावी. यानिमित्ताने आपले जीवनातील ध्येयही उंच असावे. स्वप्न तरी मोठी पहावीत, आणि त्यांच्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येकाने जीवनात काहीतरी ध्येय ठेवावे, हे ध्येय स्वत: पुरतेच नसावे तर आपले गाव, शहर, महाराष्ट्र, संपूर्ण देशाप्रतीही हवे. हेच या गुढीच्या माध्यमातून आपण सांगत असतो. वसंत ऋतुचा आरंभदेखील या कालावधीत होत असतो.

या सणाचा दिवस म्हणजे आनंदाचा/उत्साहाचा असतो. वातावरणात एक प्रकारचा उत्साह भरलेला असतो. अक्षय उर्जा-अखंड चैतन्य साऱ्या वातावरणात असते. संपूर्ण वातावरणात सकारात्मकता भरलेली असते. हा सण व्यक्ती, समाज आणि राष्ट्रातदेखील आनंद निर्माण करतो.

आज आपला देश आर्थिक दृष्टचा संपन्नतेकडे वाटचाल करीत आहे. व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय), सॉफ्टवेअर कंपन्या, अवकाश प्रगती, संरक्षण सामुग्रीत, रेल्वे क्षेत्रात प्रगती, त्याचप्रमाणे रस्ते आणि दळणवळणाच्या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान वापरुन केलेला विकास आदि क्षेत्रात उभारलेली यशाची गुढी आपल्या सर्वांनाच अभिमान वाटावी अशी आहे. अर्थात या प्रगतीमागे देशातील तरुणाईचा सहभाग नक्कीच महत्वाचा आहे. विविध क्षेत्राती उभारलेली ही गुढी सदोदीत उंच शिखरावर कशी राहील यासाठी मेहनत, प्रामाणिकपणा आणि नविनतेचा ध्यास ही त्रिसुत्री प्रत्येकाने अंगिकारायला हवी.

गुढी पाडवा हा दिवस हिंदू नववर्षाचा पहिला दिवस. साधारणत: आपण वर्षाच्या पहिल्या दिवशी नविन संकल्प करतो. चांगल्या गोष्टीची सुरुवात करतो. प्रत्येकात चांगले आणि वाईट गुण असतात. मात्र आणि प्रत्येकातील चांगले गुण घेऊन आपले जीवनात यश मिळवावे. इच्छाशक्ती, जिद्द, सातत्य कुठलेही काम करतांना बाळगावी. उत्साहातून सर्जशीलता, नवनिर्मितीची चेतना जागृत होऊन आपण यशाची शिखरे पादाकांत करु शकतो. दुसऱ्यातील वाईट गुण, मनातली अढी बाजूला करुन आनंदाची गुढी उभारु शकतो. संपणाऱ्या वर्षातील वाईट गुण, आठवणी. शत्रुता हे विसरुन नविन वर्षाचे स्वागत आणि गुढी उभारुन स्वागत करु या!

गुढीपाडवा आणि कडुलिंब

मंगला राजपूत, मो.८२७५२५४६ ३५

आला रे आला सण गुढीपाडवा
नक्षीदार रांगोळी संगे तोरण चढवा

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा.साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त. गुढी म्हणजे यशाचे प्रतीक विजयाचे प्रतीक. ती गुढी असं म्हणत असल्यामुळे गुढीला साडीचोळी घालतात त्यावर तांब्याचा तांब्या ठेवतात व साखरेच्या गाठी घालतात कारण पुढील वर्ष व संपूर्ण पुढील आयुष्य गोड जावो, नात्यांमध्ये गोडवा राहावा म्हणून. तसेच श्रीरामांच्या जीवनातही अनेक संकटे आली उदाहरणार्थ ऐन तारुण्यातच १४ वर्षे वनवासात जावे लागेल त्यात अनेक संकटे आली रावणाने सीतेला पळवून नेले परंतु श्रीराम संकटांना न घाबरता संकटांना तोंड देऊन सीतेला सोडवले व रावणाचा नाश केला यश मिळवले म्हणून यशासाठी गुढी उभारतात. संकटे किंवा कटू प्रसंग आले तरी त्यांना न घाबरता यशस्वी होऊन दाखवणे , कटू प्रसंग किंवा संकटांना तोंड देता आले पाहिजे म्हणून कडुलिंबाचा पाला लावतात.

गुढी म्हणजे विजय पताका. गुढीपाडव्याच्या दिवशी श्रीरामांनी वाली च्या जुलूमातुन दक्षिणेकडील प्रजेची सुटका केली होती त्यामुळे वालीच्या त्रासातून मुक्त झालेल्या जनतेने घरोघर गुढ्या उभारून उत्सव साजरा केला असे म्हटले जाते. गुढीपाडवा म्हणजे आसूरी शक्ती वर दैवी संपत्तीचा किंवा शक्तीचा विजय, विकारांवर सुविचारांचा विजय ,वानर किंवा चंचल वृत्तीवर सात्विकतेचा विजय आणि यशाची, विजयाची गुढी अशीच उंच राहावी याच्या आठवणीसाठी गुढी उभारली जाते कारण आपली भारतीय संस्कृती विचार व आचारांवर आधारित आहे.

आधी मनी धरावे
मग तैसे आचरण करावे
बोले तैसा चाले
त्याची वंदावी पावले

अशी आपली भारतीय संस्कृती महान आहे. चैत्र हा मराठी वर्षातला पहिला महिना व गुढीपाडवा हा पहिला सण चैत्र महिन्यात सुरू झालेला झाडांना गुलमोहर, पालवी फुटते, सजल्यासारखा

तसेच नुकताच वसंत ऋतू असतो त्यामुळे सर्व पालवी फुटते, फुलांचा बहर येतो, मोगरा, बहावा तसेच कडुलिंबालाही खूप मोहर येतो व हिरवाकंच असा कडुलिंब नवरी छान दिसतो. कडूलिंबाखाली छान सुवास येतो. कडुलिंब म्हणजे जणू निसर्गातला कल्पवृक्ष. कारण कडुलिंबाची सावली दाट पडते त्या झाडाखाली खूप गारवा वाटतो. कडुलिंबाची पानं वेगवेगळे साबण, फेस वॉश किंवा इतर वस्तू बनवण्यासाठी वापरतात तसेच कडुलिंबाच्या लिबोंळ्यांचाही वापर वेगवेगळ्या वस्तू बनवण्यासाठी होतो झाडाच्या खोडाचा ही उपयोग होतो. कडुलिंबापासून खूप लाकूड मिळते. शेतात विहिरीजवळ एक कडूलिंब नक्की लावतात त्याखाली शेतकरी शेतमजूर डबा खातात ,खेड्यात एखाद्या चौकाजवळ कडूलिंब लावून त्याखाली म्हातारे लोक निवांतपणे गप्पा करतात. जसा गावाबाहेर पिंपळाचा पार तसा चौकात कडूलिंबाचा कट्टा त्यांना तो आपला सखाच वाटतो आणि उन्हाळ्यात तर त्याच्या दाट सावली व गारव्यामुळे तो जणू नैसर्गिक कुलरच वाटतो. मोठमोठ्या रस्त्यांच्या दुतर्फाही कडूलिंबाची झाडे लावली जातात व ती अनेक प्रवाशांना किंवा वाटसरूना गारवा देण्याचे पुण्य कार्य करतात.

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागामध्ये लहान मुलांना कांजण्या किंवा गोवर निघाल्यास त्यांना गारवा वाटावा म्हणून कडुलिंबाच्या पानांवर त्यांना झोपवले जायचे व रोगजंतू नष्ट व्हावे म्हणून आंघोळीच्या पाण्यात कडुलिंबाची पाने टाकून त्याच्याने अंघोळ घातली जायची. तसेच पूर्वी अक्षय तृतीयेच्या वेळेला आंब्याच्या किंवा कडूलिंबाच्या झाडाला झोका बांधून मुली व माहेरवाशीनी गौराईची गाणी म्हणायच्या.

दुनिया मे आये है तो जीना ही पडेगा
जीवन है अगर जहर तो पीनाही पडेगा

गोड फळ असेल तर त्याला लवकर कीड लागते व ते संपवते परंतु कडू फळ असेल तर त्याला कीड पूर्ण खाऊ शकत नाही त्यातील कडूपणामुळे.तसाच कडुलिंब हा देखील कडू असतो त्यामुळे गुढीपाडव्याच्या दिवशी थोडासा कडूलिंब खाण्याची सुद्धा प्रथा आहे कारण कडूपणामुळे पोटातील कृमी नष्ट होतात व प्रतिकारशक्ती वाढते असे आयुर्वेदात सांगितले आहे तसेच श्रीरामांच्या जीवनातही अनेक कडू प्रसंग आले परंतु त्यांनी जीवनात कडूपणा येऊ दिला नाही उदाहरणार्थ कैकेयीने १४ वर्षे वनवासात पाठविण्यास सांगितले तरी तसे काही कटू किंवा वाईट मानलेही नाही म्हणून कदाचित कडुलिंबाची पाने लावत असावीत.

सण गुढीपाडव्याचा उभारा रे गुढी
नववर्षातला सण सोडा मनातील अढी

माणसाच्या जीवनातही कडू किंवा कटू प्रसंग येत असतात माणूस कितीही हुशार प्रगतिशील असला तरी तोही परिपूर्ण नसतो तर कधी कधी काही गोष्टी आपल्या हातातही नसतात त्यामुळे संकटे आल्यास संकटांना घाबरतात खूप दुःखी होतात कधी कधी नात्यांमध्ये व भाऊबंदकीत खूपच कटूता असते . शेतावरून, जमिनीवरून खूप भांडणं अगदी मारामारी होते अशावेळी माणसे खूप दुःखी होतात काही जण एकटे पडल्यासारखे वाटतात .

म्हणून बहिणाबाई म्हणतात-

माणूस माणूस मतलबी रे मानसा
माणसा माणसा तुझी नियत वाईट
तुझ्यापेक्षा गोठ्यातलं जनावर बरं

अशा वेळेला कडुलिंबाचे फुलून येणे लक्षात घ्यावे कारण हिवाळ्यात किंवा शिशिर ऋतूत कडुलिंब जणू स्थितप्रज्ञासारखा विचार करतो व नंतर आपल्या पानांच्या सहाय्याने जणू सारी दुःखे , व्यथा, वेदना काढून- गाळून टाकतो व त्याला पुन्हा कोवळी पालवी फुटते, फुलांचा मोहर येतो , त्याला लिंबोळ्याही लागतात आणि तो सर्वार्थाने फुलून येतो म्हणजेच माणसानेही जीवनात कटूता,समस्या , आल्या तरी त्यात त्यांनी धैर्याने तोंड द्यावे सारे काही विसरून फुलून यावे असेच जणू कडूलिंब सांगत असतो. कडूलिंबावर कोणी वार केला किंवा त्याच्या फांद्या तोडल्या तरी त्याला पुन्हा पालवी फुटते. म्हणजेच झाले गेले विसरून जावे पुन्हा फुलून यावे असेच जणू तो सांगत असतो.

दिव्य कुरआन : मार्गदर्शक ग्रंथ सर्वांसाठी

सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिना सुरू आहे. योगायोगाने याच महिन्यात दिव्य कुरआन मार्गदर्शक ग्रंथ सर्वांसाठी हा धार्मिक ग्रंथ माझ्या हाती आला. या ग्रंथाच्या वाचनानंतर या ग्रंथाचा पर्यायाने कुरआनचा (कुराणाचा) थोडक्यात परिचय, ज्यांना त्याबाबत जाणून घेण्याची मनापासून इच्छा आहे त्यांच्यासाठी करून द्यावासा वाटला. म्हणून हा लेखनप्रपंच!

वाचाल तर वाचाल
प्रा.सुनंदा वैद्य, धुळे
मो.९८२३१२६०२४

मूळ कुरआन हे अरबी भाषेत लिहिलेले आहे. मुहम्मद इकबाल मुल्ला यांनी कुरआन माजिद: मार्गदर्शक किताब सबके लिये या नावाने हिंदी भाषेत जो ग्रंथ लिहिला आहे त्याचे मराठीमध्ये सुलभ भाषांतर धुळ्यातील एम.हुसैन गुरुजी यांनी दिव्य कुरआन मार्गदर्शक ग्रंथ सर्वांसाठीया नावाने केले आहे.त्यांचा हा प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे कारण याच्या वाचनातून कुरआनचा प्राथमिक स्वरूपाचा अभ्यास होऊन त्याची मूळ कुरआन समजण्यासाठी निश्चितच मदत होईल. या ग्रंथाची प्रस्तावना असीम दयावंत व कृपावंत अशा अल्लाहच्या नावाने मुहम्मद इकबाल मुल्ला यांनी लिहिलेली आहे.ते लिहितात,आमचे देशबांधव आणि भगिनींच्या पुढ्यात मानवाचा निर्माता,मालक, स्वामी आणि वास्तविक परमपूज्य प्रभूच्या अंतिम ग्रंथाच्या सुयोग्य परिचयाची आज देखील नितांत आवश्यकता आहे. जेव्हा या देशातील मुस्लिम कुरआनच्या शिकवणीवर आचरण करून दाखवतील की ही आहे कुरआनची शिकवण! त्यावेळी दिव्य कुरआनच्या परिचयाचे कार्य पूर्ण होईल. या ग्रंथाच्या अध्ययनापूर्वी खालील गोष्टी विचारात घेण्याबाबत सांगितले आहे.

उर्दू भाषेतील पुस्तकांचे संदर्भ व उतारे समजून घेणे,या ग्रंथाच्या अध्ययनानंतर काही सूचना व प्रस्ताव तसेच चुका वा उणिवा असल्यास लेखकास सूचित करणे,ईशवाणी आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रार्थना व सुवचने यांचा योग्य तो आदर करणे आणि या ग्रंथाचे विचारपूर्वक अध्ययन करून या ग्रंथाची देशबांधवांना भेट देऊन दिव्य कुरआनचा परिचय करून देणे अशा त्या गोष्टी आहेत. या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेवरून विषयाचे विविध पैलू व व्याप्ती यांची वाचकाला कल्पना येते.प्रत्येक शीर्षकांतर्गत घेतलेल्या मुद्यांसाठी योग्य तो मजकूर संदर्भासह व उदाहरणांसह दिलेला आहे.सर्व शीर्षके समर्पक आहेत. दिव्य कुरआन हा अल्लाहकडून लिहिलेला अंतिम ग्रंथ आहे. कुरआनचा शब्दशः अर्थ आहे अशी वस्तू जिचे वाचन केले जाईल. दिव्य कुरआन ही अल्लाहची वाणी आहे. ही ईशवाणी ईश्वराचे फरिश्ते (देवदूत) हजरत जिब्रिल (अ.) आणून पोहचवीत असत. ईश्वराने आपल्या दासांमधून निवडक मानवांना प्रेषित आणि पैगंबराच्या मानाने नियुक्त करून मार्गदर्शकाच्या पदावर विराजमान केले. अंतिम पैगंबर म्हणून मुहम्मद (स) यांची निवड झाली तेव्हा त्यांचे वय चाळीस वर्षे पूर्ण झालेले होते. तेव्हापासून पुढे सुमारे तेवीस वर्षांच्या मुदतीत दिव्य कुरआन पैगंबर मुहम्मद (स) यांच्यावर वह्यच्या म्हणजे ईशवाणीच्या माध्यमातून अरबी भाषेत अवतरित झाले.पैगंबरांचेआगमन मानवाच्या मार्गदर्शनासाठी म्हणजे अल्लाहकडून अवतरित झालेले संदेश,आदेश व शिकवण मानवापर्यंत पोहचवण्यासाठी झालेले होते. ईशवाणी प्राप्त झाल्यानंतर पैगंबरांसाठीजरूरी ठरत असे की त्यास जसेच्या तसे पोहचवणे.कोणत्याही प्रकारचे परिवर्तन किंवा उणे-अधिकचा अधिकार कोणत्याही पैगंबरासदेखील राहिला नाही.

पैगंबर झाल्यानंतर हजरत मुहम्मद (स) मक्केत तेरा वर्षे आणि मदीनेत दहा वर्षे राहिले.या दोन्ही ठिकाणी तेवीस वर्षांच्या कालावधीत थोडे थोडे करून ईशग्रंथ अवतरित झाले.पैगंबरांच्या मृत्युनंतर हे कार्य थांबले. मक्केत जेव्हा पैगंबर मुहम्मद (स) यांना अधिक प्रमाणात विरोध होऊ लागला, तेव्हा अल्लाहच्या आदेशाने त्यांना व त्यांच्या साथीदारांना मक्केहून मदीनेस रवाना व्हावे लागले.यास 'हिजरत' म्हणतात. इस्लामी इतिहासातील ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. काहींच्या मते अल्लाहची जवळीक साधण्यासाठी आणि सत्यतेच्या मार्गावर चालण्यासाठी एखाद्या गुरुची (मार्गदर्शकाची) आवश्यकता आहे.हजरत मुहम्मद (स.) हे अंतिम पैगंबर जगाच्या अंतापर्यंत समस्त मानवांचे सच्चे मार्गदर्शक आहेत आणि मार्गदर्शनाचे स्थान त्यांचेच आहे.कारण ते ईश्वराचे प्रतिनिधी आहेत.ज्याने पैगंबरांची आज्ञा पाळली त्यानेखरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले (कुरआन,सूरह-४, अन् निसा , आयत-८०).

अल्लाहने मानवाला जन्माला घालून त्याच्यासाठी इतर प्राणीमात्र तसेच सूर्यप्रकाश, ऊर्जा आणि उष्णता,चंद्राची शीतलता,वारा, पाणी इत्यादिंची निर्मिती केली. मानव या पृथ्वीतलावरील सर्वश्रेष्ठ व सर्वोत्तम प्राणी आहे.कारण त्याला बुद्धी, विवेक आणि मर्यादित स्वातंत्र्य व अधिकार या ईश्वरी देणग्या प्राप्त झाल्या आहेत.संपूर्ण सृष्टीतील वस्तूंना एका नियमाशी बद्ध ठेवून मानवी सेवेत लावून देण्यात आले आहे.वस्तूंच्या निर्मितीचा हेतू मानवाची सेवा करणे आणि त्याला लाभ पोहचविणे हा आहे. मानवाची सुरक्षा,स्थायित्व आणि विकास यामध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.मानवाच्या भौतिक व प्राकृतिक गरजा या प्रकारे पूर्ण केल्या आहेत. मानवी जीवनात नैतिक व आध्यात्मिक गोष्टींची सुद्धा गरज असते. म्हणून त्या गोष्टींच्या प्रशिक्षणासाठी योग्य,व्यापक, संपूर्ण मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. हे मार्गदर्शन दिव्य कुरआनद्वारे अल्लाहकडून उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले आहे.ईश्वराचे मार्गदर्शन हेच मूळ मार्गदर्शन आहे. मृत्यु ही मानवी जीवनातील महत्वाची वास्तविकता आहे. वैश्विक जीवनातील सफलता आणि मरणोत्तर जीवनाच्या मुक्तीसाठी ईश्वराकडून प्रदान करण्यात आलेल्या जीवनव्यवस्थेचे पालन करणे आवश्यक आहे कारण या दोन्ही गोष्टी दिव्य कुरआनाशी जुळलेल्या आहेत. अल्लाहने मानवासाठी एवढे सगळे केल्यानंतर मानवाच्या दोन्ही लोकातील सुखी व सफल जीवनासाठी मानवाकडून काही विशेष अपेक्षा असणारच.प्रत्येक मानवापर्यंत हा ग्रंथ पोहाचला पाहिजे.त्याने त्याचे श्रद्धेने व गांभीर्याने वाचन व अल्लाहचे संदेश, आदेश आणि शिकवण यांचे पालन केले पाहिजे.

अल्लाह एखाद्यास बळजबरीने मार्गदर्शन करीत नाही. ईश्वराचे मार्गदर्शन म्हणजे खिरापत नाही. मार्गदर्शन स्वीकारणे आणि त्याप्रमाणे कर्म करणे ही मानवाची गरज आहे, अल्लाहची नाही. तो केवळ अल्लाह आहे जो सत्याकडे मार्गदर्शन करतो (कुरआन, सूरह-१०, युनुस,आयत-३४-३७)जे आपण जाणत नाही अशा तथ्थांना आणि वास्तवतांना हा ग्रंथ दर्शवितो.सत्यता जाणणेच नव्हे तर मानणे देखील आवश्यक आहे कारण त्याशिवाय मानव आपल्या पालनकर्त्यापासून अनभिज्ञ आणि जीवनाच्या उद्देशापासून अपरिचित राहील.वास्तवता व सत्यता हे सर्वात मोठे मौल्यवान भांडवल आहे.

एकेश्वरवाद (तौहीद), प्रेषित्व (पैगंबरी) आणि परलोक (आखिरत) या कुरआनच्या तीन मूलभूत शिकवणी आहेत.एकेश्वरवाद म्हणजे एक स्वामी, पालनकर्ता आणि पूज्य प्रभूस त्याच्या सर्व महान वैशिष्ट्यांसह मनापासून मानणे, त्याच्यासोबत कोणाला कोणत्याही अवस्थेत सहभागी न करणे. प्रेषित्व म्हणजे मानवाच्या मार्गदर्शनासाठी (१) पैगंबरांचे आगमन (२) या महापुरुषांवर अल्लाहकडून ग्रंथ आणि लिखित पृष्ठांचे अवतरण (३) प्रेषित्वाची समाप्ती या तीन घटकांवर आधारित व्यवस्था मानणे व त्यावर विश्वास ठेवणे. परलोक म्हणजे मृत्युनंतर सदैव बाकी राहणाऱ्या जीवनावर ईमान आहे ही श्रद्धा ठेवणे. कुरान उत्कृष्ट प्रमाण, हृदयस्पर्शी शैली आणि वैज्ञानिक चिकित्सक पद्धतीव्दारे वरील तीनही मूलभूत शिकवणींचे प्रभावी रीतीने प्रबोधन करतो.या शिकवणी विश्वाच्या समस्त मानवासाठी सामान्य आहेत.स्वत: मानवाच्या व्यक्तीत्वाच्या अंतरंगात,त्यांच्या अस्तित्वात आणि ब्रम्हांडात पसरलेल्या शेकडो निशाण्या या वास्तविकतेची पुष्टी करतात.कुरआन त्यांच्यावर विचार चिंतनाचे आवाहन करतो. मानवासाठी चांगुलपणाचा आणि शांती मार्ग हा आहे की तो म्हटल्या जाणाऱ्या गोष्टीस लक्षपूर्वक श्रवण करतो, त्यानंतर प्रमाणाच्या आधारावर त्याच्या बरोबर किंवा चूक. असण्याची तपासणी करतो.स्वत:च्या भलाईचा दृष्टीगत स्वीकार करतो. अल्लाहची आज्ञा आहे म्हणून (हे पैगंबर (स.)) खूशखबर द्या. माझ्या त्या दासांना जे म्हणणे लक्षपूर्वक



ऐकतात आणि त्यातील उत्तम पैलूंचे अनुसरण करतात. हे ते लोक होत ज्यांना अल्लाहने मार्गदर्शन प्रदान केले आहे आणि हेच बुद्धीमान आहेत (कुरान,सूरह--३९, अज् जुमर, आयत --१७--१८)

एकंदरीत मूळ कुरआनच्या अध्ययनासाठी, आकलनासाठी तसेच त्यातील मार्गदर्शनाच्या योग्य व प्रामाणिक अंमलबजावणीसाठी हा ग्रंथ कोणाही वाचकासाठी अतिशय उपयुक्त ठरेल असा आहे.ज्या व्यक्तीला कुरआन म्हणजे काय हे समजून घेण्याची इच्छा आहे तिला हा छोटासा ग्रंथ नक्कीच आवडेल. कुराणातील सर्व महत्त्वाचा भाग या ग्रंथात थोडक्यात दिलेला आहे. हेच या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. या ग्रंथाचे मुखपृष्ठ, आकार , कागदाचा दर्जा, अक्षरांचा आकार (टाईप) या सगळ्या गोष्टी. आकर्षक आहेत. या ग्रंथाचे समर्पण (अर्पण पत्रिका) त्या समस्त बंधू-भगिनींच्या नावे आहे ज्यांनी दिव्य कुरआनास विशिष्टप्रकारे मुसलमानांचा धार्मिक ग्रंथ समजून अद्यापपर्यंत त्यांचे अध्ययन करणे स्वत:साठी आवश्यक समजले नाही. शेवटी मला या ग्रंथाचा परिचय करून देण्याची संधी दिल्याबद्दल सर्व संबंधितांचे मी मनापासून आभार व्यक्त करते.

विलास कुडके
मो.९२७१६५०४७९

दुर्मिळ पुस्तके

कागदी होड्या

लेखक – बा.भ. बोरकर



कागदी होड्या हा बा भ बोरकर यांचा १९३८ मध्ये प्रथम आवृत्ती व ५/१२/२००९ मध्ये सुविधा प्रकाशन, सोलापूर मार्फत द्वितीय आवृत्ती निघालेला आणि सध्या आऊट ऑफ प्रिंट दुर्मीळ झालेला लघुनिबंध संग्रह. अवघ्या ६६ पृष्ठांचा व मूल्य रु ६० असलेला. या संग्रहात २१ लघुनिबंध असून अनंत काणेकर यांची प्रस्तावना आहे. अगदी आटोपशीर छोटे छोटे हे लघुनिबंध आहेत.

कागदी होड्या या लघुनिबंधात बालगोपाळांना जसे पावसाचे दिवस भारी प्रिय असतात तसे ते लेखकालाही होते. पावसाळी दिवसांचे सुंदर वर्णन त्यांनी केले आहे. गुडघाभर तळं साचलं की ते कागदी होड्या करण्यात गुंतून जात. या होड्यांना ना इच्छित स्थळ ना प्रवासी पण त्यातून अज्ञात प्रवास करणे आनंदाचे होते. आजही पाऊसाबरोबर मन बागडते. होड्यांचा फोलपणा भंगुरता सर्वांना ठाऊक आहे पण म्हणून आत्महत्या करायची की अधिक आनंद करायचा असे ते विचारतात!

राशिभविष्य या लघुनिबंधात भविष्यावर विश्वास नाही पण वृत्तपत्रातील राशिभविष्य वाचल्याशिवाय लेखक राहत नाही. ते सत्यात उतरते असे कोणी खात्री देत नाही. पण ते छोटीशी करमणूक करुन घेण्यासाठी असते. खोटेपणामुळेच ते मनोरंजक वाटते. ते जर बरोबर उतरले असते तर जगण्यात स्वारस्य उरले नसते. राशिभविष्यातून रमणीय तर्क करता येतो इ. महती यात सांगितली आहे.

आत्मपूजा यात मनुष्य निसर्गतः आत्मपूजक आहे पण सगळी सृष्टी त्याला तू कनिष्ठ आहेस याची जाणवीत असते. आपल्याहून प्रबळ शक्तीचा पराजय त्याला विजयसुखाचा आनंद देतो तर इतरांच्या विजयाचा प्रसंग त्याला खूपू लागतो या मनुष्यस्वभावाचे यात वर्णन केले आहे.

पडदा यात पडद्यामुळे आपण कल्पकतेने सुंदरता पाहतो. झाकल्या मुठीत सव्वा लाखाचे धन पाहतो. जे सुसाध्य नाही त्या वास्तवतेवर आपण कोणता ना कोणता पडदा टाकत असतो. आशेच्या पडद्यामुळे भविष्यकाळ मनोरम वाटतो इ. सुंदर विवेचन केले आहे.

अलिखित चरित्रे व अनामिक महात्मे यात लेखकाला लहानपणी त्यांचे बाबा चरित्रे व आत्मचरित्र वाचायला देत. मोठी माणसे सगळ्या आयुष्यात एकदाही कशी चुकत नाही असा त्यांना प्रश्न पडे. बाजारी जगाचे जसे त्यांना अनुभव येऊ लागतात तसे त्यांना ही चरित्रे भ्रामक व अर्धसत्य असल्याचे जाणवू लागते. अलिखित चरित्रेच सर्वस्वी सत्यपूर्ण आहेत व तिच जगाला प्रेरक होतात असा विचार यात मांडला आहे.

भांडणारे आंधळे तत्वज्ञानाचा उपयोग पुष्कळ लोक झोपेचे औषध म्हणून करतात. लेखकाला मात्र ती लाफिंग गॅससारखी वाटते. जगाच्या अंतिम सत्याबद्दल शिरा ताणून भांडणारे तत्वज्ञ डोळ्यापुढे उभे राहिले की त्यांना हसू फुटते. आपण सगळेच या जगात जन्मांध प्रवासी असून आयुष्याच्या अनंत प्रवासात सोयीसाठी आपण तत्त्वज्ञानाच्या काठ्या घेऊन चालत असतो. आपण सगळेच आंधळे आहोत अशा समजुतीने वागणारा मनुष्य लेखकाला शहाणा माणूस वाटतो. रुचेल ते गाणे म्हणत राहावे मग ते जगाच्या दृष्टीने अर्थशून्य असले तरी चालेल असे विचार यात मांडले आहेत.

त्यागाचा मोबदला त्यागाचा मोबदला त्यागातच असतो. एवढीशी गोष्ट केली तर फार मोठे शतकृत्य केले अशी आपण समजूत करुन घेतो व त्याबद्दल सगळ्या जगाने ऋणी मनाने आपणावर पुष्पवृष्टी करीत राहावी अशी अपेक्षा करीत राहतो. तसे नाही केले की डोक्यात राख घालून जगाला शिव्या हासाडायच्या अशी आपली वृत्ती होऊन बसते. माझा स्वार्थत्याग हा स्वार्थत्यागच नव्हे, मी केवळ विशाल जीवनाच्या प्रतीतीसाठी राजकारणाच्या आखाड्यात उतरलो '' हे जवाहरलालजींचे उद्गार लेखकाला साधे, सुंदर व समर्थ तत्व वाटते.

भली माणसे व भयंकर माणसे अहंमन्य लोक सगळी मानव जात दोन वर्गांत विभागीत असतात:भली माणसे व भयंकर माणसे. आपण दिसलो की माना वाकवणारे ते 'भले' व तंगड्या मुरगळू पाहणारे ते 'भयंकर'. भली माणसे आणि भयंकर माणसे याचे मार्मिक विवेचन यात केलेले आहे!

मनाचे चोर आपण सगळे मनाचे अट्टल चोर आहोत. प्रत्यक्षात न मिळालेली सगळी सुखे आपण मनाने रात्रंदिवस चोरीत असतो. चेहर्यावर मात्र साळसूदपणाचा भाव राखण्याची पराकाष्ठा करीत असतो.

लेखकांचे तीन वर्ग लेखकांचे तीन वर्ग असतात. काही आपल्या पुस्तकांहून लहान असतात. काही त्यांच्या समान असतात तर काही त्यांच्याहून कितीतरी पटीने मोठे असतात. पहिल्या वर्गाचा लेखक आपली पुस्तके डोक्यावर घेऊन त्यांच्या भाराखाली वाकलेला दिसतो, दुसरा ती कौतुकाने चाळीत असताना दिसतो, तर तिसरा त्यांच्या चौथर्यावर उभा राहून जगाकडे पाहत असताना दिसतो. यात तिघांचे मार्मिक दर्शन घडते.

गोल्ड फ्लेक इतर सिगारेटस या फशी पाडणार्या 'फटाकड्या' असल्या तर गोल्डफ्लेक ही हृदयंगम सात्विक 'फुलराणी' आहे असे लेखक यात म्हणतो धुराच्या चंचल वेलींबरोबर परिभ्रमण करताना लेखकाला त्यांची कल्पना आकाश व्यापीत आहे. त्या विस्तारांत लय पावणार्या वलयात त्यांना नश्वर जीवनाची विशालता दिसते. त्यांच्या बोटांना एकाएकी चटका बसतो. सिगारेट केव्हाच जळून गेली होती. राख इतस्ततः सांडली होती. यात नकळत तत्वज्ञान मांडले आहे.

जाणती पिढी जुन्या पिढीतली प्रत्येक व्यक्ती वयाच्या दाखल्यावरुन जगातल्या सगळ्या ज्ञानभांडारावर अधिकार सांगत सुटते. कालपर्यंत आपण मूर्ख होतो हे ज्याला समजते त्यानं आज आपण सर्वस्वी शहाणे झालो असे समजणे, हा महामूर्खपणा आहे. प्रत्येक वयाचा असा एक एक शहाणपणा असतो आणि तो त्या त्या वयाचं सुख निर्माण करण्यास पुरेसा असतो. त्या त्या वयाच्या शहाणपणात किंवा मूर्खपणात जीवनातलं सगळं काव्य, सगळं स्वारस्य सामावलेलं असतं असे सुंदर विचार यात मांडले आहेत.

पूर्णतेची तहान मनुष्य हा स्वभावतः टवाळखोर प्राणी आहे.आपणाला पूर्णतेचा साक्षात्कार हवा असतो. स्वभावत:आपण पूर्णतेचे उपासक आहोत. प्रामाणिक टीकाकार हा पूर्णतेचा उपासक असतो. पूर्णतेच्या तहानेनं जो तो व्याकुळला आहे असा सुंदर विचार यात मांडला आहे.

काळोख प्रकृतिभेदानुसार काळोखाचे अनेकांवर अनेक परिणाम होतात. लेखक अशावेळी अंतर्मुख होतो. काळोखाचे भय वाटले तरी सरावाने गाढ अंधारांतले नक्षत्रमंडित आकाश पाहून अस्पष्ट विचारांच्या असंख्य चांदण्या लकलुकतात. काळोख, दु:ख व मरण यात विलक्षण साम्य आहे. लेखकाला अंधारावर स्तोत्र लिहावंसं वाटलं.

पोट आणि हृदय पोटाला अर्धपोटी ठेवल्यामुळे ते स्वतःची भूक भागवण्यासाठी हृदयाचे लचके तोडत असतं, त्यामुळे हृदय नामशेष होत चालले आहे. त्यामुळे हृदयाचा ओलावा नाही, स्मित नाही, डोळ्यांत परदु:खाने आसू नाही असे चित्र लेखकाला दिसते. पोट आणि हृदय यातील लढा यात मांडला आहे.

मरावं कसं 'जगावं कसं' हा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडवता न आल्याने कितीतरी दुबळे जीव 'मरावं कसं' हा प्रश्न सोडवीत असतात. ग्राशॉफ एक परागंदा रशियन म्हातारा पणजीत होता. तो वारला तेव्हा त्याचं मृत्यूपत्र आढळलं. आपलं जे काय सामानसुमान किंवा कपडालत्ता असेल तो विकून त्याचं उत्पन्न कुष्ठपीडितांच्या रुग्णालयास देण्यात यावं, आपला तिकिटसंग्रह मोफत वाचनालयात ठेवावा आणि आपला देह मेडिकल कॉलेजला द्यावा असे त्यात त्याने लिहिलेले होते. मरावं कसं हा प्रश्न त्याने किती उद्बोधक व विचारप्रक्षोभक पध्दतीने सोडवला होता याचे दर्शन यात घडवले आहे.

जुन्या घराची दुरुस्ती एकवेळ खटला लढवणं पुरवलं पण हे घरदुरुस्तीचे काम नको. मजूर, सुतार, गवंडी या सगळ्यांची गांथन गोवणं म्हणजे आवळ्याची मोट बांधण्यासारखे! संस्कारक्षमतेच्या अभावी मोडकळीस आलेलं जुनं घर तात्यांना सावरावेसे वाटते तर संस्कारक्षमता जोमात असल्याने बापूनं नवं घर बांधल्यास त्यात तात्यांची जास्त गैरसोय होईल असे विचार यात मांडले आहेत.

मखमली ठिगळे स्वत:ची छिद्रं लपविण्याची दीक्षा जगच आपल्याला देत असते. भोक दिसलं की बोट घालून ते मोठे करण्याचा मोह जगाला अनावर होत असतो. माणसं परस्परांशी वागतांना आपली स्वभावछिद्रं लपविण्याची शिकस्त करीत असतात. जगाच्या सहानुभूतीशून्य वृत्तीमुळे त्यांना तसं वागावं लागतं. छिद्रं लपवण्याच्या खटाटोपात सगळी शक्ति खर्च करण्यापेक्षा त्यांना टाके मारावे किंवा ठिगळं जोडावी असे लेखक सांगतो. उगीच सुती कपड्याला मखमली ठिगळं जोडून हास्यास्पद होण्यात काय अर्थ?

थोरांचा गुरु दिव्य दृष्टि प्राप्त झाली म्हणजे 'साध्याही विषयांत आशय कधी मोठा किती आढळे' लेखकाला अशी दृष्टी लाभल्यावर डुक्कर हा प्राणी संतांचा व पर्यायाने आमचाही भाऊ असल्याचे कळते व ते त्याच्याकडे आपुलकीने पाहू लागतात. आपुलकीमुळे सामान्यपणे कुरुप व बेढब गणला गेलेला प्राणी लेखकाला सुंदर वाटू लागतो. त्याच्यातील सदुणांमुळे तो अनेक थोरांचा गुरु शोभतो असे खुसखुशीत चिंतन यात केले आहे.

मूर्तिभंजक प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगात 'गझनीचा महम्मूद' अंशतः तरी असतोच. तो बालपणांत दिग्विजयाची अनंत सुखस्वप्ने चितारतो. पहिल्या पिढीच्या मूर्ति दुसर्या पिढीने फोडायच्या व त्याजागी आपल्या नव्या मूर्तीची स्थापना करायची व तिसऱ्या पिढीने पहिलीच्या मूर्तींचे उध्वस्त अवशेष महत्प्रयासाने गोळा करुन जतन करायचे हा आपला इतिहास आहे असे सखोल चिंतन यात केले आहे.

दु:खाचा शोध मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू तो स्वतःच आहे या वि. स. खांडेकर यांच्या सुखाचा शोध या लेखातील वाक्याने लेखक दु:खाचा शोध यावर चिंतन करतात. मार्क्स किंवा लेनिन यांची माणुसकी मोठी म्हणूनच तिने अचाट कल्पकता व विशाल सहानुभूती या आपल्या दोनही हातांनी मानवजातीला पोटाशी कवळले. दोन दयेचे घांस टाकून त्यांनी आत्मवंचना करुन घेतली नाही. दु:खाचा शोध घेण्याचे पवित्र कर्तव्य टाळलं नाही म्हणूनच ते मानवजातीचा प्रश्न सोडवू शकले.

अनंत काणेकर यांनी बोरकर यांच्या लघुनिबंधांचे ठळक वैशिष्ट्य सांगितले आहे ते त्यांची गोड काव्यमयता! ऊर्मिगीते (श्रीळली) लिहिणारे ते उत्तम कवी आहेत ;आणि लघुनिबंध लिहितांनासुध्दा त्यांच्यातला कवी अधूनमधून जोराने उसळी मारल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या काव्यमयतेला तत्त्वचिंतनाचा गाभा आहे. हा लघुनिबंध संग्रह सुखद व आल्हाददायक आहे!

डॉ.कांचन परांजपे
मो.८६२३००९२४४

आरोग्यवर्धिनी

वर्षभर अनेक सण समारंभांसाठी पुरण पोळी हे लाडक पक्वान्न .पक्वान्नांचा राजा च जणू. ही पुरणपोळी आरोग्यासाठी नेमकी कशी उपयुक्त हे आपण बघू. पुरण पोळीला तमिळमध्ये परुप्पू पोली, कन्नडमध्ये होलिगे किंवा ओब्बट्टू, कोकणीमध्ये उब्बती अशी विविध प्रादेशिक नावे आहेत. प्रदेशानुसार चव देखील बदलते. हि गोड असून पराठांसारखी गोलाकार असते.सारणाला पुरण म्हणतात आणि पराठासारख्या भाकरीला पोळी म्हणतात. पण जर तुम्हाला पुरणपोळी खाणं आरोग्याच्या दृष्टीने योग्य वाटत नसेल तर थांबा....थोडा विचार करा. प्रत्येक पदार्थाचे गुण आणि तोटे असतात. पुरणपोळी हा उच्च कॅलरी असलेला पदार्थ आहे . आणि हा आरोग्यदायी बनवणे तुमच्यावर अवलंबून आहे. मैदा ऐवजी संपूर्ण गव्हाचे पीठ वापरा, तूप कमी वापरा.

पुरण पोळी : खावी की नाही?

पुरण पोळीचे आरोग्यदायी फायदे :

संपूर्ण गव्हाच्या पीठाने बनवलेल्या पुरण पोळीमध्ये कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट, फायबर, बी कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे, विशिष्ट खनिजे असतात. आपल्या सर्वांना माहीत आहे की, डाळ चांगल्या प्रमाणात प्रथिने देते, तुम्हा सर्वांना हे जाणून आश्चर्य वाटेल की तृणधान्ये म्हणजेच गव्हाचे पीठ आणि डाळीतील प्रथिने यांचे हे मिश्रण तुम्हाला इतकी चांगल्या दर्जाची प्रथिने देतात की ,ज्याची तुलना अंड्याशी केली जाऊ शकते. जे जवळजवळ १००% उपलब्धता म्हणजेच उत्कृष्ट गुणवत्तेसह उच्च जैविक मूल्य मानले जाते. हे कॉम्बिनेशन आवश्यक ते अमीनो ऍसिड निर्माण करते ज्याने प्रोटिन्स चा पाया उभारला जातो. आणि त्यात भरपूर गूळ असल्याने लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, फॉस्फरस मिळते. साखरेपेक्षा गुळ वापरल्याने जास्त ऊर्जा मिळते. गूळ पचनास देखील मदत करतो. हिरवी वेलची पावडर, केशर, जायफळ पावडर, ज्यामध्ये आवश्यक अस्थिर तेले आहेत जी पचनशक्ती वाढवतात आणि अँटीस्पास्मोडिक, तसेच anti-inflammatory आणि anti-microbial म्हणून काम करतात..तर अशी ही पुरणपोळी कोणत्याही पदार्थाचा पोर्शन कंट्रोल केला की तो कधीच हानिकारक होत नाही.तसेच नेमके पुरणपोळी चे .योग्य प्रमाणात योग्य पद्धतीने पुरणपोळी खाल्ली तर ती लाभदायकच.

–प्रशान्त सहस्रबुद्धे
बदलापूर, मो.८७७९२९८१६१

पाणी समस्या आणि उपाय

प्रत्येक जीवा ला जगण्याकरता शुद्ध हवा, पाणी आणि अन्न किम्म्हा भोजन आवश्यक आहे. काही वर्ष आधी कोरॉना मध् हर्रूयि प्राणवायु ची किंमत आपल्याला कळली आणि त्याची कमतरता आणि अशुद्धते मुळे मनुष्याचे फुफ्फुसे(श्रींपसी) कमजोर झाले आणि त्यामुळे बरेच लोक दगावले.प्रकृतीने आम्हाला पर्यावरण कसे शुद्ध ठेवावे हे शिकवले. आता नवीन समस्या पुढे उभी आहे ती म्हणजे पिण्याचे शुद्ध पाणी ज्यामुळे प्रत्येक जीवा च्या आरोग्य वर त्याचा परिणाम होणारच आणि त्यात असलेल्या पाण्याची कमतरता.

पृथ्वी वर दिवसेंदिवस तापमान वाढत आहे आणि पिण्याचे पाणी कमी होत चालले आहे. मागच्या वर्षीपासून साऊथ आफ्रिका मधील केपटाऊन शहरात पाणी समस्या आहे आणि तेथील सरकारने जनतेस पाणी देण्यास असमर्थता दर्शवली आहे.तिथे २० लिटर पाणी प्रती व्यक्ती वितरण सैन्याच्या संरक्षणात होत आहे.अंघोळी वर तर बंदी आहे.

पाणी रोज आम्हाला पिण्याकरता, स्वयंपाकासाठी, धुणे,शेतात,पशु पक्ष्यांना, कूलर, उद्योग आणि बऱ्याच ठिकाणी लागत आहे.काही वर्ष आधी चैन्नई मध्ये पाण्याचा तुटवडा पडला होता आणि आता बंगळुरू हैदराबाद ला पण ही सुरुवात झाली आहे,बऱ्याच कंपन्यांनी घरून काम करण्याची मुभा दिली आहे.

मोठ्या शहरात टेंकर ने पाणी म्हणजेच बोरिंग चे पाणी येत आहे, भुजलस्तर हळू हळू खाली

जात आहे आणि पाणयाची गुणवत्ता पण ढासळत आहे. नद्या फक्त पावसाळ्यातच दिसणार.आता पाण्याची ही समस्या दिवसेंदिवस वाढणार आहे आणि वेळीस त्या वर सर्वांनी उपाय केल्यास आम्ही पाणी आणि जीवनाला वाचवू शकू.

या साठी काही उपाय करणे गरजेचे आहे.

१.पाण्याचा वापर करताना त्याच्या बचतीचा विचार प्रत्येकाच्या मनात असावा.

२. पावसाळा आधी प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्या आपल्या गच्ची वर उभ्या झाकण काढून ठेवा जेणे करून पावसाचे पाणी त्यात एकत्र होईल.

३.ठज तून निघालेले पाणी, लादी पुसायला,कूलर साठी वापरावे.

४.वॉशिंग मशीनचे पाणी पण कूलर साठी वापरावे.

५.–उ तून निघणारे पाणी पण एकत्र करून बागीच्यातील झाडांना वापरावा.

६.प्यायला पाणी तेवढेच घ्यावे जेवढे हवे असेल.

७.वाशबेसिन च्या नळांना वॉटर स्प्रे लावावे.

८. पावसाच्या पाण्याचे उपयोग करावे आणि जास्त झाल्यास जमिनीत जाऊ द्यावे त्याने भूजलस्तर वाढण्यास मदत होईल.

९.पाण्याचे नळ जिथे गळती होत असेल तर ते वेळीस दुरुस्त करावे.

१०. कॉंक्रिटीकरण वाढत असल्याने पाण्याचा अपव्यय तिथे वाचवावा कारण पाणी वाश्पीकृत होऊन फुकट जाऊ देऊ नका.

११.शक्योतर पाणी वाचवा आणि पाणी जिरवा.

१२.उन्हाळ्यात खाल्लेले आंबे,चिकू, जांभळं यांच्या बिया पावसाळ्यात जरूर लावा याने रस्त्या लगत झाडे लागतील आणि पाण्याचा जमिनी खाली वाढेल.

अर्जुन जाधव,
ठाणे, मो.७५०६०७०४५९

चला व्यसनमुक्त समाज घडवू या..

आज समाजात व्यसनाचे प्रमाण दिवसेंदिवस खूपच वाढत चालले आहे. व्यसनामुळे समाजातील अनेक कुटुंबाचा होणारा विकास खुटीत झाला आहे. व्यसन नावाचा महारोग समाजाला आतून बाहेरून एखाद्या किडयासारखा पोखरून काढत आहे. समाजात व्यसनाच्या आहारी, स्वाधीन झालेली तरूणपिढी जास्त प्रमाणात आढळत असून सुशिक्षित व उच्च सुशिक्षित तरूण बेरोजगारीमुळे व्यसनाच्या आहारी गेलेला पाहायला मिळत आहेत. समाजात तरूणाचे व्यसनाच्या स्वाधीन होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस खूपच वाढत असलयामुळे भविष्यात समाजाला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील, खेडयापाडयातील शाळा, कॉलेजमध्ये शिकणारी मुले ही व्यसनापासून दूर नाहीत. सरास शाळा, कॉलेजमध्ये शिकणारी मुले आणि मुली लपून छपून मौजमजा म्हणून दारू पिताना, सिगरेट ओढताना, गुटखा, तंबाखू खाताना,गांजा, चरस सेवन करताना आढळत आहे. हीच मुले काही कालांतराने पुर्णता: व्यसनाच्या आहारी गेलेली,बळी पडलेली दिसून येतात. खरंच ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

दारू पिलयाने शरीरातील लिवहर खराब होतो.सिगारेट ओढलयाने,तंबाखू खाल्याने कॅन्सरसारखया भयानक रोगाला आमत्रंण दिले जाते हे माहित असूनही अजून काही समाज व्यसनापासून दूर होताना दिसत नाही.

या व्यसनामुळे समाजातील कित्येक कुटुंब लयाला गेली आहेत.उद्धस्त झालेलीआहेत. अनेकांनी व्यसनाच्या नादी लागून आपली वडिलोपारजित शेती,घर विकून आपल्या बायका मुलांना, कुटुंबाला अक्षरशः रस्त्यावर आणले आहे. अनेक कुटुंब आपला संसार रस्त्यावर थाटून जीवन जगताना पाहायला मिळत आहेत.

व्यसनमुक्त समाज करण्यासाठी सरकारसह अनेक व्यसनमुक्ती संस्था, संघटना, सामाजिक कार्यकर्ते समाजात सदैव जनजागृती व जन प्रबोधनाचे कार्य करत आहेत. तरी समाजाच्या विविध स्तरातील,तळागाळातील काही लोक, तरूणपिढी व्यसनापासून म्हणावी तेवढी मुक्त होताना दिसत नाही. आता व्यसनमुक्त समाज करण्यासाठी, घडविण्यासाठी फक्त सरकार अथवा व्यसनमुक्त संस्थावर अवलंबून न राहता प्रत्येक शाळा, कॉलेज, गावपातळीवर व्यसनमुक्तीची चळवळ उभा करून समाजाच्या

तळागाळापर्यंत जाऊन व्यसनमुक्ती संदर्भात कार्य करणे खूप गरजेचे आहे. आपले गाव कसे व्यसनमुक्त होईल यासाठी गावच्या संरपच व ग्राम पंचायतीने जास्त पुढाकार घेऊन अगदी तळमळीने, सामाजिक हिताच्या दृष्टीने व भावनेतून व्यसनाच्या विरोधात लढा उभा करणे काळाची गरज आहे. आणि हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजाच्या हितासाठी प्रत्येकानी व्यसनमुक्तीच्या चळवळीत सामील होणे हितदायक आहे. आपण सर्व मिळून समाज व्यसनमुक्त करू शकतो. अशी प्रखर विवेक बुद्धी प्रत्येकाच्या मनात, हृदयात निर्माण व्हायला हवी.मग व्यसनमुक्त समाज निर्माण करायला, घडवायला वेळ लागणार नाही. त्यासाठी प्रथम प्रत्येकाने आपल्यापासून ,आपलया घरापासून सुरवात करणे गरजेचे आहे.

सोड गड्या सोड तू
व्यसनाचा नाद,
संसार कर सुखी
नाही तर होशील बरबाद...

चला तर आपण सर्व मिळून, हातात हात घट्ट पकडून व्यसनरूपी राक्षसाचा नायनाट करू या. या जगाच्या पाठीवर आपलं घर,आपलं राज्य, आपला देश व्यसनमुक्त करू या..जगापुढे आदर्श ठेवू या.. व्यसनमुक्तीच्या चळवळीत, लढ्यात सहभागी होऊ या..चला व्यसनमुक्त समाज घडवू या....?

चांगला माणूस

एक ६ वर्षाचा मुलगा आपल्या ४ वर्षाच्या लहान बहिणीसोबत बाजारातून जात असतो. अचानक त्याला जाणवते की त्याची बहीण मागे राहिली आहे. तो थांबतो व मागे वळून पाहतो तर त्याला दिसते की, त्याची बहीण एका खेळण्याच्या दुकानासमोर उभी राहून अतिशय कुतूहलाने काहीतरी पहात आहे. तो मुलगा मागे जातो व तिला विचारतो, तुला काही हवे आहे का? ती एका बाहुलीकडे बोट दाखविते. तो मुलगा तिचा हात धरतो व एका जबाबदार मोठ्या भावा प्रमाणे तिला ती बाहुली देतो. ती बहीण अत्यानंदीत होते.... हे सर्व तो दुकानदार पहात असतो व त्या मुलाचे प्रगल्भ वागणे पाहून आश्चर्यचकित होतो.....आता तो मुलगा काउंटर कडे येतो व त्या दुकानदाराला विचारतो सर, किती किंमत आहे या बाहुलीची? दुकानदार एक शांत माणूस असतो व त्याने जीवनाचे अनेक चढ उतार पाहिलेले असतात. तो त्या मुलाला प्रेमाने व आपुलकीने विचारतो बोल तू काय देशील ?

मुलगा आपल्या खिशातील सर्व शिंपले जे त्याने व त्याच्या बहिणीने नुकतेच समुद्रकिनाऱ्यावर गोळा केलेले असतात ते बाहेर काढतो व दुकानदाराला देतो. दुकानदार ते घेतो व जणूकाही पैसे मोजत आहे या अविर्भावात मोजायला सुरु करतो. शिंपले मोजून झाल्यावर त्या मुलाकडे पाहताच मुलगा म्हणतो कमी आहेत का ? दुकानदार म्हणतो नाही नाही, हे बाहुलीच्या किमतीपेक्षा जास्त आहेत. ज्यादाचे मी परत करतो. असे म्हणून तो केवळ ४ शिंपले घेतो व बाकी सर्व शिंपले त्याला परत करतो. मुलगा एकदम आनंदात ते शिंपले आपल्या खिशात ठेवतो व बहिणीसोबत निघून जातो. हे सर्व त्या दुकानातील कामगार पहात होता व त्याने आश्चर्याने मालकाला विचारले, मालक ! इतकी महागडी बाहुली तुम्ही केवळ ४ शिंपल्यांच्या मोबदल्यात दिलीत ? दुकानदार एक स्मित हास्य करीत म्हणाला, आपल्यासाठी हि केवळ शिंपल आहेत. पण, त्या मुलासाठी हि शिंपले अतिशय मौल्यवान आहेत. आणि आत्ता या वयात त्याला नाही समजणार पैसे काय असतात. पण जेंव्हा तो मोठा होईल ना, तेंव्हा नक्कीच समजेल. आणि जेंव्हा त्याला आठवेल कि आपण पैश्यांच्या ऐवजी शिंपल्यांच्या मोबदल्यात बाहुली खरेदी केली होती, तेंव्हा त्याला माझी

आठवण होईल आणि तो हा विचार करेल कि हे विश्व चांगल्या माणसांनी भरलेले आहे. हि गोष्ट त्याच्यातील सकारात्मक दृष्टीकोन वाढण्यासाठी मदतीची ठरेल आणि तो सुद्धा चांगला माणूस बनण्यासाठी प्रेरित होईल.

****

सौ.सुमती पवार
मो.९७६३६०५६४२

गाव माझे सुंदर

कापडणे

विधीलिखित माहित असते तर?

कोणी केव्हा कुठे कसा जन्म घ्यावा हे कुणालाही माहित नसते. विधिलिखित म्हणतात ते हेच, पण ह्या कुठेतरी जन्म घेण्याने परिस्थितीत जमिनअस्मानचा फरक पडतो हे खरे नाही का? झोपडीत व महालात जन्म घेण्यात हाच तर फरक आहे ना? विचारले असते तर कोणीच झोपडीत गेला नसता, पण विचारते कोण? मला नेहमी वाटते, मी माझ्या ह्या कापडण्याच्या घरात जन्म घेतला नसता तर..? आमच्या राहत्या घरासमोर हातावर पोटभरणारे कुटुंब रहात होते. तिथे जन्मली असती तर? बाप रे? कल्पनेनेही काटा येतो अंगावर.. कुठे माझे स्वातंत्र्य सेनानी वडिल व

कुठे ती पोटासाठी दिवसभर शेतात राबणारी, रोजंदारी सालदारी करणारी माणसे व तुलनेने रोज पोटभर भाकरी खाणारे शेतवाडी असणारे सालदार ठेवणारे आम्ही! पण त्यांनी तरी ते जीवन निवडले होते का? नाही, ते त्यांच्या वाट्याला आले होते न मागता? मग आम्ही सुस्थितीत होतो हे आमचे नशिब का? त्यांनी काय कुणाचे घोडे मारले होते? किंवा त्यांचे प्रारब्ध काय होते हे तरी त्यांना कुठे ज्ञात होते? ना त्यांना ना आम्हाला! मग हा दैवाचा खेळ म्हणून सोडून दिला तरी त्रास होणाऱ्याला होतोच ना? त्याची कुठे सुटका होते, त्याचा दोष काय? हे ही त्याला माहित नसते मग असे का? हा प्रश्न मला नेहमी पडतो व बालपणीचे ते दिवस आठवून जीव कासाविस होतो. कारण त्या घरातच माझी समवयस्क व माझ्याशी दररोज खेळणारी माझी मैत्रिण होती ना?सुमन तिचे नाव. मध्ये काही वर्षांपूर्वी आम्ही मुंबईला गेलो असता दादरच्या पुलावर ट्रेनसाठी उभे होतो. वरून दादऱ्यावरून एक दृश्य पाहिलेले इतक्या वर्षांनंतरही माझ्या नजरे समोरून हटत नाही.एक भिकारीण, कडेवर मुल , खांद्यावर मुल. हातात जाड सामानाचे ओझे, जवळ दोन दोन वर्षांची असतील ती दोन मुले जी नुकतीच चालायला शिकली असतील ती एक जड पिशवी एक एक नाडी पकडून उचलून चालत होते. ज्यांना कडेवर घ्यावे ते न पेलवणारे ओझे वहात होते.

गरीबी माणूस मागत नाही ती न मागता वाट्याला येते ती कां? हा प्रश्न माझ्या घरासमोरच्या मैत्रिणी बाबत मला नेहमी पडतो कारण अवघ्या पंधराव्या वर्षी परकरात असतांनाच तिचे लग्न लावून दिले गेले. त्या नंतर मी किती तरी वर्षे शिकत होते नि बिचारी संसाराला लागली होती.नवरा काय वयाचा होता माहित नाही. पण मी धुळ्याला शिकायला आले नि ती मात्र संसाराला लागली. पुढे गडबडीत भेटही झाली नाही.तीन भाऊ होते तिचे. आईचे नाव नबामाय. शेतात मजुरी करायची. व आमच्याघरी पण वेळी अडचणीला आईला मदत करायला यायची. मी नेहमी पाय पोटऱ्या दुखल्या की तेल घेऊन समोरच असलेल्या तिच्या (भाड्याच्या) घरात जाऊन पोटऱ्या मालिश करून येत असे.आता वाटते, तेव्हा तिचा हात दुखला नसेल काय? तिचे भाऊ(आता नावे आठवत नाहीत)आलटून पालटून आमच्या घरी सालदारकी करत असत.गरिबीत पडणारे वरील हे प्रश्न त्यांना पडले तरी विचारणार कोण? आणि उत्तर देणार कोण? आणि उत्तर देणार काय? सारेच प्रश्न अनुत्तरीत.गरीबी साऱ्यांनाच अनुत्तरीत करते.

समोरच घर असल्यामुळे परकरातील पाच सहा मुलींचा आमचा ग्रूप आमच्या शेजारच्याच बाबाजींच्या देवडीत दिवसभर आम्ही भातुकली विहिणी विहिणी बाहुल्याचे लग्न पायाला बाभळीच्या शेंगा बांधून जोडवे बनवणे, आमच्या घरी आईकडे पितळेचा सुंदर भांड्याचा सेट होता. अगदी सुबक छान छान पोळपाट लाटण्यापासून सांडशी पर्यंत छान भांडी जी पुढे मामेबहिणीला दिली.असे गुळ चुरमुरे घेऊन शेंगदाणे घालून आम्ही खेळ खेळत असू. दिवस पुरत नसे. दुपारी मुद्दाम मला कुशित घेऊन आई आडवी व्हायची पण थोड्याच वेळात मी पसार होत असे.सुमन कुसुम इंदू असा पाचसहा जणींचा आमचा ग्रूप होता. वाड्यात आम्ही आंब्याची कोय बित्तू बित्तू म्हणून व चिंचोके खेळत असू. सागरगोटे खेळत असू.मागे पांढरीत जाऊन साबरकांड्याची लाल फळे खाणे, असे आमचे उद्योग चालत असत.

चांगल्या घरात जन्मल्यामुळे (किंबहुना नशिब म्हणू या)बघा परिस्थितीत किती फरक पडतो. ज्या काळात,शिकिसन काय करनं से? वावरम्हाज जानं से नां? अशा काळात वडिलांनी मला न शिकवता लग्न करून टाकले असते तर? नाही, ते तर अत्यंत पुरोगामी विचार सरणीचे होते, आम्हा चारही भावंडांना त्यांनी ही शिक्षणाची संपत्ती बहाल करून खरेखुरे श्रीमंत केले.. अन्यथा आज मी कुठे असते? विचारही करवत नाही.काही असो, शिक्षणाचे पंख माणसाला मिळायलाच हवे, ठरवले तर काही ही करता येऊ शकते, जसे मी लग्नानंतरही शिकले व आज तुमच्या समोर बडबड करते आहे.मला वाटते अज्ञानाच्या गर्तेत पडण्या पेक्षा हे बरे नाही का?

कालौघात इंदू गेली, कुसुम गेली, सुमनचे माहित नाही..एकत्र खेळणाऱ्या आम्ही पण.. आमच्या वाटा,रस्ते किती भिन्न होते पहा. मग हे ही विधिलिखीतच म्हणायचे का? काही काही प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत हेच खरे आहे, म्हणतात, अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे शोधायची नसतात. हेच बरोबर आहे.आता ही ते अंगण, समोरच्या सुमनच्या अंगणात खेटून खेटून टाकलेल्या खाटा, चांदणी रात्र, खाटेवर पडल्या पडल्या आम्ही मोजलेल्या चांदण्या, ते हसणे खिदळणे, वाऱ्याने उडणाऱ्या आमच्या अंगावरच्या गोधड्या नि सारे बघता बघता निद्रेच्या आधीन होणाऱ्या आम्ही ! कित्ती सुंदर दिवस होते हो.. ना पैशाची चिंता ना खाण्या पिण्याची..! सारे कसे आपसुक मिळत होते पण ते ही कळत नव्हतेच! ते ही किती छान होते? सकाळी सकाळी बैलगाड्यांची दडदड खडखड सुरू झाली की गोधड्या आवरून घरात पळायचे..! नि माहित नाही, आई शाळेत कशी पाठवायची? ते ही निटसे आठवत नाही. काही काही ठळक घटनाच आठवतात फक्त. असो.

कोई लौटा दे मेरे, बिते हुए दिन
बिते हुए दिन वो मेरे प्यारे पले दिन..
कोई लौटा दे मेरे बिते हुए दिन

धन्यवाद मंडळी, भेटू पुढच्या रविवारी!

विकास कपोले
मो.९४०३४२५७७७

पिवळे पान-नवे भान

साठी.. कोणा साठी..?

आयुष्याच्या डोंगरमाथ्यावरून खाली उतरायला सुरुवात झाली की पहिला टप्पा लागतो साठीचा! साठी सुरू झाली की शांतीपाठ करतात, साठी बुद्धी नाठी अश्या म्हणीपण प्रचलित आहेत.... असे काय होते नेमके साठी सुरू झाल्यावर ज्यासाठी हे सगळे? सांगू?.....साठी म्हणजे मोठे संक्रमण असते. आणि ते सोपे नसते! मध्यान्हीचा सूर्य मावळतीकडे जायला लागल्यावर जश्या सावल्या लांब जाऊ लागतात तसेच साठीचे असते.वयाच्या विशीत ज्या नोकरीची/कामाची सुरुवात केली त्याला पूर्णविराम देऊन आयुष्याच्या पूर्णविरामाकडे वाटचाल सुरू करण्याचा पहिला टप्पा म्हणजे साठी!

साठी म्हणजे निवृत्तीची सुरुवात असते. साधारणपणे या वयात येईपर्यंत मुले मोठी होऊन- नोकरी लग्न संसार या टप्प्यावर पोचलेली असतात.नातवंडे देखील आलेली किंवा येऊ घातलेली असतात. कालपरवापर्यंत काका काकू मावशी असणारे आपण अचानक आजी आजोबा श्रेणीत पोचतो! नाही म्हणले तरी त्याचा थोडा धक्का बसतोच! साठी एकदम ज्येष्ठ नागरिक श्रेणीत पोहोचवते! नाही, म्हणजे पिकलेले केस, टक्कल, सुरकुत्या यांनी रूपावर आक्रमण केलेले असतेच पन्नाशी पासून! पण आता जोडीला इझ डींसरी उहेश्रशींशीश्र ींहूीळव संधिवात हेपण काहीवेळा वात आणायला लागतात!

कलकलाट गोंगाट नको वाटायला लागतो.अचानक नवी गाणी कर्कश्श वाटू लागतात. नवीन हिरो हिरॉईन ओळखू येईनासे होतात. घराला कुलूप लावून बाहेर पडले की गॅस बंद केला होता ना, कुलूप नीट लागले ना अश्या शंका यायला लागतात. हवी तेव्हा हवी तेवढी झोप येतेच असे नाही. बहुतेक वेळा ती नको तेव्हा येते आणि हवी तेव्हा येत नाही. सकाळी निवांत उठायचे असे ठरवून देखील हमखास लवकर जाग येते.आधीसारखी चपळाईने कामे होत नाहीत. शाळेत असताना जशी शिस्त पाळावी लागायची तशी आता पथ्य पाळावी लागतात! आवडलेल्या जिलेबीच्या आग्रहाला निग्रहाने नाही म्हणावे लागते. ऑफिस मधले आपले डेस्क दुसऱ्या कोणासाठी तरी रिकामे करावे लागलेले असते.ते रिकामपण फक्त डेस्कपुरते नसून आयुष्यात उतरलय हे पचवणे सोपे नसते.अचानक आयुष्यातली धावपळ गडबड संपते. मुख्य म्हणजे ऑफिसमध्ये काय किंवा मुलांचे काय आपल्यावाचून अडणार नाही हे समजून घेणे सोपे नसते!

गृहिणींना पण अचानक घरात फक्त दोघांचा स्वयंपाक करावा लागणार आहे ही कल्पना रुचत नाही! मुलांच्या किलबिलाटाने भरलेल्या घरात आता नीरव शांतता असते. सकाळी एकदा आवरा आवरी झाली की पुन्हा वर्तमानपत्राचीसुद्धा घडी विस्कटत नाही. कालपरवापर्यंत आपल्याकडे पैसे मागणारी मुले अचानक,आईबाबा काही लागले तर सांगा असे म्हणतात तेव्हा कळते की आता आपला उमेदीचा काळ संपला. आता आलेलं रिकामेपण घालवायला नवी उमेद आणायला हवी. आपण जन्मभर ज्या मुलांच्या मागे धावलो ती आपापल्या मार्गानी उडून गेलेली असतात. मग असे वाटायला लागते संसारासाठी, मुलांसाठी जगता जगता स्वतः साठी जगायचे राहूनच गेले! पण हे जाणवेपर्यंत साठी उजाडलेली असते. जोडीदाराचा हात धरून रुपेरी वाळूतून फिरायचे दिवस जाऊन वाळूची ती रुपेरी छटा केसांना कधी आली ते कळतच नाही! आयुष्यात कधी ना कधी असा न संपणारा रिकामा वेळ येणार आहे याचा आधी फारसा विचारच कधी केला गेला नसेल तर मोठा प्रश्न असतो की करायचे काय? त्याची उत्तरे हळूहळू मिळवावी लागतात. त्यासाठी आधीपासूनच तयारी करून काही छंद जोपासले असतील तर ते काम सोपे जाते. प्रापंचिक जबाबदाऱ्या संपत आलेल्या असतात. लग्नानेसुद्धा चाळीशी गाठलेली असते! जोडीदाराबरोबरचे जगायचे राहून गेलेले क्षण जगायची ही वेळ असते!जोडीने सकाळच्या चहा नाश्त्यापासून परदेशवाऱ्यांपर्यंत सगळीकडे एकत्र राहायची हीच ती संधी! आयुष्यभर ज्या जोडीदाराने साथ दिली त्याला साथ देण्याची ही वेळ!कारण आता आयुष्याची संध्याकाळ झालेली असते! ही कातरवेळ साधायची असते!!आपल्या सावल्या आपल्याला सोडून जाण्याआधी जगण्यासाठी- स्वतः साठीआणि जोडीदारासाठीही!!

मुलानो जरूर वाचा
आपल्या पालकानां वेळ द्या

-संकलित लेख

मुलांचे कौतूक करा..!

तुमचं मुल हूशार असो किंवा नसो त्यांचे कौतुक करायला विसरू नका. रोज सकाळी उठल्यानंतर मुलांना सांगा या गोष्टी, हूशार होतील मुलं-भरपूर यश मिळवतील सध्याच्या धावपळीच्या जीवनात फक्त मोठी माणसचं नाही तर लहानमुलंसुद्धा तणावाखाली असतात. खेळात, अभ्यासात नेहमीच पहिला क्रमांक मिळवावा अशी मुलांची इच्छा असते. सकाळी उठल्यानंतर पालकांच्या तोंडून काही चांगले शब्द किंवा चांगली वाक्य ऐकली तर दिवसभराचा ताण-तणाव कमी होण्यास मदत होते. काही सकारात्मक गोष्टी मुलांचा स्ट्रेस कमी करू शकतात. सकाळची वेळ मुलांसाठी महत्वाची असते. यामुळे मेंदू जास्त वेगाने काम करतो आणि मनही एकाग्र राहते.

१) सकाळी उठल्यांनंतर मुलांना सांगा की तुमच त्यांच्यावर प्रेम आहे. मुलं सकाळी उठल्यानंतर त्यांना प्रेमाने जवळ घेऊन त्यांच्यावरील तुमचं प्रेम व्यक्त करा. तुमचे प्रेमाचे शब्द ऐकून त्यांचा पूर्ण दिवस चांगला जाईल. मुलांना सुरक्षित वाटेल आणि त्यांचा पूर्ण दिवस आनंदी जाईल.

२) मुलांना दिवसभरातील रुटीन विचारा. मुलांना सकाळी उठल्यांतर त्यांच्या दिवसभरातील रूटीनबद्दल विचारा. असं केल्यानं ते निष्क्रीय बसणार नाहीत. त्यांच्या डोक्यात सकारात्मक विचार सुरू राहतील आणि दिवसभरात काय काय करायचे आहे ते त्यांच्या डोक्यात सुरू असेल आणि त्याप्रमाणे ते आपला वेळ वाया न घालवता कामं पूर्ण करतील.

३) सकारात्मक बोला. तुमचं मुल हूशार असो किंवा नसो त्यांचे कौतुक करायला विसरू नका. कारण तुमचे कौतुकाचे २ शब्द मुलांसाठी उत्तम ठरू शकतात. यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांना नवीन गोष्टी करण्याची उर्जा मिळेल.

४) मुलांना स्मितहास्य देऊन दिवसाची सुरूवात करा. मुलांना शाळेसाठी लवकर उठवलं तर त्यांचा चेहरा उतरलेला असतो. शाळेत जाण्याची मुलांची तयारी नसते अशावेळी तुम्ही सकाळी उठल्यानंतर त्यांना स्माईल दिलं तर त्यांचा पूर्ण दिवस आनंदात जाईल आणि शाळेतही आनंदाने वावरतील.

५) शरीर हायड्रेट ठेवा. सकाळी मुलांना १ ग्लास कोमट पाणी द्या. ही सवय मुलांना लावा. सकाळी सकाळी सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी प्यायल्याने शरीर दिवसभर हायड्रेटेड राहते आणि सकाळी प्रसन्न वाटते.

६) मुलांच्या मॉर्निंग रूटीनमध्ये स्ट्रेचिंग असावं. मुलांच्या सकाळच्या रुटीनमध्ये स्ट्रेचिंगचा समावेश करा. यासाठी कमीत कमी २० मिनिटांचा वेळ नक्कीच काढा. व्यायामाने फक्त शारीरिक नाही तर मानसिक रूपानेही तुम्ही एक्टिव्ह आणि फ्रेश राहाल.

-डॉ. प्रवीण कुलकर्णी
मोटिवेशनल कौन्सिलर

नरेंद्र नेरपगार (CA)

अर्थवेध

नवीन आर्थिक वर्षात करा व्यवसायाचे प्रभावी नियोजन

नवीन आर्थिक वर्ष २०२४-२५ ला सुरुवात झालीय. लोकांसाठी आर्थिक वर्षे बदलतात. पण परिस्थिती बदलत नाही. मात्र, नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात आपल्याला आर्थिक नियोजन करण्यासाठी नवीन योजना तयार करण्याची संधी देते या नवीन वर्षात तुम्ही आर्थिक नियोजनही करणं खूप गरजेचं असतं. आजकाल छोट्या व्यवसायांसाठी आर्थिक नियोजन अत्यंत आवश्यक आहे. जसे इमर्जन्सी फंड तयार करण्यापासून ते पुरेसे विमा कवच घेणे, गुंतवणुकीमध्ये सुधारणा करणे आणि कर नियोजन करणे, आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी योजना तयार करण्याची आणि त्यावर वर्षभर काम करण्याची हीच योग्य वेळ असते.

कोणत्याही व्यवसायाचे दोन महत्त्वाचे स्तंभ म्हणजे आर्थिक नियोजन आणि व्यवस्थापन :-

आर्थिक नियोजन म्हणजे संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि दीर्घकालीन यश सुनिश्चित करण्यासाठी संस्थेच्या आर्थिक संसाधनांचे आणि क्रियाचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन करण्याच्या धोरणात्मक प्रक्रियेमध्ये सध्याच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण, योग्य आर्थिक उद्दिष्टे निश्चित करणे. आणि संसाधनांचे प्रभावीपणे वाटप करण्यासाठी रोडमॅप तयार करणे समाविष्ट आहे.

व्यवसायाचे प्रभावी आर्थिक नियोजनासाठी पुढील बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत :-

तुमच्या व्यावसायिक ध्येयांचे विश्लेषण करा :- तुमच्या आर्थिक कामगिरीवर बारकाईने नजर ठेवा आणि तुमच्या निर्धारित उद्दिष्टांशी त्याची तुलना करा. तुम्ही गेल्या वर्षी साध्य केलेल्या उद्दिष्टांवर विचार करून आणि तुमच्या दीर्घकालीन उद्दिष्टांशी त्यांची तुलना करून तुमचे व्यवसाय नियोजन सुरू करा. उद्दिष्टे SMART असणे आवश्यक आहे, म्हणजे चांगले परिभाषित, महत्त्वपूर्ण, संबंधित, कालबद्ध आणि साध्य करण्यायोग्य. जर तुमचा व्यवसाय अनियमित होत असेल, खोलवर जा आणि काय चूक झाली ते समजून घ्या, वाजवी कारणे शोधा आणि नवीन आर्थिक वर्षात ती दुरुस्त करण्यासाठी पावले उचला.

तुमच्या व्यवसायाचे मूल्यांकन करा आणि आर्थिक बजेट तयार करा :-

मागील आर्थिक वर्षात खरेदी, विक्री, विविध बाबींवर झालेला खर्च व नफा याचे मूल्यांकन करा व पुढील आर्थिक वर्षासाठी या सर्व गोष्टीचे बजेट तयार करा. समजा तुम्हाला व्यवसायाचा खर्च कमी करायचा असेल, तर आता तुम्हाला पुढील आर्थिक वर्षात खर्च कमी करण्यासाठी कोणते उपाय करता येतील हे ओळखावे लागेल. असे सर्व उपायांवर अंमलबजावणी करावी लागेल. असे केल्याने तुम्ही तुमच्या व्यवसायाची नफा वाढवू शकाल. जेव्हा तुम्ही स्वतःसाठी बजेट तयार करता, तेव्हा तुम्ही तुमच्या खर्चाचा तसेच उत्पन्नाचा मागोवा घेऊ शकता.

नवीनतम साधने आणि तंत्रज्ञान लागू करा :- बदलत्या बाजार परिस्थितीमुळे तुम्ही तुमच्या व्यवसायात तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे नवीन तंत्रज्ञान. व्यवसायाला कार्यक्षमतेने चालवण्यास मदत करत असते. प्रतिस्पर्धीपेक्षा चांगल्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास व्यवसाय वाढीसाठी चालना मिळत असते.

जबाबदारी सोपवा :-

तुम्हाला तुमचा व्यवसाय वाढवायचा असेल तर तुम्ही जबाबदाऱ्या सोपवल्या पाहिजेत. तुम्ही तसे न केल्यास, तुमच्या व्यवसायाची वाढ खुंटेल. अशा प्रकारे, सुरुवातीपासूनच जबाबदारी सोपवणे महत्वाचे आहे. एखाद्या व्यक्तीची कौशल्ये आणि समजून घेण्याची पातळी लक्षात घेऊन जबाबदारी सोपवणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीची भूमिका स्पष्टपणे ठरवून दिल्यावर संस्था स्वयंचलित मोडमध्ये चालू शकते. आणि तेव्हाच एखादी संस्था वाढते.

आकस्मिक परिस्थितीसाठी योजना करणे :- आकस्मिकता हा कोणत्याही प्रवासाचा भाग असतो, मग तो जीवन असो वा व्यवसाय. तुमच्या व्यवसायातील संभाव्य धोके ओळखा आणि संकट आणि आकस्मिक योजना तयार करा. त्यासाठी काय आवश्यक आहे आपत्कालीन निधी वेगळे करणे, क्रेडिट लाइन सुरक्षित करणे इ.

कर्जांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करणे :- आर्थिक नियोजनासाठी आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे कर्जाचे व्यवस्थापन. तुमची सध्याची कर्जे व्याजदर आणि अटींच्या आधारे व्यवस्थापित करा एक योजना तयार करा जेणेकरून तुम्ही ते अतिशय पद्धतशीरपणे फेडू शकता. तुमच्यासाठी उपलब्ध असलेले विविध निधी पर्याय शोधा. जसे की अनुदान, कर्जे किंवा गुंतवणूकदार. तुमच्या व्यवसायाच्या गरजा आणि आर्थिक परिस्थिती सर्वोत्तम काय आहे ते निवडा.

तुमच्या ऑपरेटिंग खर्चाचे पुनरावलोकन करा :- नवीन किंवा लहान व्यवसायाला खर्चात कपात सहजतेने परवडेल अशा करण्यासाठी खर्चाचे नियमित निरीक्षण आवश्यक आहे. कंपनीच्या सेवा किंवा उत्पादनाच्या गुणवत्तेत अडथळा न आणता ओव्हरहेड खर्च कमी करण्याचे मार्ग देखील तुम्ही शोधू शकता.

कर व्यवस्थापन :- कर नियोजन हा तुमच्या एकूण आर्थिक नियोजनाचा प्रमुख भाग आहे. कायदेशीररित्या देय कर कमी करण्यासाठी कर नियोजन केले जाते. आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला कर नियोजन केले पाहिजे. एकूण करपात्र उत्पन्न कमी करण्यासाठी कपातीचा वापर करा. कर-बचत साधनांमध्ये गुंतवणूक करा. कर नियोजन आयकर कायद्यांतर्गत असलेल्या तरतुदींचे देखील पालन करते. आयकर जीएसटी व व्यवसायासाठी लागू असलेल्या इतर कायद्याच्या सर्व तरतुदी बाबत ज्ञान असू द्या जेणेकरून सर्व तरतुदींचे पालन होऊ शकेल.

उधारीचे व्यवस्थापन :- लहान व्यवसायिकांचे बरेचसे व्यवसाय हे उधारी वसूल न झाल्याने किंवा वेळेवर वसूल न झाल्याने अडचणीत येत असतात. त्यामुळे व्यवसायाच्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसच उधारीचे व्यवस्थापन करणे आवश्यक असते. कोणत्या व्यक्तीला किती दिवसांसाठी माल उधार द्यायचा आहे. कोणाकडून किती दिवसासाठी माल उधारीने घ्यायचा आहे. याचे सर्व नियोजन व्यवसायिक आणि वर्षाच्या सुरुवातीसच केले पाहिजे. जे ग्राहक वेळेवर उधारी देत नाहीत त्यांच्यासोबत विक्रीचा व्यवहार करण्यासाठी सावधानता बाळगली पाहिजे.

व्यवसायाच्या खाते पुस्तकांची नवीन सुरुवात करणे :- बरेचशे व्यावसायिक दिवाळी पासून खाते पुस्तके नवीन तयार करीत असतात. परंतु भारतीय कायद्यानुसार आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून खाते पुस्तके आणि बिलाची नवीन सुरुवात ०१ एप्रिल पासून केली पाहिजे.

आर्थिक नियोजन का महत्त्वाचे आहे?

आर्थिक नियोजन महत्त्वपूर्ण आहे कारण हे आपल्याला संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर करण्यास साहाय्यक करते. तसेच आपण आपली दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करणे सुनिश्चित करते. आर्थिक नियोजनाचे महत्त्व समजून घेण्यासाठी येथे मुख्य मुद्दे नमूद केले आहेत :

आर्थिक नियोजन वाढ आणि विस्तार योजनांच्या विकासात मदत करते, जे फर्मच्या दीर्घकालीन अस्तित्वात मदत करते. हे कंपनीच्या प्रगतीमध्ये अडथळा आणणारी अनिश्चितता दूर करण्यात मदत करते. यामुळे कंपनीची स्थिरता आणि नफा वाढतो.

आर्थिक नियोजन हमी देते की पैशाचे पुरवठादार आर्थिक नियोजन वापरणाऱ्या कंपन्यांमध्ये सहजपणे गुंतवणूक करू शकतात.

आर्थिक नियोजन स्थैर्य राखण्यास मदत करते. आणि रोख प्रवाहाच्या दरम्यान योग्य संतुलन राखण्यास मदत करते.

आर्थिक नियोजन माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते: आर्थिक नियोजन लहान व्यवसायांसाठी अत्यावश्यक आहे कारण ते मालकांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. तुम्ही तुमच्या कमाईचा आणि खर्चाचा अंदाज लावू शकता आणि संभाव्य आर्थिक समस्या देखील ओळखू शकता. अंदाज केल्यानंतर तुम्ही त्यांचे निराकरण करण्यासाठी मोठी पावले उचलू शकता. उदाहरणार्थ, तुम्हाला माहिती आहे की जर तुम्ही रोख प्रवाहाच्या समस्यांचा अंदाज लावला तर तुम्ही संबंधित पावले उचलू शकता म्हणजे खर्च कमी करणे आणि महसूल वाढवणे जेणेकरून भविष्यातील आर्थिक संकटे टाळता येतील.

आर्थिक नियोजन निधी सुरक्षित करण्यात मदत करते: तुम्ही तुमच्या लहान व्यवसायाला निधी देताना योग्य आर्थिक योजना महत्त्वाची असते. हे महत्त्वाचे आहे कारण सावकार आणि गुंतवणूकदारांना तुमची आर्थिक योजना पहायची असेल. शेवटी, ते प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने वित्त व्यवस्थापित करण्यासाठी तुमची अनुकूलता दर्शवेल. विशिष्ट आर्थिक योजना करून तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवण्याची शक्यता वाढवू शकता.

साप्ताहिक भविष्य



हर्षल धर्माधिकारी, नाशिक मो.९२२६१९१८२७ दि.७ ते १३ एप्रिल २०२४

मेष- या सप्ताहांत तुमचे कार्य कौतुकास पात्र असे असेल मागील काही काळ जाणवणारी आर्थिक ओढाताण संपुष्टात येईल. पैशाअभावी रखडलेली कार्य मार्गी लागतील. नोकरीत, व्यवसायात आर्थिक फायदा चांगला होऊन बरेच दिवस मनात घोळत असलेली एखादी इच्छा पूर्ण होईल. नोकरीत वेतनवृद्धी, पदोन्नती संभवते. कामाच्या स्वरूपातील बदलाचे व नवीन जबाबदाऱ्यांचे स्वागत करा. नवीन आव्हाने स्वीकारा. त्यामुळे कर्तृत्वास हीन आलहान गुरुजी नवीन झळाळी मिळेल. पूर्वीच्या कामाचे फळ मिळेल. कौतुकास पात्र ठराल. आत्मविश्वासात भर पडून पुढील कार्य करण्यासाठी कार्यमग्न राहा. जुन्या गुंतवणुकीत भरघोस आर्थिक फायदा करून देतील. विद्यार्थ्यांना परिश्रम घेणे आवश्यक.

वृषभ- या आठवड्यात तुम्हाला परदेशगमनाची किंवा यात्रा प्रवास करण्याची संधि आहे व्यवसाय धंद्यावर सरकारी धोरणांचा सम-विषम परिणाम होण्याची शक्यता. नोकरीत सहकारी, वरिष्ठांबरोबर मत-मतांतरे होऊ शकतात. वादविवाद घडू नयेत यासाठी विविध प्रयत्न करावे लागतील. कुटुंबातील सदस्यांच्या मतास उचित प्राधान्य द्या. सर्व क्षेत्रातील कार्य बाबी सांभाळा. महत्त्वाची कार्य पूर्ण करू शकाल. जमीन जुमला, स्थावर मिळकत याविषयीचे रखडलेले व्यवहार गतीमान होतील. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधीचे वाद संपुष्टात येतील. घर-ातील मौल्यवान वस्तूकडे लक्ष ठेवा. चोरी अथवा नुकसानीचे भय. धनलाभाच्या संधी प्राप्त होतील. परदेशगमनाची (दूरच्या प्रवासाची) शक्यता आहे. नोकरी-व्यवसायात कायदेशीर सल्ला बाकी

मिथुन- या सप्ताहांत तुम्हाला मंगलमय तसेच आनंद देणाऱ्या वार्ता मिळतील अनुकूल ग्रहमान लाभल्यामुळे उत्साही व आनंदी राहाल. विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह निश्चित होतील. काहींचे परिचयोत्तर विवाह होतील. व्यवसाय नोकरीत एखाद्या स्त्रीपासून फायदा होऊ शकतो. व्यावसायिक नवे करारमदार होऊ शकतात. विशेषतः परदेशी व्यापार वृद्धी योग, त्याचप्रमाणे परदेशगमनाचे योग. कुटुंबात मुला-मुलींकडून त्यांच्या विद्या अभ्यासातील प्रगतीच्या बातम्या मिळाल्यामुळे आनंदी राहाल. नवपरिणीतांना अपत्य योग. कुटुंब वृद्धी. व्यवसायामध्ये प्रतिष्ठा वाढेल. कलाकार व साहित्य क्षेत्रातील जातकांना यश मिळेल. स्पर्धकांवर मात कराल. विद्यार्थ्यांना जास्त परिश्रम घ्यावे लागतील.

कर्क- या सप्ताहांत तुम्हाला तडजोड करणे फायद्याचे ठरेल सध्याच्या कालावधीमध्ये अति महत्त्वाकांक्षा न बाळगता वाटचाल करणे फायदेशीर ठरणार आहे. तडजोड फायद्याची ठरेल. कुटुंब-परिवारामध्ये अथवा मित्रमंडळींच्या वर्तुळात छोटया-छोट्या कारणांवरून वादविवादाची शक्यता. नाती दुरावण्याची शक्यता. वादविवाद टाळून त्यांना महत्त्व देणे फायद्याचे ठरेल. नोकरीत अनपेक्षित घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता. स्वतःच्या बोलण्यावर तसेच वर्तणुकीवर नियंत्रण आवश्यक. भांडण टाळा. व्यवसाय-धंद्यात स्पर्धेला तोंड द्यावे ला-गेल. कामाच्या पद्धतीत बदल करावा लागेल. नोकरीत बदलीची शक्यता. काही वेळेस मनाविरुद्ध निर्णय स्वीकारावे लागण्याची तयारी ठेवा.

सिंह- या आठवड्यात तुम्ही कोणताही निर्णयखात्रीपूर्वक तसेच ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला घेऊनच घ्या विशेषतः तरुण-तरुणींना भरघोस फळे मिळतील. आपले शिक्षण पूर्ण करून जे जातक नोकरीच्या शोधार्थ असतील, अशा जातकांचा नोकरीविषयक शोध संपुष्टात येऊ शकतो. चालू नोकरीतही चांगली फळे मिळतील. पदोन्नती, वेतनवृद्धीसारख्या घटना होतील. मात्र बदलीची शक्यता आहे. व्यावसायिक परिस्थिती सुधारेल. कर्जातून मुक्तता. व्यवसायातील नियोजन सफल होईल. विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्यासाठी परदेशी जाण्याची संधी. खात्रीपूर्वक निर्णय घ्या. शिष्यवृत्ती मिळू शकते. भागीदारी व्यवसाय झपाट्याने पूर्ण कराल.

कन्या- या आठवड्यात तुम्हाला मंगलमय वार्ता मिळतील सध्या सर्व दिवसांचा कालावधी चांगला असल्यामुळे चांगल्या कामाला सुरुवात होईल. स्वतः चे अस्तित्व स्वतः निर्माण कराल. इतरांचे मार्गदर्शन मिळेल. पर्यायी गोष्टी आता स्वीकाराव्या लागणार नाहीत. घेतलेले निर्णय योग्य असतील. फार दिवसाप-ासून जे स्वप्न रंगवत होता ते पूर्ण होणार आहे. मोठी खरेदी होईल. व्यवसायात जाहिरात माध्यमांचा प्रभाव उत्तम पडेल. आवकजावक वाढेल. भागीद-ारी व्यवसायातून फायदा होईल. नोकरदार वर्गाला बढतीची चाहूल लागेल. आर्थिकदृष्ट्या सफलता मिळेल. राजकीय क्षेत्रात तुमच्या शब्दाला मान मिळेल. घरात मंगल कार्य ठरेल. वातावरण आनंदी राहील. आरोग्य ठणठणीत राहील. कामे वेळेवर पूर्ण होतील.

तुळ- या सप्ताहांत तुमचे आरोग्य उत्तम राहील सर्व दिवसांची अनुकूलता चांगली असेल. मागील काही दिवसांपेक्षा हा आठवडा मात्र चांगला जाईल. दमदार वाटचाल राहील. नवी दिशा मिळेल. महत्त्वाचे निर्णय वेळेत घेतले जातील. इतरांशी केलेली चर्चा फलदायी ठरेल. प्रगतीचा आलेख उंचावता राहील. त्यामुळे आत्मविश्वास वाढेल. आवडत्या वस्तूंची खरेदी कराल. व्यवसायात यशस्वी भरारी माराल. स्वतंत्र व्यवसायाला चालना मिळेल. व्यवसायासाठी काढलेले कर्ज फेडाल. नोकरदार वर्गाला कष्टाचे फळ मिळेल. आर्थिकदृष्ट्या लाभ होईल. समाजसेवेत गुंतून राहाल. भावंडांशी मनमोकळेपणाने गप्पा माराल. कौटुंबिक आनंद मिळेल. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. अध्यात्माची आवड राहील. आरोग्य सदृढ . मानसिक शांतता लाभेल. आरोग्य सदृढ राहील. सामंजस्याने कृती कराल.

वृश्चिक- या सप्ताहांत तुम्हाला तुमच्या केलेल्या कामांचा गौरव मिळेल आपण पूर्वी केलेल्या कार्याचा गौरव होऊन आपणास त्याचे बक्षीस मिळेल. व्यक्तिगत फायदा होऊन मानसन्मानास पात्र ठराल. नोकरीत अचानक एखादी चांगली घटना आपला उत्साह वाढवेल. पदोन्नती-वेतन वृद्धीचे योग संभवतात. आत्मविश्वासाने पुढील कार्य पार पाडाल. आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप इतरांवर पडेल, आपल्या वागण्याने अथवा बोलण्याने इतरांना दुखवू नका. नात्यांना जपा. कलाकार, खेळाडूंना सरकार दरबारी मान मिळू शकतो. आपल्या गुणांना वाव मिळून कौतुक होईल. व्यावसायिक परिस्थिती समाधानकारक राहील. कुटुंबात जरा सबुरीने घेण्याची आवश्यकता आहे.

धनु- या आठवड्यात तुम्हाला धनप्राप्ती होईल सुरुवातीला खर्चात वाढ झाल्यासारखे वाटेल. त्यात काही अनपेक्षित खर्चही समाविष्ट असण्याची शक्यता आहे. कुटुंबातील सदस्यांच्या मागण्या वाढू शकतात तसेच मुला-मुलींसाठी खर्च संभवतो. त्यांच्या शैक्षणिक बाबी खर्ची ठरतील. राहत्या घरातील सुख-सुविधा वाढविण्याकरिता खर्च करावा ला-गेल. नवीन खरेदी होईल, तर घरगुती खर्च संभवतात. त्याप्रमाणे वाहनाच्या देखभालीवर खर्च करावा लागेल; परंतु खर्चाच्या बाबी आपण सहन करू शकाल, कारण आपला आर्थिक स्त्रोतही वाढेल. जुनी येणी उधारी-उसनवारी वसूल होईल. धनप्राप्ती होईल.

मकर- या सप्ताहांत तुम्हाला विश्वासनिय व्यक्तींची मदत मिळेल शुभ ग्रहांचे पाठबळ लाभल्यामुळे आर्थिक आलेख उंचावलेला अनुभवाल. नोकरी-व्यवसायातील जुनी येणी वसूल होतील. नेहमीच्या उत्पन्नांच्या मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गांनी उत्पन्नात भर पडू शकते. सरकारी क्षेत्रातून मदत मिळू शकते. सरकारी अन-ुदानातून लाभ मिळू शकतो. सरकार दरबारी जर एखादं प्रकरण प्रवीष्ट असेल, तर त्या प्रकरणी यश मिळेल तसेच आर्थिक सहाय्य मिळू शकते. निहाय नियामकलीकर-गुरुजी व्यावसायिक कर्ज मंजूर होतील. ओळखीच्या माध्यमातून मदत मिळेल मात्र असंगाशी संग ठेवणे महागात पडेल. अतिआत्मविश्वास घातक ठरू शकतो. वाहन वेगावर नियंत्रण आवश्यक राहील.

कुंभ- या सप्ताहांत तुम्हाला संमिश्र फळे मिळतील काही प्रमाणात कडू तसेच गोड फळे चाखण्यास मिळतील. तरुण-तरुणींचा भाग्योदय होईल. नोकरीविषयक प्रश्न संपुष्टात येतील. प्रयत्न विशेष सफल होतील. त्याचप्रमाणे ओळखीमध्ये कामे पार पडू शकतात. कुटुंबात अथवा बाहेरील क्षेत्रात वादविवाद टाळा. प्रिय व्यक्तीचा सहवास लाभेल. कुटुंब परिवारातील विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह निश्चित होतील. व्यावसायिक वादग्रस्त येणी आल्यामुळे आश्चर्य वाटेल. विवाह जमतील. अपवादात्मक विवाहयोग. सरकार दरबारची प्रलंबित कामे पूर्णत्वाकडे जातील. कलाकार साहित्य क्षेत्रातील मंडळींना अनुकूल कालावधी. प्रसिद्धी संभवते. मानधनात वाढ होऊन नवीन कार्य हाती घ्याल.

मीन- या सप्ताहांत तुम्हाला तीर्थक्षेत्र किंवा देवदर्शन याठिकानी जाण्याचा योग आहे.जवळच्या व्यक्ती मातृत्वाच्या भाव-नेने आपल्याशी वागण्याची शक्यता आहे. समज-गैरसमज होण्याची शक्यता आहे. कोणीही काहीही आरोप केल्यास शांततेने घ्या. परिस्थितीवर विजय मिळवण्यासाठी हे आवश्यक ठरणार आहे. संबंधित स्त्रियांशी सौजन्यपूर्ण वागणूक आवश्यक आहे. प्रतिष्ठेचे विषयक समस्या निर्माण होऊ शकतात. कुटुंबातील सदस्यांच्या प्रकृती जपा. कोणाच्या आजारपणाचा अथवा शस्त्रक्रियेचे योग आहेत. मानसिक व शारीरिक त्रासाची शक्यता. उत्तरार्धात काही न वाटणारे ग्रहमान बदलेल. काही चांगल्या शुभ घटना घट झाल्यामुळे मानसिकता सुधारेल. दिलासा मिळेल.

आनंद तरंग

संजय धनगव्हाळ, मो.९४२२८९२६१८

माणसाचं आयुष्य म्हणजे विविध रंगांनी रंगलेले असते.माणसाने बहुरंगी असल्याशिवाय त्यांच्या आयुष्यात स्पतरंगाची उधळण होत नाही.अनेक रंग संगतीत माणूस जगत असतो वेगवेगळ्या रंगछटा माणसांच्या जीवनात रंग भरत असतात.आणि प्रत्येक रंगाचा आनंद माणूस घेत असतो.नकळतपणे माणसाच्या आयुष्यात वेगवेगळा रंग येत असतात.रंग कसाही असुदे कुठलाही असु दे त्या रंगात कुठलाही बेरंग मिसळायला नको म्हणजे झालं,नाहीतर मग आयुष्याची धुळधाण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.आंनदाची डोही आनंद तरंग या युक्ती प्रमाणेच माणसाने जगण्याचा आनंद घेतला पाहिजे.आपल्या अवतीभोवती विविध रंगांची माणस, अर्थात विविध स्वभावाची माणस रेंगाळत असतात कळत नसतो त्यांच्या स्वभावाचा,वागण्याचा रंग आपण पुर्ण विश्वासाने त्याला आपलस करतो आणि मग एक दिवस असं काही होत की संबधीत व्यक्त त्याचे खरे रंग दाखवायला लागतो.म्हणून कोण केव्हा कसा पाठीमागून येईल आणि बेरंगाची उधळण करेल काही सांगता येत नाही.काय असतं की सध्याच युगात पाहिले तर माणसांच्या जगण्याला एव्हढी गती आली आहे की एका जागी त्यांचे पावले थांबत नाही. सतत धावत असतात.घड्याळी प्रमाणे पळत असतात.माणसाच जगणं एव्हढ काही फास्ट झालं आहे की त्याला स्वतःला स्वतः ची भ्रांत राहीली नाही.स्वत:लाच नाही तर परिवाराला देखील वेळ देता येत नाही इतका माणूस व्यस्त झाला आहे.मग याला काय म्हणावे प्रगतीच्या दिशेनं माणसाची वाटचाल की जगण्यासाठी जीवघेणी धावपळ.खर तरं माणसाने हसत खेळत रहावं, आनंदात जगावं जे काही डोळ्यांना चांगलं दिसेल ते डोळ्यात साठवून आत्मसात करावं,आपल्याला जे आवडेल ते करावं प्रत्येक क्षणाचा आनंद घेताना आपल्याला हवं तितकं मनमुराद हसू घ्यावं कारण हास्य रंगाने माणसाच्या अंगावरची मरगळ दुर होते चेहऱ्यावरचा ताण-तणाव कमी होतो आणि मग आनंदाच्या छटा चेहऱ्यावर तरंगायला लागता,मन प्रसन्न होते, मनातली उदासीनता दुर होते,माणूस ताजा-तवाना होतो आणि एक प्रसन्न मुद्रा माणसाला चिरतरुण ठेवते. माणसाच्या जिवनात हाश्यरंग नसते तर त्याचे जगणे अतिशय निरस राहिले असते.कारण हसणे हा दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य भाग आहे एक क्षणभर हसु माणसाला हसत खेळतं ठेवते,हास्यनंदमुळे सकारात्मक उर्जा मिळते तर हास्य कल्लोळाने माणूस नेहमी प्रसन्न रहातो विनोदातुन मान्य निर्माण झाल्याने मेंदूची शक्ती वाढते.म्हणून माणसाने नेहमीच प्रसंन्नतेला सोबत घेऊन फिरायचे हवे.प्रसंन्नताही अशी असायला हवी की बघनाऱ्यालाही आपल्या प्रसन्नतेचा हेवा वाटला पाहिजे.कारण एक गोडं हसु किती तरी नजरेमधे बंद होत असते.आपल हसु पाहून,आपल्या चेहऱ्यावरचा आनंद, आपली प्रसन्नता पाहुन दुसऱ्याच्याही चेहऱ्यावर हसु फुलायला लागते.तेव्हा माणसाने कसलाच विचार न करत आनंदाच्या डोहात डुबकी मारून हसतखेळत रहायला हवं तरच माणूस खऱ्याअर्थाने जगू शकतो.आनंद तरंगच्या लहरी जर माणसा मधुन निघून गेल्यात तर राहत तरी काय निरागसता? नीरागसमुळे माणसाचं आयुष्य कमी होते.अस म्हणतात की आयुष्य खूप सुंदर आहे आणि अशा सुदंर आयुष्याचा आनंद ज्याने नाही घेतला तो थांबला.म्हणून माणसाने नेहमीच हसत खेळतं रहायचं मस्त जगायचं.आपल्यातला थोडा आनंद जरी दुसऱ्याला देता आला तर आपण खूप काही मिळवलं समजा.

माणूस जन्माला आल्यानंतर अनेक जबाबदारीच ओझं त्यांच्या खांद्यावर असतं आणि प्रत्येक जबाबदारी एक कर्तव्य म्हणून त्याला पुर्ण करायची असते.या दरम्यान अनेक अडचणीही येतात,नैराश्य येते काम करण्याचा उत्साह संपून जातो,अपेक्षा भंग होतात,चिंतेच्या रंगाची ढवळा ढवळ माणसांच्या आयुष्यात रंग भरत असते. पण प्रत्येक समस्येतून काहीना काही मार्गाने सापडत असतो. प्रयत्नांची वाट अवघड असली तरी आपली पावले डगमगायला नको,आपल्या पावलांवर भरवसा असला पाहिजे.भरवसा नसेल तर पावले पुढे पडणार नाही.अडचणी किती आल्या तरी ज्याला तोल सांभाळता आला त्याला पळणे अवघड नसते.अडचणींच्या

फेऱ्यात अडकलेला माणूस काहीही करून आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करेल पण मागे थांबणार नाही.नैराश्याने अडचणी दुर होत नाहीत तर जबाबदारी पासुन माणसाला दुर नेण्याचा प्रयत्न होत असतो. माणसाकडे विचारशक्ती किंवा विचार करण्याची क्षमता एव्हढी दांडगी आहे की जर गांभीर्याने विचार केला तर एखाद्या अडचणीही सहज मार्ग सापडतो.त्यासाठी माणसाने प्रयत्नवादी असायला हवे.जीवनामध्ये अनेक चढ उतार येत असतात,प्रत्येक चढ उतार काही सारखे नसतात.पण केव्हा कुठे कसे वळण घ्यायचे हे ज्याला जमले त्याला कुठल्याही वाटेवर धावणे अशक्य नसते.तेव्हा अडचणी आल्या म्हणजे आयुष्य थांबत नाही.उलट जगण्याचं बळ मिळते प्रत्येक आव्हान नवीन काहीतरी शिकवत असते.त्यातून जो शिकला त्याला पुन्हा मागे वळून बघण्याची गरज पडत नाही.खरतर जखमी झाल्याशिवाय माणसाला वेदनांची तीव्रता कळत नाही. वेदनांच्या रंगावर फुंकर घालता आली पाहिजे म्हणजे त्या फुकंरीच्या गारव्याने जखम फारशी पिचडतं नाही.कारण वेदनाच वारंवार आपल्या अडचणी,समस्या, आपल्या प्रतिकुल परिस्थितीची जाणीव करून देत असते.अशाही संकटावर जो मात करून पुढे जाण्याच्या प्रयत्नात असतो.तोच खऱ्याअर्थाने जबाबदारीतून सहजपणे मुक्त होतो.काही माणसं खचून जातात नैराश्याने वेगळा विचार करतात पण स्वत:ला संपवणे म्हणजे सर्वकाही संपले असं होतं नाही.ही पळवाट झाली.या उलट प्रतिकुल परिस्थिती माणसाला जगण्याची एक नविन संधी देत असते म्हटलं तर वेळ काळ पुन्हा काहीतरी करण्यासाठी यशाचे दार खुले करून देत असतो.ज्याने त्या यशाच्या दारातून प्रवेश करून प्रयत्नांचा शिखर पार करताना आपले ध्येय साध्या करण्यात यश मिळवले तर तो या जगाच्या पाठीवर कुठेच अपयशी ठरत नाही.अशी खूप उदाहरण देता येतील की प्रतिकूल परिस्थितीत कठोर परिश्रम करून यशस्वी झालेत आणि ते जगावर राज्य करतायं.तेव्हा घाबरायचे कशाला लढायच जो लढायला शिकला तो लढवायला ही शिकवतो आणि अशी लढवैये माणसं आयुष्यात कुठेच कमी पडत नाही.

संघर्षाच्या वाटेवर संकट येतच असतात त्यावर मात करून जे अडथळे पार करतात त्यांच्या चेहऱ्यावर कायम आनंदाच्या रंगछटा रंगत दिसतात.अर्थात कायम हसतमुख असतात.अशी माणसं कितीही अडचणी आल्यात तरी फक्त

देवावर विश्वास ठेऊन आयुष्य जगत असतात.मगं अशा परिस्थितीत स्वतःशीच बोलत रहायचं किंवा स्वतःची समजूत काढायची की.एक दिवस माझाही असणार आहे.प्रगतीचा ध्वज फडकावयाला काही वयाची अट नसते माणूस कोणत्याही वयात यश मिळवू शकतो.तेव्हा स्वतःशीच बोलत रहायचं की होईल सर्वं काही ठिक होईल कधी कधी वाईट दिवसांत वाईट अनुभव येत असतात,अशावेळी कोणी सोबत नसतो. म्हणून चांगल्या दिवसांसाठी आपणचं आ-पलीच समजूत काढायची.कारण वेळ वाईट असते पण आयुष्य कधीच वाईट नसते. स्वत:खंबीर राहिलात की वाईट दिवसही निघून जातात.उगवणारा दिवस,उगवती पहाट एक नवीन संधी घेऊन येत असते.त्या संधीच सोन करण्यासाठी आपल्या मनगटात जोर असावा लागतो.आयुष्य म्हटलं म्हणजे संघर्ष असणारच आहे.अशाही संघर्षाच्या काळात चुकीचा मार्ग न निवडता जो प्रामाणिकपणे कष्ट करत रहातो त्याला देव कुठल्याही रूपात येऊन मदत करत असतो. म्हणून धिर ठेवायचा संयम बाळगायचा वाईट वेळ निघून जाते आणि केंव्हातरी चांगल्या दिवसाची सुरुवात होतेच. सुवर्ण दिवसाची वाट बघायची जो वाट बघायला शिकला तो आयुष्य जगायला शिकला समजा.जेव्हा माणूस एकटा पडतो ना तेव्हा त्यांच्या सोबत कोणीच नसतं. पडत्या काळात दुर उभे राहून गंमत बघतील पण वेदनांचे अश्रु पुसायला कोणी येत नाही अशा वेळी आपले अश्रु आपणच पुसायचे असतात. सहानुभूती ही तेव्हढ्या पुरतीच असते.पण जी व्यक्ती स्वत:चे अश्रू पु-सुन पुन्हा लढायला नव्याने उभा रहातो ती व्यक्ती आयुष्यात काहीही करू शकते.आहे त्यात समाधानी राहुन आनंदात जगणाऱ्या माणसांच्या आयुष्यात नक्कीच सुखाचे दिवस आल्यावाचून राहत नाही.

काही माणसं कमी वेळात श्रीमंत होण्याचे स्वप्न पहात असतात. माणसाने श्रीमंत जरूर व्हावं पण वाट चुकणार नाही याची तितकीच काळजी घेतली पाहिजे. कारण कमी वेळेत उंच भरारी घेणारे काही कमी नाहीत पण कमी वेळेत उंच भरारी घेण्याचा वेग जर कमी झाला तर उंचावरून जमीनीवर कोसळल्यानंतर त्याला उचलायला कोणीही येत नाही.तेव्हा प्रगतीच्या दिशेनं धावताना शॉर्टकट मारण्याचा आगाऊपणा कधीच करायचंय नाही. शॉट कट वाटेवर आत्मसन्मान आणि आत्मसमाधान आत्मसमाधान नसते.कारण छोट्याशा विश्वात जगणाऱ्या माणसांच्या चेहऱ्यावर समाधानाचे रंग अधीकं उजळून दिसतात.म्हणून आपल्या जवळ जे आहे त्यातच समाधानी राहून जो जगण्याचा आनंद घेतो तो जीवनात कधीच असफल होत नाही.गरिबीची झळ किंवा प्रतिकुल परिस्थितीची झळ परिस्थमाणसाला जगणं शिकवते आणि ज्याने झळ सहन केली ज्याचे जीवन उजळून निघते व त्याचा जन्म सार्थकी लागतो.आपलं आयुष्य हे स्वतः च्या मता प्रमाणे जगलं पाहिजे आपल्या जगण्याची दोरी कुणाच्या हातात देऊ नये. कारण आपण आपल्या आयुष्याचे मालक आहोत.मग आपल्यावर जर दुसरा कोणी मालकी हक्क गाजवत असेल तर अनेक अडथळे येऊ शकतात.आपल्या स्वातंत्र्यावर कोणालाही बंधनं घालण्याचा अधिकार नाही.धाक असावा,आणि असलाच पाहिजे.आपल्यावर कोणाचा धाक असेल तर पावलं चुकत नाही किंवा वेगळ्या वळणावर जात नाही.धाक माणसाला चुकीच्या कामापासून दुर ठेवत असतो.पण व्यक्ती स्वातंत्र्यावर जर कोणी हस्तक्षेप करत असेलं तर ते अयोग्य आहे.कारण आपण आपल्या अधिकाराने जगत असतो.तेव्हा कुणाला आवडो अथवा न आवडो आपण आपल्या पध्दतीने जगण्याचा आनंद घ्यायचा.कुणाला आवडत नसेल तर दुरून डोंगर साजरे करायचं आणि आपण आपल्या मार्गाने चालत रहायचं.कारण दिवस येतात जातात रोज नवरंगाची माणसं भेटतात.काही आपली होतात तर काही परकी वाटतात.कोणाला जवळ करायचं कोणाला दुर ठेवायचं हे आपणच ठरवायचं पण आपल्या आयुष्यात कळत नकळतपणे सुख दुःख समृद्धीच्या इंद्रधनुष्याची बरसात होत असते. तेव्हा आपल्या आयुष्यात येणारा आनंद तरंगचा आनंद घेण्यासाठी आपलं आयुष्य सप्तरंगी असायलाच हवं एव्हढ मात्र खरं....

शब्दझुला

घाम गाळूया चला..

चला मुलांनो मैदानावर
खेळ खेळूया चला
अभ्यासातून वेळ काढूनी
घाम गाळूया चला..
खो-खो कबड्डी खेळ मर्दानी
कुस्तीचा रांगडा
सूर-पारंब्या आट्यापाट्या
कधी नाच भांगडा
चला मुलांनो मैदानावर
खेळ खेळूया चला
अभ्यासातून वेळ काढूनी
घाम गाळूया चला..
विट्टी-दांडू आबाधोबी
खेळ मैदानी हवा
क्रिकेट हॉकी फुटबॉल कधी
व्हॉलीबॉल नवा
चला मुलांनो मैदानावर
खेळ खेळूया चला
अभ्यासातून वेळ काढूनी
घाम गाळूया चला..
अभ्यासाने बुद्धि वाढते
खेळाने शक्ति
दोघांचा संगम घडवू या
वापरुन युक्ति
चला मुलांनो मैदानावर
खेळ खेळूया चला
अभ्यासातून वेळ काढूनी
घाम गाळूया चला..

–दिलीप कुळकर्णी,
नाशिक, मो.७३९१९४०४३८

मनं मत कोणले दिसू

मतदान नी रोज मत देवाले जरूर मी जासू
मनं अधिकारन मत कोणले ,कोणले दिसू?
ग्रामपंचायत, सोसायटीनी निवडले सर्वासपासीन पिसू
मग सांगा मी आते मन मत कोणले कोणले दिसू?
पंचायत समिती. जि.प. निवडले आंगधोई लिसू
मग मी मतदाननी रोज मत कोणले कोणले दिसू?
आमदार खासदारनी निवडले दोन्ही टाईम पिसू
मग मी आते, मन मत कोणले कोणले कसं दिसू
मी सर्वासपासीन दारू पिसू सुक्क मटन खासू
मग सांगा, मी आते मत कोणले कोणले दिसू?
मन ठयरी गे आते, मन खरं मत कोणले दिसू
सर्वा उमेद्वारपासीन नोटा गोया करी लिसू
नी बागीसकरी, शेवटनं नोटा नं बटन दाबी दिसू
नहीते देखा मंडई, मी आते नेमक आसज करसू
मतदानले जासू ते जासू, नहीते घरच जपी राहसू
जर जोयाले उनात ते, मागलादारवाटे पई जासू
बिनलाजना, बिगर आब्रूना, हालकट व्हई जासू
अण्णा, तात्या, बापू, दादा मी तुम्हलेच मत दिसू
सिदी संधी सापडेल से. पाच वरीसनी कसेर काढी लिसु
दारू पेवानी कोंबड्या, मटन खावानी हाऊस फेडी लिसू
गधडानी मायक लोई जासू, कुत्रानी मायक भूकी राहसू
मग सांगा मी आते मन मत कोणले कोणले दिसू?

–सुरेश मोरे,
(खर्दे बु) शिंदखेडा, ९८९०६२०९१७

वसंत फुलला मनी

बघता शुभ्र मोगरा
लखलखली चांदणी
भूवर आली अप्सरा
गंध फुलांचा दरवळला
वनराणीने केवडा माळला
आम्रतरुवर कुहू कुहू
कोकिळ निनाद घुमू लागला
बांबुच्या बनात वाहे वारा
घालतो शीळ गोड
तप्त उन्हातही देते गारवा
लाल मधुर कलिंगडाची फोड
लाल गुलाबी बोगनवेली
परिसर अवघा सजविती
पळस बहावा पांगारा
गुलमोहरही रंगपंचमी खेळती
शिशिराचे घाव सोसुनी
पुन्हा बहरली पिंपळ पालवी
सळसस नवचैतन्याची सांगे ती
जगास अवघ्या नवी उभारी द्यावी
लाल पोपटी कोवळी हिरवी
पिंपळ पालवी बघत रहावी
रानपाखरे गोजिरी त्यावर
तान तयांची कानी भरून घ्यावी

–राजेंद्र वाणी,
दहिसर मुंबई

ते आणि मी

फुलांचं आपलं छान असतं
फुलत असतात, दरवळत असतात
कुणी असो वा नसो
होतात प्रकाशमान चंद्र-तारे
कुणाचीही न वाट बघता
तेवत राहतो दिवा
तेलाच्या शेवटच्या थेंबापर्यंत
डोलतात आनंदात झाडं
ऊन, वारा, पाऊस झेलत
मग कुणीही दखल घेतल्याशिवाय
मलाही फुलायला हवं.
व्हायला हवं प्रकाशमान
तेवत रहायला हवं
शेवटच्या श्वासापर्यंत
झेलत अनंत अडचणी
ताठ उभं रहायला हवं
सावली देत... निवारा देत

–आनंद देशमुख,
शिरपूर, ९८६०६३०२३०

भ्रष्टाचार

आज जीवंत मानसास
लागली आहे किड
रोगरनेही न मरणाऱ्या
भ्रष्टाचाराची!
भ्रष्टाचारास
दिल्या जात आहे
शिष्टाचाराचा मुलामा
आणि सुरु आहे
फक्त नंगाणाच !
मानसांचे आता
भ्रष्ट झालेत
आचार,विचार
चंद धन लोभासाठी
त्याने विकले आहे
आपले ईमान !
अशा बेईमानांपाई
काळा पैसा
झाला आहे वरचढ
घामाच्या पैशा पेक्षा
तेव्हा !
आपण सर्वांनी आता
भ्रष्टाचारयांना
वेचुन वेचुन
ठेचावयास पाहिजेत
विचवाच्या नांगी सारखे !
आता झोपडयांनीच
गगनचुंबी ईमारतीस
जाब विचारलेच पाहिजे
आर्थिक,सामाजिक
समानतेसाठी !
आणि आम्ही आता
खनून काढायला हवी
भ्रष्टाचारयांची पाळेमुळे
नष्ट कराया भ्रष्टाचार
घाव घालावा थेट
मुळावरच
कधीही न फोफावन्यासाठी !!

–वासुदेव खोपडे,
अकोला, ९९२३४८८५५६

मूळ जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे इफ्तारी कार्यक्रम हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश; उपस्थितांच्या भावना

धुळे, दि.६- मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्यातील रोजा इफ्तारी कार्यक्रमाचे आयोजन करून मूळ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाने हिंदू मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला आहे. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून गाव पातळी पासून देश पातळी पर्यंत सामाजिक ऐत्याची भूमिका वाढीस लागेल असा आशावाद मुस्लिम बांधवांच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

धुळ्यातील वीर सावरकर मार्ग वरील दैनिक आपला महाराष्ट्र कार्यालयाच्या शेजारील मूळ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात मुस्लिम समाजाच्या पत्रकारांसाठी रोजा ईफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पत्रकार तवाब अन्सारी यांनी पवित्र रमजान महिन्याचे महत्व विशद केले. त्याचप्रमाणे मुस्लिम बांधवांच्या वतीने करण्यात येणाऱ्या रोजा उपवासाचे महत्त्व देखील सांगितले.

सर्वधर्मसमभाव जपून हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश पत्रकार संघाने दिला आहे अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक एकता मजबूत होण्यास मदत मिळेल. त्याच प्रमाणे या देशाला हिंदू मुस्लिम ऐक्याची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेच्या माध्यमातूनच दोन्ही समाजाच्या वतीने सामाजिक सलोखा राखण्याची काम होणे अपेक्षित आहे. हाच पायंडा पत्रकार संघाच्या वतीने जपण्यात आला. ही बाब कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया यावेळी उर्दू दैनिकाच्या पत्रकारांनी व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमात पत्रकार संघाच्या वतीने प्रांतिक प्रतिनिधी जसपाल सिंग सिसोदिया यांनी देखील सामाजिक ऐक्याचे महत्त्व विशद केले. या देशाला मजबूत करण्यासाठी सर्व जाती धर्मांच्या समुदायाचा हातभार महत्त्वाचा आहे त्यामुळे प्रत्येकाने सामाजिक सलोखा जपलाच पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी माजी अध्यक्ष हेमंत मदने यांनी धुळे जिल्ह्यात असलेल्या हिंदू मुस्लिम ऐक्याची परंपरा मोठी असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास पत्रकार संघाचे अध्यक्ष यशवंत हरणे, सचिव डी.बी.पाटील, खजिनदार सुवर्णा टेंबेकर, रेहान शेख, तवाब अन्सारी, सलिम अन्सारी, पप्पू सोनी, रहेमान मलिक, रियाज अहमद, सैफुर रहेमान, अब्दुलहक काजी, अब्दुल रशीद, तालुका संघाचे अध्यक्ष रोहीदास हाके, मनोज बैसाणे, शोभा आखाडे, सुनील निकम, पवन मराठे, जॉनी पवार, सुनील पाटील, मेनुयल मकासरे, कैलास गर्दे, सोपान देसले, निलेश परदेशी, दत्ता बागुल, विजय पाठक, दिनेश विभाडीक, गोकुळ देवरे, बापु अहिरे, सिद्धार्थ मोरे, श्री.टेंबेकर आदीसह संचालक, पत्रकार बांधव उपस्थित होते.

महिला सदनतर्फे होलिकोत्सव उत्साहात साजरा

धुळे, दि.६- रंगपंचमीचे औचित्य साधून येथील महिला सदनतर्फे होलिकोत्सव व धुळवड साजरी करण्यात आली. महिला सदनच्या सदस्यांनी पर्यावरणाचे भान राखत कोरडा कचरा, कागदाचे तुकडे, पतझडीची पाने गोळा करुन होळी तयार केली.

महिला सदनच्या अध्यक्षा वीणा चौधरी यांनी निवासस्थानी न्या. रानडे स्मृती येथे स्मरणशक्ती, जिभेचे व्यायाम इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. नंतर एकमेकींना गुलाल, कोरडे रंग लावून फुलांची उधळण करीत होळीच्या गाण्यांवर ठेका धरत महिला रंगपंचमी खेळल्या. अंगणातील मोकळ्या जागेत वाईट विचार, अंधश्रद्धा इत्यादी जाळून छान नवीन चांगले स्विकारु असा संदेश देत होळी पेटवली. वीणा चौधरी व सामाजिक कार्यकर्त्या जयश्री अहिरराव यांनी पूजन केले, यावेळी भारती महाले, दिपा वानखेडे, विजया झेंडे, अमिता झेंडे, शोभना बागुल, शोभा संतोष पाटील, सुमन देसाई, सुशिला मधुकर पाटील, विद्या खैरनार, सुनिता झेंडे, सुनंदा कोतकर, जयश्री कापडी, आरती महाले, मंगला बागुल, हिरा खंदलकर, सुलोचना अग्रवाल, मनिषा कासोदेकर, शैला मोतीवाले, गर्गे, सुमन जडे, सुमन मिस्त्री आदी महिला उपस्थित होत्या.

एकनाथ खडसे भाजपात परतण्याची शक्यता

मुंबई, दि.६- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे पुढील दोन दिवसांत भाजपमध्ये आपल्या स्वगृही परतणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. एकनाथ खडसे यांचा भाजप प्रवेश जवळपास पक्का झाला आहे. त्याचा मुहूर्त आज किंवा उद्या निश्चित होईल. सध्या त्यांच्या कन्या रोहिणी खडसे यांच्या राजकीय भवितव्यामुळे त्यांच्या प्रवेशाचे घोडे अडले आहे, असा दावा केला जात आहे. या नव्या घटनाक्रमामुळे जळगावचे राजकारण चांगलेच तापले आहे. गिरीष महाजन यांचा मात्र खडसेंना विरोध कायम आहे.

नंदुरबारला भाजपाचा स्थापना दिवस उपक्रमांनी साजरा

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी) - युवा, महिला, बेरोजगार आणि श्रमिक यांच्यासह प्रत्येक घटकासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून मोदी सरकारने राबवलेले जनकल्याणाचे कार्य घराघरापर्यंत पोहोचवू या आणि फिर एक बार मोदी सरकार हा नारा सत्यात उतरवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात मजबूत करूया, असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना नंदुरबार लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार खासदार डॉ.हिना गावित यांनी केले.

भाजपाच्या विजय पर्व या प्रमुख कार्यालयात भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देऊन त्यांनी हे आवाहन केले. याप्रसंगी आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष डॉ.सुप्रिया गावित आणि खासदार डॉ.गावित यांच्या प्रमुख उपस्थितीत महामंत्री विजय चौधरी यांच्या हस्ते सर्वप्रथम भारत माता प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजाला वंदन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष निलेश माळी, जिल्हा सरचिटणीस सदानंद रघुवंशी, डॉ.सपना अग्रवालसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समर्थ वाग्देवता मंदिरात बुधवारी व्याख्यान

धुळे, दि.६- येथील समर्थ वाग्देवता मंदिर व सत्कार्योत्तेजक सभा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम नवमी नवरात्रानिमित्त बुधवार दि.१० रोजी संध्याकाळी ५ वाजता मा.ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.अभ्यासू व्यातीमत्व स.दा. पाटील यांचे व्याख्यान समर्थ वाग्देवता मंदिर, रामवाडी, कै. नानासाहेब देव मार्ग, धुळे येथे आयोजित केले आहे. सर्व भाविकांनी व नागरिकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन सत्कार्योत्तेजक सभेचे अध्यक्ष प्रा.विश्वास नाकाणेकर, सभेचे चिटणीस प्रा.सतीश दीक्षित, समर्थ वाग्देवता मंदिराचे अध्यक्ष अ.भा. चितळे, कार्याध्यक्ष प्रा.देवेंद्र डोंगरे यांनी केले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर येथील धुळे म.न.पा. हदद्दीतील स.नं.६५/७ यास वि.सि.स.नं.गोळा नं.२५३७ चे एकूण क्षेत्र १४६८२.७० चौ.मी. यापैकी प्लॉट नं.३८ चे एकूण क्षेत्र १९० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९२.५ चौ.मी., ९९५.३ चौ.फुट बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पूर्वेस- स.नं. ७४, पश्चिमेस- रस्ता ६ मी., दक्षिणेस- याच प्लॉट नं.३८ चा उर्वरीत भाग, उत्तरेस- प्लॉट नं.३७.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील हा श्री प्रशांत किशोर कानुनगो रा. ३१, श्रीरंग कॉलनी, देवपूर, धुळे यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे प्लॉट हा आमचे अशिल यांनी विकसीत करण्यासाठीचा करार केलेला आहे. लवकरच आमचे अशिल सदरचे विकसन करारान्वये सदर प्लॉट विकसीत करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर प्लॉटवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी जनरल मुख्त्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशील सदरहू प्लॉट विकसीत करण्यास सुरुवात करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली आहे.

दिनांक- ०६/०४/२०२४,
ठिकाण- धुळे.

ॲड.प्रमोद एम.चौधरी
११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर, धुळे.
मो.नं.९८६०७०६१७१

आपला महाराष्ट्र
वाचकांना विनम्र सुचना

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी याची नोंद घ्यावी.

NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHABINA** TO **SHABINA BANO RAFIK KHAN PATHAN**
ADD- PLOT NO.92, BEHIND 51, 52, SCHOOL, MUNCIPAL COLONY, WADJAI ROAD, DHULE-424001

जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०५ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ८९ (४) अन्वये जाहिर नोटीस

खालीलप्रमाणे नमूद संस्था मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका, धुळे यांचेकडील आदेशान्वये अवसायनात काढण्यात आल्या असून सदर संस्थांचे अवसायक पदावर निम्नस्वाक्षरीकार यांची नेमणुक झालेली आहे. सदर संस्थांशी संबंधित धनको, ऋणको आणि वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, त्यांचे संस्थेविरुध्द सर्व दावे, हक्क/मागणी या नोटीसीच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत निम्नस्वाक्षरीकार अवसायक, तथा लेखापरिक्षक श्रेणी-१, अव्वर विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (पणन) धुळे यांचे कार्यालय ८ ब, सहयाद्री बिल्डींग, दुसरा माळा, इंदिरा गार्डन जवळ, आनंद नगर, देवपूर धुळे यांचेकडे आवश्यक त्या पुराव्यांसह सादर करावेत. सदर मुदतीत कोणतेही दावे, हक्क/मागणी आवश्यक त्या पुराव्यासह अवसायक यांचेकडे प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे नमूद संस्थांची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण करण्याकरिता प्रस्ताव मा.निबंधक यांचेकडे सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अ. न.	संस्थेचे नाव	अवसायन आदेश जा.क्र. व दिनांक
१	धुळे तालुका अंगणवाडी महिला कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. धुळे (अवसायनात), ता.जि.धुळे	जा.क्र.वि-३/पतसंस्था/कलम/१०२(१)(क) व १०३/अव. अंतिम आदेश/१२५६/सन २२ दि.३१.३.२०२२.
२	जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्या.धुळे(अवसायनात), ता.जि.धुळे	जा.क्र.वि-३/पतसंस्था/कलम/१०२(१)(क) व १०३/अव. अंतिम आदेश/१२६७/सन २२ दि.३१.३.२०२२.
३	आदिशक्ती एकविरा माता नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धुळे(अवसायनात), ता.जि.धुळे	जा.क्र.वि-६/आदि. एकविरा/अंतिम आदेश/कलम १०२/५८६८/सन १५ दि.१६.१२.२०१५
४	श्री भगवान महावीर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धुळे(अवसायनात), ता.जि.धुळे	जा.क्र.वि-६/अंतिम आदेश/भगवानमहावीरसहपत/कलम १०२(२)/४९/सन १४ दि.२८.०३.२०१४.

स्थळ - धुळे
दिनांक ०५.०४.२०२४

(दु.बा.शिरसाठ) अवसायक,
तथा लेखापरिक्षक श्रेणी-१, अव्वर विशेष लेखापरिक्षक वर्ग-२
सहकारी संस्था (पणन), धुळे

प्रथम पुण्यस्मरण



तुमचं असणं आमच्यासाठी सर्वस्व होतं...
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं...
आता सर्व काही असण्याची जाणी आहे...
पण तुम्ही आमच्यात नाही हीच मोठी उणीव आहे...

कै.रामचंद्र शंकर दंडवते
ज्येष्ठ पत्रकार (सं.साप्ता.शोध बातमीचा)
स्वर्गवास दिनांक ०७/०४/२०२३
-------: श्रद्धावनत् :-------
श्रीमती युगंधरा रामचंद्र दंडवते (पत्नी)
श्री.अमोल रामचंद्र दंडवते (मुलगा)
सौ.प्रिती अमोल दंडवते (सून)
चि.स्तवन अमोल दंडवते (नातू)

समस्त आपला महाराष्ट्र परिवार व पत्रकार बांधव धुळे

टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

धुळे शहरातील तमाम नागरिकांना खास करुकन मौजे धुळे ता. जि. धुळे शिवारातील लोकांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, सावकार व प्लॉट/ घर खरेदी विक्रीचा व्यवसाय करणारे मध्यस्थ, एजंट आणि सर्व संबंधितांना....

आमचे अशिल श्री. योगिता कैलास सुतार रा. प्लॉट नं. २८ श्रीराम नगर दुध डेअरी रोड, धुळे ता. जि. धुळे यांनी समक्ष दिलेल्या माहितीवरुन दाखविलेल्या कागदपत्रांच्या आधारे आणि त्यांचे सांगणेवरुन टायटल व्हेरिफिकेशन नोटीस देण्यात येते ती येणेप्रमाणे

१) मिळकतीचे वर्णन :
सिटी सर्व्हे उतारा प्रमाणे : मौजे धुळे ता. धुळे जि. धुळे येथील धुळे मनपा हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ४२४३ क्षेत्र ३४.१० चौ. मी. यापैकी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना विक्री करण्याचा सौदा केला ते त्यांचे मालकीचे प्लॉट व त्यावरील बांधीव मिळकत यासी.
चतु:सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.
दक्षिणेस : प्लॉट नं. ३, उत्तरेस : प्लॉट नं. ६

२) येणेप्रमाणे वर्णांकित मिळकत ही श्री. रविंद्र विष्णू खेडकर यांच्या प्रत्यक्ष मालकीची व ताबेउपभोगातील असून सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत यांचेशी सौदापावती केलेली असून बयाणा रक्कम ही दिलेली आहे.

३) त्यानुसार आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे. जर वर नमूद मिळकतीवर मालकाव्यतिरिक्त इतर कोणत्याची प्रकारचा गहाण, तारण, बोजा, टांच, खरेदी-विक्री, करार, हस्तांतरण, हिस्सा, व्यवहार, अधिकार, लिज, भाडेपट्टा, मृत्यूपत्र,वहिवाट, आरक्षण, जप्ती, कुळ, अगर इतर कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास इतर कोणाशी खरेदी विक्रीचा सौदा व्यवहार असल्यास ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून ७ दिवसांच्या आत आमचे खालील पत्त्यावर लिखी व मूळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी.

४) वरील कालावधीत कोणाचाही, कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर आलेल्या कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या तक्रारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे टायटल व्हेरिफिकेशन नोटीस असे.

येणे प्रमाणे टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आमचे पक्षकारांचे सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे. धुळे तारीख : ०६/०४/२०२४

ॲड.हर्षल विजय देसले
ऑफिस : जगदंबा हौसिंग सोसायटी श्री स्वामी समर्थ केंद्र समोर, मिल समोर, धुळे निवास : ६६ शिवशक्ती कॉलनी, चितोड रोड, धुळे.
मो. नं. ७८८८१३३१९३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ७६/१/३ पैकी प्लॉट नं. ३० चे एकूण क्षेत्र ३५९ चौ. मी. यास विस्तारीत सि. स. नं. ८५४ चे एकूण क्षेत्र ३७८.१० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे सात बारा उताऱ्याप्रमाणे क्षेत्र १७९.५ चौ. मी. व सि. स. उताऱ्या प्रमाणे क्षेत्र १८९.०५ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. २९, पश्चिमेस : याच प्लॉट नं. ३० पैकी भाग, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : स. नं. ७६/१/६ येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत कु. तनया शरद खैरनार रा. ४२, जितेंद्र नगर, नकाणे रोड, देवपूर धुळे यांचे मालकीची असून त्यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री. गोपाल रमेश चौधरी रा. १५, सुपडू आप्पा कॉलनी जुने धुळे धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, कब्जा पावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: ०६/०४/२०२४

ॲड.विजय म.मोरे
नोटरी -भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे **मो. नं. ९८२२८५२६५०.**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धुळे मनपा हद्दीतील मौजे चितोड येथील स. नं. १५/१ पैकी प्लॉट नं. २२ ब चे क्षेत्र १.१२.५० चौ. मी. यावर आर. सी. सी. मधील दुमजली बांधीव घरांचे क्षेत्र १०५.१५ चौ. मी. व उर्वरीत बखळ जागेसह यांसी चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्व : ७.५ मी, प्लॉट नं. २९ अ, पश्चिम : ७.५ मी. ९ मी रस्ता., दक्षिण : १५ मी. प्लॉट नं. २२ अ, उत्तर : १५ मी. प्लॉट नं. २३ अ, येणे प्रमाणे चतु:सिमा असे. अशी मिळकत श्री. कैलास अमृतराव बोरसे व सौ. सुवर्णा कैलास बोरसे यांचे नावे व ताबेउपभोगातील आहे. येणेप्रमाणेचा बांधीव दुमजली मिळकत आहे. त्या परिस्थिती तसेच माती, जमीन, दगड वगैरे तदंगभुत व अंगभूत वस्तु आमचे अशिल श्री. महेंद्र सुरेश मोरे व सौ. माधुरी महेंद्र मोरे रा. दह्याणे ता. जि. धुळे यांनी कायम खरेदी करण्याचा सौदा केलेला असून लवकरच आमचे अशिल धुळे मे. दुय्यम निबंधक सो. धुळे येथे खरेदीखत नोंदवणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचा गहाण, सौदा, खरेदी विक्री, कर्ज, तथा संच बोझा आदी कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर ८ दिवसांचे आत सदर हकरत, हक्क, अधिकार अथवा हितसंबंध बाबतचा लेखी पुरावा आमच्याकडे खालील पत्त्यावर स्वत: समक्ष येवून, आणून देवून त्याची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेध आहे, असे समजून सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यानंतर सदर बाबतीत आलेली कोणतीही हरकत आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही व खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे अशिलाचे सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दिनांक ०६/०४/२०२४

ॲड.प्रफुल्ल चतुर चित्ते
बोधीसत्व,३५,जय बजरंग सो.साक्री रोड, धुळे **मो. नं. ९५९५८४१२९९**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधितांना व विशेषत: पराग सुभाष अहिरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे वलवाडी ता. जि.धुळे म. न. पा. हद्दीतील सर्व्हे नं. २९/२ व ३०/२ यापैकी प्लॉट नं. १०६, त्यासी क्षेत्र २६२ चौ. मी. हा बखळ प्लॉट.

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत आमचे पक्षकार श्री. राजेंद्र रामदास बोरसे रा. धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत आमचे पक्षकार यांचे सख्ये भाऊ दिपक रामदास बोरसे यांनी बनावट दस्तऐवजांच्या आधारे व व्यसनापायी सदरची मिळकत ही त्यांची असल्याचे भासवून आमचे पक्षकाराची फसवणूक करुन राजप्रसाद कालिदास यांचेशी संगनमत करुन दिनांक ०८/०६/२०१७ रोजी राजप्रसाद कालिदास यांच्या नावे खरेदीखत दस्तान्वये करुन दिली आहे. सदरचे खरेदीखत दस्त रद्द होवून मिळावे म्हणून आमचे पक्षकार यांनी मे. दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर धुळे यांचे न्यायालयात राजप्रसाद कालिदास व आमचे पक्षकार यांचे भाऊ दिपक रामदास बोरसे यांचे विरुद्ध स्पे. दि. दावा क्र. ६६/२०१७ दाखल केला आहे व बनावट कागदपत्रांच्या आधारे आमचे पक्षकाराची मिळकत विक्री केली म्हणूक त्यांचे विरुद्ध धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गु.र. नं. २०५/२०१७ अन्वये दिनांक २०/०९/२०१७ रोजी भा. दं. वि. कलम ४ २०, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्याचे कामी आरोपीविरुद्ध मे. ज्युडी. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले आहे व त्यांचे विरुद्ध वर नमूद दावा व फौजदारी केस प्रलंबित आहे.

तसेच राजप्रसाद कालिदास याने त्यांचे विरुद्ध सदरचा दावा व फौजदारी केस दाखल असतांना वर नमूद वर्णनाची आमचे पक्षकार यांची मिळकत पराग सुभाष अहिरे यांना रजि.खरेदीखत दस्त क्र. ५१९५/२०२२ अन्वये दि. ०१/१२/२०२२ रोजी विक्री केली आहे व सदरची मिळकत विक्री केल्यानंतर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर पराग सुभाष अहिरे यांचे नाव लागले आहे. याचा गैरफायदा घेवून पराग सुभाष अहिरे हे सदर मिळकतीवर बेकायदेशीर बांधकाम करीत आहे. पराग सुभाष अहिरे यांना आमचे पक्षकार यांनी दाखल केलेल्या स्पे. दिवाणी दावा क्र. ६६/२०१७ चे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणार आहे. परंतु या दरम्यान आमचे पक्षकार यांच्या मिळकतीवर पराग सुभाष अहिरे यांचे रो-हाऊस बांधण्याचे बांधकाम सुरु केले असून त्याकरीता बुकिंग सुरु केली आहे व याबाबत आमचे पक्षकार यांना त्यांचेकडे काही लोक सदर मिळकतीवरील रो-हाऊस बांधकामाबाबत विचारपुस करण्याकरीता आले असता कळाले व आमचे पक्षकार यांनी सदर व्यक्तींना मिळकतीबाबत कोर्टात दिवाणी दावा व फौजदारी केस दाखल असल्याचे सांगितले. त्यामुळे आमच्या पक्षकारांची खात्री झाली की, पराग सुभाष अहिरे हे आमचे पक्षकार यांच्या मिळकतीबाबत कोर्ट दरबार चालू असतांना त्यावर बेकायदेशीर बांधकाम केले असून रो-हाऊस विक्री करण्याच्या बेतात आहेत. तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे दक्ष/सुचित करण्यात येते की, वर नमूद वर्णनाच्या मिळकतीवर पराग सुभाष अहिरे करत असलेले बांधकामामधील रो-हाऊसचे बुकिंग कोणीही करु नये केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील व तमाम जनतेची वा रो-हाऊस बुकिंग करणाऱ्या व्यक्तीची फसवणूक झाल्यास त्यास आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत व असा बेकायदेशीर व्यवहार व मिळकतीवरील रो-हाऊस बुकिंग आमचे पक्षकार व त्यांच्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर मिळतीवरील बेकायदेशीर बांधकामाबाबत कोणाला काही जास्तीची माहिती व कागदपत्रांची माहिती हवी असल्यास त्यांनी आमचे पक्षकार यांच्याशी संपर्क साधावा व त्याबाबत माहिती करुन घ्यावी. अन्यथा तमाम जनतेची अथवा कोणाची फसवणूक झाल्यास त्यास आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सरची नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दिनांक ०६/०४/२०२४

ॲड.एस. एस. ठाकवाणी
ब्लॉक नं. क्यु. ४ रुम नं. ३, कुमारनगर, साक्री रोड, धुळे- ४२४००१
मो. नं. ९८२३८७०९४९

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात, येते की,

मिळकतीचे वर्णन- मौजे कुडांणे (वरखेडे) ता.जि.धुळे येथील गट नं.१८ ही शेत जमीन असून एकूण क्षे. १ हे. २६ आर आकार २ रु.१० पै. हया शेत जमीनीच्या चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे :-

येणेप्रमाणे शेत जमीन अब्दुल हफीज अब्दुल खालीक खाटीक, सलीम सुलेमान खाटीक, समसुद्दिन सुलेमान खाटीक, शरीफ सुलेमान खाटीक, सलमा रफिक कुरेशी, गालीब अब्दुल खालीक, नुरजाहा बी शरीफ खाटीक, अरसलान शरीफ खाटीक, अरशीन शरीफ खाटीक, आझम शरीफ खाटीक, रशीदा बी अब्दुल खालीक, साबेराबी मुनाफ कुरेशी, शाकेराबी शरीफ कुरेशी, खालेदाबी अब्दुल खालीक खाटीक, सादेकाबी गुलामोद्दीन खाटीक, तौफिका अब्दुल खालीक शेख, सलीम मोईनोद्दीन कुरेशी, मुस्ताक मोईनोद्दीन कुरेशी, नझमा अख्तर कुरेशी, रफिक मोईनोद्दीन कुरेशी, नाझमिन अख्तर कुरेशी, अशपाक अख्तर कुरेशी, आरीफ सलीम कुरेशी, सुनेहरा सलीम कुरेशी, सुनैना अतिक नामोले, मोईन सलीम कुरेशी, सर्व रा. देवपूर धुळे यांचे मालकीचे व कब्जे उपभोगातील असून यांचेकडून आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर सौद्यापोटी आमचे अशिलांनी बयाणापोटी रक्कम देखील दिलेली आहे. तरी सदर शेत जमीन संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे कायदेशीर संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा कायदेशीर हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर शेतजमीन निर

धुळे- भारतीय जनता पार्टीच्या ४५ व्या स्थापना दिवसानिमित्त मालेगाव रोडवरील धुळे विधानसभा वॉररूम येथे ज्येष्ठ कार्यकर्ते हिरामण गवळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित धुळे विधानसभा क्षेत्राचे प्रमुख अनुप अग्रवाल, रमेश करणकाळ, सजन चौधरी, किरण चौधरी, भाग्यश्री राहूल वाघारे, गायत्री निलेश चौधरी, ज्योत्स्ना बेराशिता राना, लीना पवार, निकिता शर्मा, चित्रा देवरे, प्रियांका पाटील, गीता अजबे, सोनल विभांडिक, पूनम अहिरे आदी.

सारांश भावसारांचा जामीन अर्ज फेटाळला

(पान १ वरुन) अजय पुनम पवार (यय ३४) हिरे भवनजवळ, तुषार राजन बागुल (३३) रा.अशोक नगर, चितोडरोड, धुळे यांना अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यात संशयित सचिन विभुते व सारांश भावसार पोलिसांना सापडून आलेले नाहीत.

अमळनेर जि.जळगाव येथे सारांश भावसार यांच्यावतीने अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकल्यावर सारांश भावसारांचा अटकपूर्व जामीन अर्ज शनिवारी दि.६ एप्रिलला फेटाळला आहे.

निधन वार्ता

जयश्री तेजवानी

नंदुरबार, दि.६- शहरातील शिक्षक कॉलनीतील रहिवासी जयश्री परमानंद तेजवानी (वय ६०) यांचे शनिवार दि.६ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक परमानंद तेजवानी यांच्या त्या पत्नी तसेच विजय तेजवानी, साई ऑप्टिकलचे संचालक नितीन तेजवानी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांची अंत्ययात्रा रविवार दि.७ रोजी सकाळी दहा वाजता शिक्षक कॉलनीतील राहत्या घरून निघणार आहे.

प्रा.सुभाष पटेल

शहादा, दि.६- तालुक्यातील करजई हल्ली मुक्काम प्रकाशा रोड शहादा येथील सेवानिवृत्त प्रा.सुभाष नंद्राम पटेल (६९) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले आहे. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते मयूर पटेल यांचे वडील होत.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

आ.पटेल यांच्या उपस्थितीत शिरपूरला स्थापना दिवस साजरा

शिरपूर, दि.६- येथील भाजपा कार्यालयात पक्षाचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त भाजपा महायुतीच्या नंदुरबार लोकसभा मतदार संघातील अधिकृत उमेदवार खा.डॉ. हिनाताई गावित यांच्या प्रचार कार्यालयाचे माजीमंत्री आ.अमरीशभाई पटेल यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. तर जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

माजी आमदार कै.प्रल्हादराव पाटील यांची प्रतिमा पुजन आ. काशिराम पावरा तर जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे प्रतिमा पुजन तुषार रंधे, पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांचे प्रतिमा पुजन शिरपूर तालुकाध्यक्ष किशोर माळी यांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचलन जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी यांनी केले तर आभार जिल्हा चिटणीस तथा तालुका प्रभारी हेमंत पाटील यांनी मानले. यावेळी शिरपूर कृउबा समिती सभापती के.डी. पाटील, आबा धाकड, पं.स. सदस्य चंद्रकांत पाटील, प्रताप सरदार, मुबीन शेख, रविंद्र भोई, प्रदीप राजपुत, ॲड.प्रताप पाटील, श्याम ईशी, संजय आसापुरे, मंगेश भदाणे, सुनिल चौधरी, महेंद्र पाटील, रोहित शेटे, मुकेश पाटील, गणेश जैन, प्रशांत चौधरी, अजिंक्य शिरसाठ, विक्की चौधरी, लोटन पाटील, संजय पाटील, जितेंद्र पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

मविआचे नंदुरबार लोकसभेचे उमेदवार..

शहर अध्यक्ष सोहेल बलेसरीया, उपाध्यक्ष जगदीश पाटील, फैजल शेख, पं.स सदस्य ललीता वसावे, माजी नगरसेवक आरीफ बलेसरीया, आर.सी. गावीत, आशिष मावची, रहेमतखा पठाण, प्रेमलाल वसावे, मंगेश येवले, लालसिंग गावीत सह सर्व कॉग्रेस पक्षाचे आघाडीचे पदधिकारी उपस्थित होते. आमदार शिरीषकुमार नाईक, दिलीप नाईक, हंसमुख पाटील, अरविंद वळवी, उमेदवार गोवाल पाडवी यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन उमेदवार गोवाल पाडवी यांनी केले त्या नंतर शहरातील नागरीकांना भेटी घेतल्या. नवापूर शहरातील लाईट बाजार, गढी परिसर, नारायपुर रोड, लिंमडावाडी फिरुन महात्मा गांधी पुतळयाला पुष्पहार अर्पण करुन कुंभार वाडा, शिवाजी रोड, सरदार चौक, बसस्थानक परिसर फिरुन नवापूर तालुका कॉग्रेस भवन येथे सांगता करण्यात आले. आभार कॉग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष जालमसिंग गावीत यांनी मानले.

ओबीसी सामाजिक संमेलन

ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव शामकांत जगन्नाथ ईशी, ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भिकन माळी, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस संजय रघुनाथ आसापुरे, ओबीसी मोर्चा शिरपूर तालुकाध्यक्ष दिपक देविदास गुजर, ओबीसी मोर्चा शिरपूर शहराध्यक्ष प्रकाश भिका गुरव यांनी केले आहे.

पान १ वरुन

शंभर दिवसांत मोठे निर्णय

कधीही जन्माला आले नाहीत. त्यांच्या नावाने योजना सुरू झाल्या. तुमचा हक्काचा पैसा थेट काँग्रेसच्या मध्यस्थांकडे जात होता.

मोदी पुढे म्हणाले, काल (५ एप्रिल) काँग्रेसने खोट्याचा गठ्ठा सोडला आहे. काँग्रेसचा पर्दाफाश करणारा हा जाहीरनामा आहे. प्रत्येक पानावर भारताचे तुकडे करण्याचा वास दिसतोय. स्वातंत्र्याच्या वेळी मुस्लिम लीगमध्ये जी विचारसरणी होती, तीच विचारसरणी काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दिसून येते. काँग्रेसच्या एका खासदाराकडे तिनशे कोटींची रोकड सापडल्याचे नरेंद्र मोदी म्हणाले. पैसे मोजून मशीन थकले होते. त्यामुळे अहंकारी युती मोदींवर चिडली आहे. जितका चिखल टाकाल तितकेच कमळ फुलणार हे काँग्रेसवाल्यांनी समजून घ्यावे. काँग्रेस निवडणूक जिंकण्यासाठी रॅली काढत नाही, तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी करत आहे. भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई सुरूच राहणार आहे, असे सांगून पंतप्रधान म्हणाले की, राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठेसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीला काँग्रेसने सहा वर्षांपासून हाकलून दिले. आमच्याकडे लोक राम-राम म्हणत नमस्कार करतात. माझ्या मनात रामाबद्दल इतका राग मी ठेवू शकत नाही.

लोकशाही नियमांचे सर्रास उल्लंघन

त्याचवेळी काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, मोदी जिथे जातात तिथे नवनवीन खोटे बोलतात. त्यांनी दिलेले हमीपत्र अद्याप पूर्ण झालेले नाही. ते फक्त गांधी घराण्याला शिव्या देण्याचे काम करतात.

प्रियांका गांधी पुढे म्हणाल्या की, आज बेरोजगारी शिखरावर आहे. तुम्ही १० वर्षे मोदीजी आणि भाजप सरकार पाहिले आहे. त्यांनी बेरोजगारी दूर करण्यासाठी काय केले? अग्निवीर सारखी योजना आणली. सैन्यात भरती होणाऱ्या तरुणांच्या आशा पल्लवित झाल्या. देशातील प्रत्येक राज्यात पेपर फुटले असून नोकऱ्या उपलब्ध नाहीत. महागाईची परिस्थिती अशी आहे की निवडणुकीच्या दोन महिने आधी सिलिंडरच्या किमतीत कपात करण्यात आली होती. एक अनोखी गोष्ट म्हणजे गेल्या पाच वर्षांत तुमचा संघर्ष टीव्ही किंवा मीडियावर दिसतो की वर्तमानपत्रात वाचायला मिळतो? भाजप सरकार सत्तेवर येताच राजस्थानमध्ये चिरंजीवी योजना बंद करण्यात आली. २५ लाखांचा विमा आता ५ लाख रुपयांचा झाला आहे. हे वाचायला मिळाले का? देशाची परिस्थिती इतकी वाईट आहे, ऐकू येत नाही. मोठमोठे उद्योगपती मोठमोठ्या वाड्यांमध्ये राहतात, त्यांची लग्ने कशी चालतात हे आपण पाहत आहोत. त्यांची हजारो कोटींची कर्जे माफ झाली आहेत.

मोहाडी पोलिसांची कारवाई

ठाणे हद्दीत रानमळा रोड, पाटीलवाडा हॉटेल, तसेच रेसीडेन्सी हॉटेल जवळ तक्रार यांना अशाच प्रकारे धमकावून २ मोटार सायकली, ६०,०००/-रु. रोख रक्कम व एक मोबाईल जबरी चोरी केल्याची कबुली दिली आहे.

याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचे तपासात आठ हजारांचा मोबाईल, वीस हजारांची स्प्लेन्डर मोटारसायकल, २५ हजाराची हिरो डिलक्स मोटारसायकल, गुन्हा करते वेळी वापरलेला एक धारदार व दाते असलेला चॉपर असा एकूण ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, सहा पोलीस अधिक्षकएस. ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. निवृत्ती पवार, शशीकांत पाटील, पोलीस निरीक्षक व त्यांचे पथकातील पोसई समाधान सुरवाडे, पोहेकॉ योगेश शिरसाठ, गौतम सपकाळे, शांतीलाल सोनवणे, संदीप कढरे, अनिल शिंपी, अझरुद्दीन शेख, पंकज जोंधळे, मकसुद पठाण, यांनी सदरची कारवाई केली आहे.

व्याख्यानमालेचे आयोजन

डॉ.हेमंत देशमुख हे छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनिती आणि हिंदुत्व या विषयावर गुंफणार आहेत. तर द्वितीय पुष्प क.ब.चौ.उ.म.वि. जळगावचे वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.अनिल डोंगरे सामाजिक क्रांती व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर गुंफणार आहेत. संस्थेतर्फे २०११ पासून व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विचारवंतांनी आपल्या व्याख्यानातून उद्बोधनाचे कार्य केलेले आहे. शहरातील सर्व विचारशील नागरिकांना या व्याख्यानांस उपस्थित राहण्याचे आवाहन संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राचार्य बाबा हातेकर आणि व्याख्यानमाला संयोजन समिती सदस्य प्रा.डॉ.सुरेंद्र मोरे, प्रा.डॉ.संजीव पगारे, प्रा.डॉ.संजय ढोडरे, प्रा.डॉ.बाळासाहेब गायकवाड, डॉ.दीपक शेजवळ आणि प्रा.डॉ.सतीश निकम यांनी केले आहे.

निस्वार्थपणे मतदान करा

याबाबतही मार्गदर्शन केले. तालुक्याचे स्वीप नोडल अधिकारी डॉ.सी.के. पाटील बोलतांना म्हणाले की, आजच्या कार्यक्रमात सर्वांचा उत्साह पाहून या गावातील मतदान टक्केवारी वाढीसाठी आजचा उपक्रम नक्कीच परिणामकारक ठरेल असे मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे सोमवारी ८ एप्रिल रोजी देखील सर्व तालुक्यातील प्रत्येक गावात जिल्हा परिषद शाळेत मतदान जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामपंचायत व शाळेमार्फत आयोजित आजचा कार्यक्रमातून आपल्याला गावातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

प्रस्ताविकात गटविकास अधिकारी अधिकारी वाघ यांनी केले. यावेळी जिल्हा परिषद शाळा, सवाई मुकटी येथील विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे मतदान करण्याचा हक्क प्रामाणिकपणे बजावून १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून कोणत्याही आमिषाला बळी न पडता योग्य पद्धतीने मतदान करून लोकशाही बळकट करण्याचा व गावाचा, देशाचा, विकास साधण्याचा संदेश दिला. तालुक्यातील जिल्हा परीषदेतील शाळेतील शिक्षकांच्या पथकाने पथनाट्य सादर करून सर्व १८ वर्षावरील नव मतदारांची नोंदणी करणे, वोटर हेल्पलाइन प, वयोवृद्ध मतदार, दिव्यांग मतदार यांच्यासाठी मतदानाच्या उपलब्ध सुविधा व टपाली मतदान याविषयी जनजागृती व प्रबोधन केले.

प्रारंभी सकाळी विद्यार्थ्यांची व मतदारांची जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पंचायत समिती, शिंदखेडा येथील नोडल अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी डॉ.सी.के. पाटील सहा. गटविकास अधिकारी कपिल वाघ व विस्तार अधिकारी श्री.सोनवणे, श्री.देवरे, श्री. जाधव, सर्व केंद्रप्रमुख यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, तरुण मतदार, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मतदानाचा हक्क बजविण्यासाठी मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सूत्रसंचलन मंदाने येथील जिप.शाळेचे मुख्याध्यापक नितिन सासके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामसेविका माधुरी पाटील, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका भारती क्षीरसागर, रूपांतरित शाळेचे मुख्याध्यापक मनोज पाटील, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील व शिक्षक युवराज एकनाथ पवार , अजय शिवदास चव्हाण, श्रीमती शितल आधार चव्हाण, हरीशचंद्र देसले यांनी परीश्रम घेतले.

या कार्यक्रमास गावातील मतदार, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, तरुण मतदार, सामाजिक कार्यकर्ते, तरुण मंडळ, तामथरे, चिमठाणे केंद्रातील केंद्रप्रमुख, सर्व विभागांचे विस्तार अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक तीनही शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, अशावर्कर, बचत गट, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..

भक्ती नगर

मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना

* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *
* सदर प्लॉटस्ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय.डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/- असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणुकीचा पर्याय.त्वरा करा!

-: संपर्क :-

श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे

ऑफिस :- २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे

9011765188, 9823412718, (02562) 240109

फ्लॅट भाड्याने देणे आहे

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.

-: संपर्क :-

9665158114
8010460447

पाहिजेत

१) सिनियर ग्राफिक डिझायनर - ३ पुरूष/महिला (३+ वर्ष अनुभव)
२) ग्राफिक डिझायनर इंटर्नशिप- २ पुरूष/महिला
३) शिकाऊ बॅनर मशिन ऑपरेटर - २ पुरूष
४) हेल्पर - १ पुरूष

* फुल व पार्ट टाईम कामाची संधी
* कामाचे ट्रेनिंग दिले जाईल * आकर्षक पगार

सुयोग डिजीटल प्रिंटर्स - Mob. 80875 24209, 75880 08025
पत्ता: श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊस जवळ, साक्री रोड, धुळे.

जागा भाड्याने देणे आहे

फागणे बायपास हायवे टच २ ते ३ एकर जागा भाड्याने देणे आहे. लाईट व पाण्याची व्यवस्था, पेव्हर ब्लॉक व सिमेंट प्रोडक्ट व्यावसायिकांना प्राधान्य!

इंजि.हर्षल देसाई
9359407097

बंगला विकणे आहे

प्लॉट 5000 sq.ft. बांधकाम 3000 स्क्वे.फूट R.C.C. प्लॉट नं.४०, सम्राटनगर, जमनागिरी रोड, धुळे
किंमत : २.२५ cr.
बंगल्यावर अधिकृत परवानगी मोबाईल टॉवर, मासिक भाडे- २०,०००/-
२४ तास पाणी, स्वतंत्र विहीर
-: संपर्क :-
9822574117

प्लॉट विकणे

शहराच्या मध्यवर्ती भागात भव्य शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स, हॉस्पीटलसाठी उपयुक्त प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

प्लॉट विकणे

महावीर नगर, अग्रवाल नगर, जी.बी. नगर, स्नेहनगर, राजवाडे नगर येथील प्लॉट विकणे आहेत.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

प्लॉट विकणे

ग्रेनाईट, मार्बल, बिल्डींग मटेरियल शोरुमसाठी पारोळा रोडटच प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

बंगला विकणे आहे

अग्रवाल नगर, वल्लभ नगर येथील बंगले विकणे आहेत.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

पाहिजेत

रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.
ईश्वर गारमेन्टस्, धुळे
9423917461

विकणे आहे

Activa-2008 RTO पासिंग व पूर्ण काम केलेली. अपेक्षित किंमत- २७०००/-
-: संपर्क :-
9423390451

भाड्याने देणे आहे

घर व दुकान भाड्याने देणे आहे.
संपर्क : २४, हरि ओम कॉलनी, प्रताप मिलच्या मागे, धुळे
9764208263

बंगलो सिस्टीम फ्लॅट

तुळशीराम नगर, देवपूर येथे फर्स्ट फ्लोअर दोन रोड कॉर्नरचा प्रशस्त सुविधायुक्त इंटेरियरसह फ्लॅट विकणे आहे.
बिल्टअप एरिया : 1560 स्क्वे.फूट
-: संपर्क :-
7558706967

बंगलो विकणे आहे

तुळशीराम नगर, देवपूर येथे मोक्याच्या ठिकाणी 2 BHK इंटेरियरसह बंगलो विकणे आहे. प्लॉट एरिया- 1230 स्क्वे.फूट, बिल्टअप एरिया- 834 स्क्वे.फूट
-: संपर्क :-
7558706967

पाहिजेत

दुध डेअरीचा अनुभव असलेला माणूस लावणे आहे. तसेच दुध डेअरीवर दुधाचे फॅट काढू शकणारा अनुभवी माणूस लावणे आहे. समक्ष भेटा!
महात्माजी स्वीटस्
ग.नं.४, खोलगल्ली, धुळे
9822447729

कुलिंग इंडिया की पहचान

Symphony | USHA

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'

आता खरेदी करा कूलर 0% EMI वर

BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

नियम व अटी लागू*

ak media- 238222

56 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

दुकाने विकणे आहेत

तुळशीराम नगर, देवपूर येथे दोन मेन रोड कॉर्नर, प्रशस्त पुर्वमुखी दोन दुकाने विकणे आहेत.
साईट- 241+241=482 स्क्वे.फू.
-: संपर्क :-
7558706967

रो बंगलो विकणे आहे

मोक्याच्या ठिकाणी सर्व सुविधायुक्त, स्वतंत्र पार्किंग, बोअरवेल, मनपा नळ, वीज मीटरसह 3 BHK बंगलो विकणे आहे.
साईट- अरुण नगर, वडेल रोड, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
7558706967

पाहिजेत

इंटिरियर डिझाईनर-४
सेल्समन - ५
हेल्पर - ४
महिला-पुरुष दोघी चालेल.
आकाश हॅण्डलूम हाऊस
जे.बी.रोड, धुळे
7506000250

पाहिजे

वेटर - २
किचन हेल्पर - १
B'Live Restaurant
सोन्या मारुती/हस्ती बँक जवळ,ग.नं.५,धुळे
संपर्क -9423978887

विकणे/भाडेतत्वावर देणे

RCC बांधकाम असलेली सर्व सोयी युक्त ३ मजली इमारत भाडेतत्त्वावर किंवा विकणे आहे.
पत्ता : जुने धुळे, ग.नं.२ व ३ च्या कॉर्नर वर, दुर्गा देवी मंदिर जवळ.
-: संपर्क :-
श्रीमती जोशी
9579792872

पाहिजेत

नकाणे रोड, धुळे येथील पेट्रोल पंपावरील कामाकरिता मुले/मुली लावणे आहेत.
रिया पेट्रोलियम
-: संपर्क :-
9860430127
8999290990

जागा विकणे आहेत

ग्रा.पं.कापडणे ता.जि.धुळे येथील गावातील पोस्ट ऑफिसजवळील मध्यवर्ती ठिकाणातील उपयुक्त सुमारे १३०० स्क्वे.फूट बखळ जागा विकणे आहे.
-: संपर्क :-
9422786568

ड्रायव्हर पाहिजे

महिंद्रा बोलेरो व टाटा झेनॉनसाठी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
9421525729
7588425729

जागा भाड्याने देणे

बँकेस/विमा/फायनास ऑफिसेससाठी ग्राऊंड फ्लोअर २००० sq.ft. जागा भाडे तत्वावर देणे आहे (कमर्शियल ५०% बांधकाम)
डॉ.नितीन काकडे
६०, जयहिंद कॉलनी (मेनरोड), स्टेट बँकेच्या जवळ, देवपूर, धुळे
(वास्तुचे बांधकाम सुरु आहे)
7020869154

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०